# शुभ मंगल ! विज्ञान !!

## (विज्ञान कथा)

मुरलीधर जावडेकर



मुरलीधर जावडेकर साहित्यकला प्रतिष्ठान

मुरलीधर जावडेकर

# शुभ मंगल ! विज्ञान !!

(विज्ञान कथा)

मुरलीधर जावडेकर साहित्यकला प्रतिष्ठान, पुणे

© सर्व हक्क मुरलीधर जावडेकर साहित्यकला
प्रतिष्ठान, पुणे ( E 5648 पुणे दि. २१-१-२०११)
यांच्या स्वाधीन

लेखक :
मुरलीधर जावडेकर
महाराष्ट्र गृहनिर्माण मंडळ
उच्च उत्पन्नगट वसाहत
इमारत क्र. १, गाळा क्र. ९
संत तुकारामनगर, पिंपरी,
पुणे ४११ ०१८

दूरध्वनी : ०२०-२७४२१६८३

**प्रकाशक**
मुरलीधर जावडेकर साहित्यकला प्रतिष्ठान

**मुद्रक**
एम् ब्लेम डिझ़िटल, पुणे ४११००४

**चित्रकार**
श्री. नरेंद्र केळकर

प्रकाशन-२०१२

देणगी मूल्य - रु. ७५=००

सूचना
या सर्व कथांतील सर्व पात्रे आणि सर्व प्रसंग संपूर्णपणे काल्पनिक असून कोणास कोठे वास्तवात साम्य आढळल्यास तो निव्वळ योगायोग आहे, असे समजावे.

# अर्पणपत्रिका

दिवाळी जवळ आली की 'विज्ञानयुग' चे संपादक गजानन क्षीरसागर यांचे कथेसाठी  प्रेमाचा आग्रह करणारे पत्र यायचेच आणि कथा पोचताच ती फार आवडल्याचे पत्र किंवा दूरध्वनी यायचाच, त्या विज्ञानोपासक

गजानन क्षीरसागर

यांच्या प्रेमस्मृतीस अर्पण!

आताही दरसाल दिवाळी येतेच!

–मुरलीधर जावडेकर

# शुभ मंगल ! विज्ञान !!

(विज्ञान कथा)

प्रथम प्रकाशन

१) रुबी – ‘आरती’ मासिक १९८३ एप्रिल.
२) मनुष्याची नवी आवृत्ती – ‘विज्ञानयुग’ दिवाळी १९९९.
३) शुभमंगल ! विज्ञान!! – ‘विज्ञानयुग’ दिवाळी २००१.
४) आपुलाचि वाद आपणांशी – ‘विज्ञानयुग’ दिवाळी २०००.
५) अण्वस्त्रांचं उत्पादन दुप्पट करा – ‘विज्ञानयुग’ दिवाळी १९८९.
६) वस्तू – ‘मैफल’ दिवाळी १९८९.
७) प्रत्यक्षाहुनि प्रतिमा उत्कट – ‘अक्षरसंवेदना’ दिवाळी २००२.
८) विषकन्या – ‘अक्षरसंवेदना’ – दिवाळी २००३.
९) कालान्त – ‘अक्षरसंवेदना’– दिवाळी २००६.
१०) ग्रहान्तर – ‘माझी मैत्रीण’– दिवाळी २००४.

लेखक वरील सर्व नियतकालिकांचा आणि त्यांच्या संपादकांचा अत्यंत आभारी आहे. त्या सर्वांच्या सौजन्यानेच या कथांचा या संग्रहात समावेश केलेला आहे.

# शुभ मंगल ! विज्ञान !!

(विज्ञान कथा)

## अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| रुबी | १ |
| मनुष्याची नवी आवृत्ती | ९ |
| शुभमंगल ! विज्ञान !! | १३ |
| आपुलाचि वाद आपणांशी | २१ |
| अण्वस्त्रांचं उत्पादन दुप्पट करा | २६ |
| वस्तू | ३० |
| प्रत्यक्षाहुनि प्रतिमा उत्कट | ३७ |
| विषकन्या | ४५ |
| न्यायाला मदत | ४८ |
| कालान्त | ५२ |
| ग्रहान्तर | ५७ |

# मुरलीधर जावडेकर साहित्यकला प्रतिष्ठान

**अ** **काव्य**

१ नव्या युगाच्या कविता

२ ‘नवरा नको ग बाई’ आणि इतर पथनाट्ये

**ष्ट** **कथा**

३ ‘नको हे पुरुषी मन’ आणि इतर लघुकथा

४ शुभ मंगल ! विज्ञान !! (विज्ञान कथा)

५ ‘अवतार’ आणि इतर कथा

**पै** **नाटक**

६ मस्तानीचा बाजीराव

७ सत्तेचा विजय असो !

८ प्रीती मिळेल का हो?

९ गजराज आणि वनराज

१० आग लागो या सगळ्याला

११ चल ये, चल ये, चल ये, बयेऽ

१२ ‘निम्मी माझी, निम्मी तुझी’ आणि इतर एकांकिका

**लू** **पटकथा**

१३ स्वातंत्र्यवीर

**सा** **कादंबरी**

१४ त्सुनामीची सुवर्णसंधी

१५ किलर इन्स्टिंक्ट

१६ अंतिम सत्य

**हि** **विज्ञान**

१७ विज्ञानाचा कल्पतरू

**त्यि** **समीक्षा**

१८ साहित्यातील प्रीती आणि भक्ती

१९ महाराष्ट्रातील वैज्ञानिक क्रांती

२० केशवसुत : वैदिक संस्कृतीचा आधुनिक उद्गाता

२१ केशवसुत गातचि बसले!

२२ वैज्ञानिक समीक्षा

**क** **संकीर्ण**

२३ हिंदू समाजाचा छेदाभ्यास

२४ इंग्रजीत नापास ? अशक्य!!!

२५ To Be, or Not To Be

<u>प्रतिभेचा स्तिमित करणारा साक्षात्कार</u>

## मुरलीधर जावडेकर यांची कला

**<u>कथाकथन</u>** :- १५ ऑगस्ट १९९९ रोजी स्वातंत्र्यदिनानिमित्त अमेरिकेत कथासंग्रह प्रकाशन आणि कथाकथन केले. महाराष्ट्रात अनेक प्रयोग केले. श्रोते चकित, आनंदित, प्रभावित होतात. कितीही वर्षे जावोत पुन: भेटले की कथांची आठवण काढतात. आजचे आघाडीचे कथाकार.

**<u>नाट्यवाचन</u>** :- 'मस्तानीचा बाजीराव' या स्वत:च्या नाटकाचे वाचन थोरल्या बाजीरावांच्या तीनशेव्या जन्मदिनी पुण्यात केले. यानंतर दूरदर्शन (सह्याद्री) ने मुलाखत घेतली आणि नाट्यवाचनाचे वर्णन 'मंत्रमुग्ध करणारे' असे करून ती प्रसृत केली. डॉ. वि.भा. देशपांडे आदींना आवडलेली संहिता आणि नाट्यवाचन.

**<u>काव्यप्रस्तुती</u>** :-साहित्यसंमेलनाध्यक्ष कविवर्य श्री. नारायण सुर्वे, गंगाधर महांबरे, संगीता जोशी इत्यादींना आवडलेल्या कविता. काव्यसंग्रह प्रकाशन आणि 'काव्याचे नाट्यपूर्ण बहारदार सादरीकरण' केले.

**<u>एकपात्री नाट्यप्रयोग</u>** :- 'स्वातंत्र्यवीर' (वि.दा.सावरकर) हा (सावरकरांच्या ६ ध्वनिमुद्रित पदांसह) प्रयोग अत्यंत प्रभावी होतो. स्वर्गीय सुधीर फडके, शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे, स्वा. सावरकर संमेलनाध्यक्ष वा.ना. उत्पात आदींनी दाद दिली. प्रेक्षकांना सावरकर भेटल्याचा परमानंद होतो. पुण्याच्या 'सांस्कृतिक वार्तापत्र' संस्थेने याबद्दल सत्कार केला.

**<u>व्याख्यान, मुलाखत इत्यादी</u>** :- धर्म, विज्ञान, संस्कृती, वाङ्मय इत्यादी विषयांवर महाराष्ट्रातच नव्हे तर अन्य प्रांतांतही अनेक व्याख्याने झाली. दूरदर्शन आणि आकाशवाणी यांनी अनेक मुलाखती घेऊन पुन: पुन: प्रसारित केल्या.

**जन्म :**
२० मे १९३६
**शिक्षण :**
एम्. ए. (पुणे), पीएच्.डी. (मुंबई)
**व्यवसाय :**
मराठी, इंग्रजी प्राध्यापक, प्राचार्य

**डॉ. मुरलीधर जावडेकर**
म्हाडा उच्च उत्पन्न गट वसाहत
इमारत क्र. १, गाळा क्र. ९
संत तुकाराम नगर, पिंपरी, पुणे ४११ ०१८
(महाराष्ट्र राज्य - भारत)
दूरध्वनी : ०२०-२७४२१६८३
मोबाईल : ९८९०१६९१५६

# शुभ मंगल ! विज्ञान !!

## काही अभिप्राय

‘विज्ञानकथा विशेषांक यशस्वी करण्यात आपला सहभाग खूप मोलाचा आहे.’ - गजानन क्षीरसागर, संपादक विज्ञानयुग.

‘आम्ही मे महिन्यात बराच मोठा दौरा करून आपल्या (चिंतामणि साहित्य सहयोग प्रकाशन - ‘आरती’ मासिक) योजनेची प्रतिक्रिया अजमावली. आपली ‘रुबी’ ही कथा पसंत पडल्याचे व त्याच्या नाविन्याचे गुणगान करणारी बोलणी झाली तेव्हा आपण आमच्याबरोबर पाहिजे होतात असे वाटले’ - दि. मो. दुधगावकर, व्यवस्थापक. (पत्र दि. ८/८/१९८३)

(‘रुबी’ कथा मी कथाकथनात घेतली. कोलोराडो अमेरिका, कणकवलीचे एक जिल्हापातळीचे कथासंमेलन, पुण्यातील डी. वाय. पाटील कॉलेज इत्यादी ठिकाणी श्रोत्यांनी कथा अक्षरश: डोक्यावर घेतली. जेवताना प्रत्येक पदार्थाचा प्रत्येक घास चव घेत, वाहवा देत खावा, तशी जवळजवळ प्रत्येक वाक्याला तुफानी दाद तरुणतरुणी विद्यार्थ्यांनी दिली. कादंबरीकार श्रीपाद काळे दहा वर्षांनी भेटले. म्हणाले, ‘तुम्ही ते ‘रुबी’ कथा लिहिणारे!’ अशीच दाद अनेकांकडून मिळाली. ही कथा लिहिल्याचे इतर बहुतेक कथांप्रमाणे मलाही आश्चर्यच वाटते! - लेखक.)

‘अण्वस्त्रापर्यंत स्वत:च्या बळावर झेपावणाऱ्या भारत देशाला एकविसाव्या शतकाच्या दिशेने आणखी मोठी भरारी मारण्याकरिता मार्गदर्शक ठरतील अशा विज्ञानकथा लिहीत आहेत डॉ. मुरलीधर जावडेकर.’ (‘साहित्यसूची’, ऑक्टोबर २००१.)

‘विज्ञानकथाकारांच्या या पिढीत डॉ. मुरलीधर जावडेकर हे लक्षणीय लेखक समाविष्ट आहेत.’ (‘साहित्यसूची’, एप्रिल २००३.)

# रुबी

''तुझ्या नव्या प्रेमकविता ऐकण्याची मला फार उत्सुकता लागली आहे. किचकट शास्त्रीय प्रयोग करून मी अगदी वैतागून गेलो आहे. पण तुझ्या नव्या कविता तू मला ऐकव. मी माझा नवीन शोध तुला दाखवतो.''

विज्ञानेश्वराचे ते पत्र वाचताच मी आनंदाने उडीच मारली. विज्ञानेश्वर माझा लंगोटी-दोस्त. 'विज्ञानेश्वर' हे काही त्याचे खरे नाव नव्हे. त्याचे विज्ञानाचे वेड पाहून मी त्याला ते नाव ठेवले होते. आणि त्यालाही ते एकदम पसंत पडले होते. त्याला जसे वेड विज्ञानाचे तसे मला प्रेमकाव्याचे. त्यामुळे तो मला 'प्रेमेश्वर' म्हणे. खरे पाहता आमच्या या आवडीच्या विषयांत साम्य काहीच नव्हते, पण कदाचित परस्परपूरक होत असल्यानेच आमची मैत्री टिकून राहिली असावी. आम्हा दोघा ईश्वरांची भेट म्हणजे हरिहरांचे ऐक्यच म्हणा ना! तसा हरिहरांवर आमचा दोघांचाही मुळीच विश्वास नव्हता. आणि त्यामुळेच आम्ही दोघे भेटलो की, कल्पनेतला ईश्वर तरी काय मुक्तपणे वागत असेल इतक्या मुक्तपणे वागून पूर्वीच्या सर्व श्रमांचा परिहार करून टाकत असू. ''अत्यंत तातडीचे सरकारी काम निघाल्याने परगावी जाणे भाग आहे. काम किती दिवस लांबेल काही सांगता येत नाही. तू वाट पाहू नकोस आणि काळजी करू नकोस,'' असे न चुकता सौभाग्यवतीस सांगून मी पहिल्याच गाडीने विज्ञानेश्वराचा मार्ग धरला. कुटुंबनियोजन करताकरताच मला चार मुली आणि एक मुलगा झाला. बेट्या विज्ञानेश्वराने मात्र माझ्यापेक्षा दोन चार पावसाळे जास्त पाहिलेले असूनही संसाराच्या उन्हाळ्यापासून आपला जीव सलामत राखला होता. खरे तर विज्ञानेश्वराच्या प्रयोगशाळेत अनेक सुंदर मुली गुंतलेल्या असत, पण या अप्सरांच्या गराड्यात राहूनही विज्ञानेश्वर मुक्त कसा राहिला, हे मलासुद्धा कोडेच होते. या वेळेला या कोड्याचा पूर्ण उलगडा करूनच बाहेर पडायचे, असा मी ठाम निश्चय केला.

ऐन संध्याकाळचे सूर्यास्ताचे सोनेरी किरण विज्ञानेश्वराच्या भव्य प्रयोगशाळेच्या दाराच्या कमानीवर सोनेरी महिरप रंगवीत असतानाच मी दारात पोचलो. ''स्वागत असो!'' शब्द ऐकू आले आणि दार आपोआप उघडले. आत पाऊल टाकताच दार बंद झाले. माझ्या मागे रस्त्यावरले एक कुत्रे लागले होते. पण दार असे बंद झाले की कुत्रे नेमके बाहेर राहिले. मला याचे नवल वाटले नाही, कारण विज्ञानेश्वराने दाराच्या उघडझापीच्या यंत्रणेलाच कोणाला आत सोडायचे आणि कोणाला आत सोडायचे नाही, याच्या स्वयंसूचना देऊन ठेवलेल्या मला माहीत होत्या. विज्ञानेश्वराच्या प्रयोगशाळेत ज्यांना प्रवेश होता, त्यांनाच ते दार उघडे. अन्य कोणी आल्यास त्या नव्या व्यक्तीचे छायाचित्र विज्ञानेश्वराच्या

टेबलावरील दूरदर्शनात त्याला दिसत असे. आणि विज्ञानेश्वराच्या दूरसंदेशानेच दार उघडत असे. सवयीप्रमाणे मी फक्त उभा राहिलो. माझ्या पायाखालील मार्गच चालू लागला. आणि तो मार्गच मला विज्ञानेश्वराच्या कार्यालयात घेऊन गेला. आपोआप समोरील दार नाटकाचा पडदा दुभागला जावा तसे दुभागले. त्या आश्चर्यात पायाखालील फिरता मार्ग तिथेच खुंटून उलटा खालून मुरडला असल्याने पाय मुरगळून मी पडायचाच, पण विज्ञानेश्वरानेच मला एकदम मिठी मारून घेतल्याने मी बचावलो.दोस्ताला भेटून फार आनंद वाटला. ''अरे प्रेमेश्वरा, तू खातोस पितोस की नाहीस? का नुसता प्रेमाने झुरतोस? आँ? अरे, गेल्या वेळेपेक्षा निम्मा झालास!'' तो म्हणाला. ''विज्ञानेश्वरा, संसाराचे चटके तुला ब्रह्मचाऱ्याला काय कळणार?'' मी म्हणालो. तेव्हा गडगडल्यासारखे हसून तो म्हणाला,''ब्रह्मचारी म्हणू नकोस.''''मग?''''विज्ञानचारी म्हण,'' तो पुन्हा गडगडला. मीही गडगडतच गेलो. मग तो म्हणाला, ''प्रेमेश्वरा, येथे वैज्ञानिक औषधे खा आणि नवीन जोमदार जीवन सुरू कर, धर.'' असे म्हणून खरोखरच त्याने एक चमकदार पेय माझ्या हातात दिले. स्वत:ही ग्लास भरून घेतला. ग्लासावर ग्लास आपटून ग्लास उंचावताच आमची मनेही उंचावतच चालली. एकदम उन्हाळ्यातून थंड विहिरीत उडी मारावी, तसे त्या पेयाने झाले! कोठून तरी नवा उत्साह संचारावा, तसे होऊन गेले. पाण्यात पडल्यावर पाण्यानेच आपले वजन उचलून धरावे आणि हलके हलके वाटावे, असे होऊ लागले!

''काय, आहे की नाही नूतन पेय? झाला की नाही श्रमपरिहार?'' ''अरे, हाच का तुझा नवा शोध? पेटंट घे. कोटीकोटी मिळवशील.'' ''अरे, नवा शोध पुढेच आहे. हे औषधी पेय हासुद्धा माझा नवा शोधच आहे आणि तो मी लवकरच जाहीर करणार आहे, पण माझा नवा शोध मी तुझ्या नव्या कवितांच्या शोधानंतरच तुला दाखवणार आहे. तू तयार आहेस ना? चल. माझा सगळा स्टाफ तुझ्या कविता ऐकायला जमला आहे.''

सगळा स्टाफ म्हणताच माझ्या अंगावर झिणझिण्या आल्याशिवाय राहिल्या नाहीत. कारण स्टाफमध्ये होत्या बहुतेक तरुण मुलीच. कॉम्प्युटर, ट्रॅन्झिस्टर, इलेक्ट्रॉनिक्स असले सगळे सॉफ्टवेअर हाताळायला म्हणे सॉफ्ट हातच लागतात! त्यांतल्या काहींच्याविषयी सॉफ्टकॉर्नर निर्माण झाल्यास नवल काय? आणि त्यांच्यासमवेत प्रेमकविता वाचायची! बरे, केवळ दूरदर्शनावरच्या प्रेमकवितेवर माझा मुळीच जीव नव्हता. माझ्या प्रेमकविता मीलनाच्याच प्रेमकविता! मैफल बसली. फर्माईश सुरू झाली. मी एकीकडे कविता वाचीत होतो आणि एकीकडे माझी नजर त्या श्रोत्या सुंदरींवरून फिरत होती. खोटे कशाला सांगू? त्या सर्व मुलींच्या मागच्या रांगेत एकजण होती– ती तर अद्‌भुतच वाटली. माझे तोंड कविता म्हणत होते, पण मन सगळे तिच्याकडेच लागले होते.

इतक्यात श्रोत्यांत एकदम ''आला, आला, रोबो आला, रोबो आला,''असा हळुवार दबकत आवाज येऊ लागला. लोक 'रोबो', 'रोबो' म्हणत होते. 'रोबो'म्हणजे यंत्रमानव, पण मला तर तो कुठेच दिसेना. एअर इंडियाच्या महाराजासारखा हुबेहूब पोषाख

केलेला एकजण मात्र हळूहळू पुढे येत होता. तो जवळ येऊन त्याने मला नमस्कार केला. तेव्हा मी निरखून पाहिले न् मला कळले की हाच रोबोमहाराजा! मी थक्कच झालो! ''अरे विज्ञानेश्वरा, माझ्या कवितेत कदाचित जिवंत भावना असेल, पण तू तर हे यंत्रच जिवंत केले आहेस!'' मी आनंदाने टाळ्या वाजवल्या. त्याबरोबर सर्व श्रोत्यांनीही टाळ्या वाजवल्या आणि रोबो महाराजानेही हसून टाळ्या वाजवल्या! मग त्या रोबो महाराजाने एका प्लॅस्टिकच्या बरणीतून सर्वांना मूठमूठ काजू वाटले. ओळीने काजू वाटून झाल्यावर सर्वांना त्याने चॉकलेटसारखे चविष्ट आणि पौष्टिक पेयही दिले. ''थँक्यू'' म्हणताच ''मेन्शन नॉट'' म्हणायलाही रोबो महाराजा चुकत नव्हता! मी उत्स्फूर्तपणे श्रोत्यांना म्हणालो,''माझ्या कवितेची चाल तुम्हांला आवडली, पण खरं सांगू का, तुम्ही केलेल्या या रोबोची डौलदार चालच मला अधिक आवडली. शाब्बास विज्ञानेश्वरा, तू यंत्राला माणूस केलेस!'' ''कारण माणसे यंत्रांसारखी झाली आहेत!'' विज्ञानेश्वर त्याचे गडगडाटी हास्य करीत म्हणाला. आता विज्ञानेश्वरा, तुझ्या या नव्या शोधाचीच मला पुरती माहिती सांग. माझे कवितावाचन आता पुरे. वाटल्यास मी कविता उद्या पुन्हा म्हणीन. पण आधी मला या रोबोमहाराजाची जन्मकहाणी ऐकव,'' मी म्हणालो. ''माझी जन्मकहाणी तुम्ही ऐकू इच्छिता पण मलाच तुमच्या कवितांच्या कहाण्या ऐकवा. किती छान आहेत तुमच्या कविता! म्हणून दाखवू?'' असे म्हणून त्या रोबो महाराजाने माझीच एक कविता मलाच म्हणून दाखविली. अर्थात ते त्या यंत्रातले टेपरेकॉर्डिंग होते, हे उघडच होते. कारण तो महाराजाचा आवाज म्हणजे माझाच आवाज होता. पण तो त्याच्या तोंडून येत होता आणि मुद्दाम निरखून पाहिल्याखेरीज यांत्रिक वाटत नव्हता, हे नवलच होते. या नवलशोधाला मी मनोमन शरण गेलो! मानवाच्या विजयाची ही नवीन निशाणी होती. मैफिल केव्हाच थांबली! श्रोते निघून गेले. श्रोत्यांचे 'वाहवा' कानांत निनादत होतेच पण त्या 'वाहवा'त माझ्या वाहवाचा सूर होता त्या नव्या शोधासाठी! इतका हुबेहूब मानव! चालणारा, बोलणारा, हवे ते काम करणारा, गप्पा मारणारा! यंत्रमानव कसला– यंत्रमित्रच तो!

''विज्ञानेश्वरा, अरे, माणसांची संख्या अमर्याद वाढत चालली आहे! त्यात या यंत्रमानवाची भर पडली तर रे? काय होईल जगाचे?'' ''तीच काळजी करतोय मीसुद्धा,'' विज्ञानेश्वर म्हणाला. ''लोकसंख्या मर्यादित राहिली तरच जग सुखी होईल. त्याच दृष्टीने माझा प्रयत्न चालू आहे. आणि तोच माझा नवा शोध असणार आहे. चल जेवू या.'' रोबो महाराजाने पेटंट पोज घेऊन आमचे जेवणघराकडे स्वागत केले आणि आग्रह करकरून नवनवीन पदार्थ आणून वाढले. पदार्थ इतके सुंदर होते! कोणी केले असतील बरे ते? माझ्या डोळ्यांपुढे एकदम तो मैफिलीत बसलेल्या स्त्रियांच्या घोळक्यातील सगळ्यांत मागचा चेहरा चमकला. काय सौंदर्य! काय लज्जा! काय शालीनता! अगदी आदर्श! तिनेच बनवले असतील हे सगळे पदार्थ! तिच्या अप्रतिम हाताची अप्रतिम चवच उतरली

असणार या पदार्थांत! कुठे असेल ती आता? काय तिचे नाव? ती भेटेल का? बोलेल का? जवळ येईल का? अन्.....

माझ्या जिभेवरली चव माझ्या डोळ्यांत उतरली अन् भिरभिरू लागली. ती भावना लपवून ठेवणे मला शक्यच नव्हते आणि आवश्यकही नव्हते. कारण विज्ञानेश्वर माझा लंगोटी दोस्त होता तसा लंगोटीबद्दल बोलणाराही दोस्त होता. कुणाची कामवासना जास्त आहे, याबाबत आमचे भांडण होत असे! ज्याची बुद्धी असामान्य आहे त्याची कामवासनाही असामान्य असते असा आमचा आवडता वैज्ञानिक सिद्धान्त होता! लवकरात लवकर लग्न उरकून घेण्यावाचून मला गत्यंतरच नव्हते. त्यातून पुढे काय झाले, हे वर मी सांगितलेच आहे. या बिलंदर विज्ञानेश्वराने मात्र लग्न केलेच नाही. हा लबाड करतो तरी काय? आज प्रत्यक्ष बघायचेच! हा कसला ब्रह्मचारी! बहुधा,'भोगुनी असंख्यात नारी, हरी हा ब्रह्मचारी,' असलाच याचा योग असणार! त्यातून पुन्हा हा शास्त्रज्ञ! म्हणजे फलश्रुतीची काळजी नको! सर्व उपाय वस्तादाला अवगत असणार!

इतक्यात विज्ञानेश्वर म्हणालाच,''प्रेमेश्वरा, या डिशेस आवडल्यात तुला, पण डिशेसमध्ये लक्ष नाहीये तुझं! अं? बाकी गड्या, कळू लागल्यापासून तुझं लक्ष फक्त एकाच गोष्टीकडे!''

''मग?– प्रेम केले, प्रेम केले, प्रेम केले फक्त मी!

वाहिले त्यालाच अश्रू, शब्द आणि रक्त मी!''

''शाब्बास ! शाब्बास ! खरा अस्सल प्रेमवीर आहेस, साल्या... महाराजा, स्पेशल ड्रिंक लाव जल्दी. खास कामोत्तेजक औषधी घातलेलं. झटपट... प्रेमेश्वरा, प्रेमकाव्याच्या वाचनानं आधीच तू मला स्वर्गातल्या अप्सरांच्या वातावरणात नेऊन ठेवलं आहेस. आमचा तो मघाचचा रंगीबेरंगी, गंधीसुगंधी घोळका पाहिलास ना? सगळा नाचतोय माझ्याभोवती! त्यात आताचे हे खाणे! या खाण्यात काय होतं माहिती आहे? प्रेमाच्या प्रात्यक्षिकाला आवश्यक ती सगळी व्हिटॅमिन्स आणि उत्तेजके! आतापर्यंतच्या ड्रगच्या माऱ्यानं तुझा संयम कुठल्याकुठं उडून गेलाय! बोल, प्रेमकविता गायल्यास, आता प्रात्यक्षिक करणार काय?''

''अरे, बापरे, हे काय भलतंच! अरे, माझी वासना तुझ्यापेक्षा दसपट, शतपट, अनंतपट जबरदस्त आहे पण मी रास्त मार्गानंच जाणारा आहे.''

''जास्त बोलूच नकोस. तुला आता ते शक्यच नाही. अन् हे बघ. मी तुझा जिगरदोस्त. माझ्या वादळी वासनेवर मी काय तोडगा काढलाय हे पाहायचंय तुला?''

चोरानं आपल्या चोरीची गुरुकिल्ली आपणहून द्यायची ठरवली! मग पाहिलंच पाहिजे! इतक्या वर्षांचं रहस्य आज खुलणार! पण त्याची किंमत म्हणून इतकी वर्षं सांभाळलेलं – सांभाळताना नाकी नऊ आलेलं– शील जाणार!

''हे बघ प्रेमेश्वरा, तू खरा प्रेमवीर असशील, तर प्रीती आणि नीती यांतून प्रीतीचीच निवड करशील! मुक्त प्रीती! नीतीची बेडी घातलेली प्रीती ही खरी प्रीती आहे काय?''

‘‘पण... पण...’’

‘‘अरे, अनीतीनं वाग, असं मी तुला सांगेन काय? मी काय गुंड, बदमाश आहे अनैतिक धंदे करायला? पण... मी खराखुरा शास्त्रज्ञ आहे. तुझा मी ‘विज्ञानेश्वर’च आहे. नीती–अनीतीचा प्रश्नच मुळी उपस्थित होत नाही अशा प्रीतीच्या क्षेत्रात तुला मी घेऊन जाणार आहे! अरे यार, देखते रहो!!’’

‘‘अजब आहे!’’

विज्ञानेश्वराने त्याचे ते गडगडाटी हास्य केले. ‘‘नुसत्या कविता करू नकोस. जग त्या कविता, भोग. कविता भागायची नसते, भोगायची असते, असंच तुम्ही म्हणता ना?’’

इतक्यात रोबोमहाराज बाटली आणि ग्लास घेऊन आले.‘‘तूने पीही नही,’’असे म्हणून त्यांनी ते ग्लास आमच्या हातांत दिले. ‘‘अरे, पी. पी. ही दारू नाही. ही पारू आहे, पारू! पार करणारी–एकदम जगाच्या पार! पिऊन बघ. मद्याचे सगळे दुर्गुण काढून पद्याचे सगळे सद्‌गुण भरून हे पेय बनवलंय मी. हे पेय पी. एकदम ‘पियू’ ‘पियू’ करायला लागशील.’’

‘‘साहेब, मग मलापण प्यायला द्या,’’ रोबो महाराज एकदम म्हणाला.

‘‘हत् गाढवा!’’ विज्ञानेश्वर म्हणाला.

‘‘येथे गाढव कोण आहे? माझे नाव रोबो. आपले नाव विज्ञानेश्वर. मग यांचे नाव....’’

‘‘ए मूर्खा, पुढं बोलू नकोस.’’

‘‘पण मला हे पेय द्या ना,’’ रोबोने आपली मागणी पुढे रेटली.

‘‘हे प्रेमाचं पेय पिऊन तू रे कुणावर प्रेम करणार?’’ मी न राहवून हसून विचारले. यांत्रिक प्रियकर आणि यांत्रिक प्रेयसी यांच्या प्रणयाराधनेच्या कल्पनेनेच माझी हसून हसून मुरकुंडी वळली. मला हसू आवरेना.

‘‘आहे की आमचीही एक....’’ रोबो महाराज लाजण्याचा प्रयत्न करीत म्हणाला. हसून हसून मला रडायची वेळ आली. रोबोमहाराज पुढे काही बोलणार होता, पण विज्ञानेश्वराने एकदम उठून त्याची एक कळ दाबली. त्याला उलटी दिशा दिली आणि खोलीबाहेर धाडून दिले. एक–दोन, एक–दोन करीत रोबो महाराज निघून गेले.

‘‘अरे, तू यंत्रांच्या प्रेमात पडलास की प्रेम करणारी यंत्रं तयार केलीस?’’ मी म्हणालो.

‘‘मनुष्य म्हणजे एक यंत्रच आहे, असंच आम्ही शास्त्रज्ञ गृहीत धरत असतो!’’

‘‘अरे, पण उद्या ही रोबो यंत्रं आपल्या बायकांवर प्रेम करायला लागली तर?’’ मी घाबरून विचारले. ‘‘तर आपण रोबी बायकांवर प्रेम करावं की!’’ विज्ञानेश्वराने गगनचुंबी मजल्यांचे हास्य केले. ते सगळे मजले अंगावर पडल्यासारखा मी घाबरून स्तब्ध झालो. ते पाहून माझ्या खांद्यावर हात ठेवून विज्ञानेश्वर म्हणतो,

‘‘छोड दो, यार, अरे, तुझ्या मघाच्या प्रेमकाव्यगायनाचा काय परिणाम झालाय

तुला ठाऊक नाही. एक सुंदर तरुणी चक्क तुझ्या प्रेमात पडलीय. तुला भेटण्यासाठी ती खोळंबून राहिलीय. अँग्लो-इंडियन आहे ती. आणि 'संभोगातून समाधी' कडे नेणाऱ्या पंथाची अनुयायी आहे. चल, चल लौकर,'' विज्ञानेश्वर म्हणाला.

''अरे पण...''

''कसलीही काळजी करू नकोस. या विज्ञानेश्वरानं तुला कोणत्याही चिंतेचं कारण ठेवलेलं नाही, याची पक्की खूणगाठ बाळग आणि सगळ्या गाठी सोडवून टाक.''

इतके बोलून विज्ञानेश्वराने माझा हात धरून मला उठवलेच. 'नाही' म्हणायचे सामर्थ्य माझ्यात आता उरलेच नव्हते किंवा खरे सांगायचे तर, असेच कुणीतरी उठवायलाच हवे होते! मला मिठी मारून विज्ञानेश्वर माझ्या कानात कुजबुजला,''मी लग्न का केलं नाही याचं उत्तर तुला हवं होतं ना? आता घे उत्तर! तू लवकर तुझ्या 'कामाला' लाग म्हणजे मीही माझ्या 'कामाला' मोकळा! अरे, हीच आर्य पद्धती आहे! पूर्वी आर्य लोक पाहुण्यांचा सत्कार स्त्रिया देऊनच करीत असत. ही बघ तुझी प्रेयसी. तुला सर्वस्वदान द्यायला तयार झाली आहे. तिची निराशा करू नकोस.''

तिची निराशा कसली? माझीच निराशा मला होऊ द्यायची नव्हती. त्या अद्‌भुत रंगमहालापाशी मला सोडून देऊन, दार ओढून घेऊन विज्ञानेश्वर 'बेस्ट लक्' म्हणून निघून गेला! त्या महालात चित्रविचित्र रंगांचा नाच चालू होता. नानाविध सुगंधांच्या झुळका येत होत्या. प्रमत्त संगीताचे सूर नृत्याला प्रवृत्त करीत होते... आणि हाय, सर्व प्रकारे शृंगारलेल्या बिछान्याशेजारी ती सुंदरी... ती तीच... अधोवदन उभी होती. जादूने भारल्यासारखा मी पुढे गेलो. तिच्या जवळ जाताच 'आय लव्ह यू' असे शब्द तिच्या तोंडून बाहेर पडले आणि ती लाजेने लाल झाली. मी मंत्रमुग्धच झालो. असामान्य प्रतिभावंत कलावंताने तयार केलेले शिल्प जणू साकार होऊन समोर ठाकले होते. कधीही न आढळलेली पूर्ण प्रमाणबद्धता त्या कमनीय देहाकृतीत होती. कधीही न अनुभवलेला कमालीचा मुलायम स्पर्श त्या तनूतून होत होता. स्वर्गसुख ते याहून वेगळे काय? आहाहा! ओहोहो!! वंडरफुल! सिंप्ली वंडरफुल!! अन्‌बिलीव्हेबल!!!आयडियल!!! आदर्श!!!

क्लांत होऊन मला फारच गाढ झोप लागली. सकाळी जाग आली ती रोबो महाराजांच्या हाक मारण्याने. रोबो महाराज बेड टी घेऊन हळूच हाक मारत होते.

जागा झालो अन् मी एकदम चपापलोच. शेजारी ती सुंदरी नव्हती. अंगावर पांघरूण नव्हते... अन् कपडेही नव्हते. रोबो खुशाल माझ्याकडे पाहतच होता. यंत्रच तो! कारण काहीच नव्हते, पण लाज वाटलीच! आणि अस्सा राग आला त्या यंत्राचा-''बेशरम गुलाम!''

''माफ करा, महाशय, आपण फार दमूनभागून झोपला आहात. तेव्हा, आपल्याला उठवणं हा गुन्हाच आहे, पण आपला शीण घालवण्यासाठी आपण बेड टी आणि ब्रेकफास्ट घेणंही आवश्यकच आहे. म्हणूनच आपणाला उठवलं.'' फक्कड चहाचा घोट पोटात जाताच जीव एकदम सुखावला..

‘‘माणसापेक्षा यंत्रच चांगलं, महाराजा,’’ मी त्या रोबोला म्हटले,‘‘गुड मॉर्निंग.’’

‘‘गुड मॉर्निंग. तुम्हाला पटलं ना?’’ रोबो म्हणाला, ‘‘मग झालं तर, तुमचं आमचं जमलंच!’’

‘‘अरे, पण ती कुठे आहे?’’मी हलकेच विचारले.

‘‘साहेब तिची देखभाल करीत आहेत.’’

‘‘देखभाल?’’

‘‘हो. त्यांनी तिला उघडलीय आणि ते तिची दुरुस्ती करीत आहेत,’’ रोबो म्हणाला.

‘‘हत् गाढवा, तू यंत्रच अन् तुझी भाषा यंत्राचीच. त्यांनी तिला उघडी केलीय अन् ते तिची पाहणी करताहेत, असं म्हण,’’ मी म्हणालो.

‘‘तुम्हाला भेटायचंय तिला?’’

‘‘निश्चितच.’’

‘‘बघा, हो. मग नको म्हणाल.’’

‘‘छे, छे. असं कसं होईल? तिला भेटल्यावाचून मी कसा जाऊ?’’... ती स्वप्नसुंदरी....

‘‘मग चला तर माझ्याबरोबर.’’ डुलतडुलत रोबो महाराज निघाले आणि त्यांच्या मागोमाग आमची स्वारी. रात्रभराच्या श्रमाने अन् धुंदीने माझीही पावले यंत्रासारखीच पडत होती. लष्करात मार्चिंग करण्याचे शिक्षण पूर्वी मी घेतले होते. त्यामुळे सोबत्याच्या पावलांबरोबर पावले जुळवून टाकण्याची सवय इतकी झाली होती की नकळत रोबोबरोबरसुद्धा पावले जुळू लागली. त्या रोबो यंत्राचा आश्चर्यकारक प्रभावच इतका होता की आपणही यंत्रच आहोत, असा भास होऊ लागला! विज्ञानेश्वराच्या खोलीचे दार बंद असणार, खूप थांबावे लागणार, असेच वाटत होते. पण, ‘‘गुड मॉर्निंग,’’ विज्ञानेश्वर म्हणाला. आणि मी भानावर आलो. ‘‘व्हेरी गुड मॉर्निंग,’’ मी त्याचा हात दाबून म्हटले. त्याने माझा हात मुद्दामच खूप जोरात दाबला आणि तो मोठ्यांदा हसला. ‘‘बैस, बैस. मी काम करीत करीतच बोलतो. चालेल ना?’’ तो म्हणाला आणि आपल्या कामाला लागला. तेथे माणसांच्या उंचीचे अनेक खोके उभे होते. आणि त्या खोक्यांत ट्रँझिस्टर्स, व्हॉल्व्ह्ज, टेपरेकॉर्डर्स, मोटर्स, बॅटरीसेल्स, रंगीबेरंगी तारांची भेंडोळी, लहानमोठी यांत्रिक उपकरणे अशी रेलचेल होती. हां, म्हणजे ही रोबोंची-यांत्रिक मानवांची प्रयोगशाळाच होती तर!

‘‘अगम्य आहे बाबा तुझं हे जग आपल्याला! कमाल आहे तुझी की तू हा चालता-बोलता रोबोमहाराजा निर्माण केला आहेस! खरोखरच तू विज्ञानेश्वर आहेस, प्रतिसृष्टिनिर्माता आहेस,’’ मी भारावून बोलत राहिलो.

‘‘हे बघ, स्तुती पुरे. आज तू काय करू इच्छितोस, बोल. मला मात्र कामाला सोड. संध्याकाळी भेटू.’’

‘‘गड्या, मलापण आता जाऊ दे. तुझा नवा शोध मी पाहिला. धन्य झालो.

माझ्या नव्या कविताही तुला मी ऐकवल्याच आहेत. मलाही आता जाऊ दे.''

''अच्छा! गुड बाय्!''

''गुड बाय!.... पण...''

''आलं लक्षात! आलं लक्षात! जाण्यापूर्वी तुला त्या 'गुड बाय' ला भेटायचंय! होय ना? पण मला सांग, अगदी भेटलंच पाहिजे का? नाहीतर तुझा निरोप मी पोचवीन की.''

''असं कसं? भेटल्याशिवाय कसा जाऊ मी? जिनं मला इतकं दिलं...''

''प्रेम!'' म्हणून विज्ञानेश्वर गडगडून हसला. ''भेटायचंय ना तुला? भेट हिला. घे निरोप हिचा,'' विज्ञानेश्वर म्हणाला आणि त्याने समोरचे एक सुमारे सव्वापाच साडेपाच फूट उंचीचे खोके-रेडिओ-टीव्ही-कॉम्प्यूटरसारखे दिसणारे खोके गर्रकन वळवून उभे केले!

माझा जीव गोठला. ती ती तीच होती! जिच्या शृंगाराने मी पुरता पागल बनलो- ती एक यांत्रिक सुंदरी होती- नव्हे, यंत्रच होती! तो रोबोमहाराजा आणि ही रुबी महाराणी!

कामातुराला भय आणि लज्जा नसते, असे पूर्वीच्या युगातले सुभाषित होते. कामातुराला माणूस आणि यंत्र यांतला फरक कळू नये ना, हीच का त्या सुभाषितात विज्ञानयुगाची भर? माझी नजर खाली वळली. जमिनीवर पायाशी रंगीबेरंगी प्लॅस्टिक, रेक्झिन, नायलॉन, रबर, फोमलेदर इत्यादींचे निरनिराळे तुकडे पडले होते!

''काय हाल केलेस रे माझ्या या यंत्राचे! ओव्हर-हॉलिंगला आता किती वेळ लागेल कुणास ठाऊक!'' मेघगर्जनेसारखा विज्ञानेश्वर हसला आणि माझ्या अंगावर वीज पडल्यासारखे मला वाटले!

भानावर आलो तेव्हा तोंडून शब्द बाहेर पडले,''धन्य आहे तुझी, विज्ञानेश्वरा. पण विज्ञानेश्वरा, जग तुझ्या याच आदर्शामागे लागलं तर जगाचं काय होईल?''

*****

# मनुष्याची नवी आवृत्ती

श्री. संपादक महाशय,

आपण हे पत्र प्रसिद्ध केलेले पाहायला या जगात मी असणार नाही. पण हे वाचल्यावर आपण ते प्रसिद्ध कराल अशी मला आशा आहे. माझी काळजी करू नये. मी एक शास्त्रज्ञ आहे. त्यामुळे एक आकडी संख्येच्या काही सेकंदांत माझा खेळ खलास होईल, असे औषध मी शोधून काढलेले आहे. खेळ मुद्दामच म्हटले. मृत्यूबरोबर मी खेळच खेळेन. आयुष्याच्या नाही, पण या खेळात मी नक्कीच यशस्वी होईन आणि दुसऱ्या कोणत्या नाही पण या जगात निश्चित असणाऱ्या एका गोष्टीवर मात केल्याच्या आनंदात मी चिरकाल विलीन होईन. पुराणात आपण मरणानंतर जीवन देणाऱ्या संजीवनीची गोष्ट ऐकतो. आज जीवनातून सहजसुंदर मरण देणाऱ्या मृत्युवरदायिनीची आवश्यकता निर्माण झाली आहे. हे रसायन मी निर्माण केले आहे. पण त्याचा नमुना खिशात घेऊन मी माझ्या निवासस्थानी आल्याबरोबर माझ्या प्रयोगशाळेला अचानक आग लागून त्याचे आणि इतर अनेक शोधांचे कागद एकाएकी नष्ट झाले आहेत!

उद्याच येथे एक आंतरराष्ट्रीय शास्त्रज्ञांची सभा भरणार आहे. नेमका त्याच वेळी हा होम झालेला आहे, हे आपल्या लक्षात येईलच. या परिषदेत मुख्य विषय चर्चिला जाणार आहे – मनुष्याची हुबेहूब नवी प्रत म्हणजेच मनुष्यावृत्ती प्रकाशित करावी काय?

करू नये असे माझे मत होते आणि आहे. परिषदेसाठी मी माझ्या या विचाराची रूपरेषा तयार केली आणि माझ्या वरिष्ठांकडे पाठवली. त्यांनी मला चर्चेला बोलावून घेतले. पुढे काय झाले हे वर सांगितलेच आहे.

मी स्वत:ला शास्त्रधर्मीय मानतो. शास्त्राच्या म्हणजेच विज्ञानाच्या प्रगतीसाठी आवश्यक तो सर्व खर्च आणि त्याग केलाच पाहिजे, असेच माझे मत आहे. ज्ञानाचा शोध ज्ञानासाठीच घेतला पाहिजे. ज्ञान – मग ते मानवी जीवनाला अनुकूल असो किंवा प्रतिकूल असो– मिळवलेच पाहिजे, असेच मी मानतो. यात केवळ ज्ञानासाठी ज्ञान एवढाच हेतू नाही. तसेच प्रतिकूल असेल ते आधी बघितले म्हणजे अनुकूल असेल ते शोधता येईल, हेही नव्हे. हे सर्व खरेच आहे. पण केवलज्ञानाच्या शोधामुळे तत्त्वज्ञानाची फेररचना करता येईल आणि त्यामुळे विश्वस्वरूपावरच नवा प्रकाश पडू शकेल, हे मला आद्य महत्त्वाचे वाटले.

पण सगळ्यांत महत्त्वाची गोष्ट आहे ती ही की, हे ज्ञान खऱ्याखुऱ्या तत्त्वज्ञानी मनुष्याच्याच हाती असले पाहिजे. राजकारणी–स्वार्थ साधू पाहणाऱ्या – माणसाच्या नव्हे.

आणि हाच खरा पेच आहे. कारण मनुष्याची व्याख्याच आज राजकारणी प्राणी म्हणून करण्याची वेळ आली आहे, असे वाटते. तत्त्वज्ञानी आणि राजकारणी ही मनुष्यजातीची दोन विरुद्ध टोके झाली आहेत. सत्तेविना अर्थ नाही आणि अर्थाविना ज्ञान नाही; आणि सत्ता तर राजकारण्यांची दासी. असा सगळा अनर्थ झाला आहे.

माझे वरिष्ठ डॉ. महेश विश्वनाथ हे विश्वप्रसिद्ध शास्त्रज्ञ आहेत. विश्वात सतत दौरे करीत राहून विश्वनाथ हे आपले नाव त्यांनी सिद्ध केलेले आहे. जगात काय संशोधन चालू आहे हे ते आम्हा हाताखालच्या लोकांना येऊन सांगतात आणि आपल्याला काय हवे आहे त्याच्या सूचना देतात. लगेच ते जगात काय चालले आहे ते पाहायला आणि आपण काय करीत आहोत ते सांगायला निघून जातात.

डॉ. विश्वनाथ यांच्या केबिनमध्ये मी जाताच उठून समोर येऊन हातांत हात घेऊन 'गुड मॉर्निंग' म्हणून त्यांनी माझे स्वागत केले, मला खुर्चीत बसवले. आणि माझ्यासाठी कडक कॉफीही मागवली. नाही म्हटले तरी अशा मानसन्मानाचा दबाव थोडा तरी येतोच.

''तुमच्या विचारांची रूपरेषा वाचली. तुम्ही खूपच विचार केलेला आहे, पण थोडी चर्चा केली तर चालेल ना?''

त्यांनी खालच्या सुरात विचारले. मी मानेनेच हो म्हटले. त्यावर ते सावकाश म्हणाले, ''अहो, सगळ्या जगात समानावृत्तीचे– क्लोनिंगचे प्रयोग चालू आहेत. कुठे मेंढीची, कुठे सूकराची, कुठे मर्कटाची समानावृत्ती काढण्यात आली, हे तुम्हाला माहीतच आहे. आता सगळीकडे एकच चर्चा चालू आहे. ती म्हणजे मनुष्यावृत्तीची. पण नैतिक तत्त्वज्ञानी लोक संशोधनात अडथळे आणीत आहेत. तरीसुद्धा कुणी ना कुणी शास्त्रज्ञ मनुष्याची पुनरावृत्ती काढणारच, यात शंका नाही. मग आपणच यात मागे राहून चालेल काय? खरं तर, आपणसुद्धा जगाच्या बरोबर आहोत. आपण जर प्रथम मनुष्यावृत्ती सिद्ध केली तर आपण जगाच्या पुढं आहोत, असं आपण जगाला नाही का दाखवू शकणार? आपल्या संस्थेचं नाव 'नूतन विज्ञान संशोधन' हे आहे. ते मनुष्यावृत्तीमुळे सार्थच नाही का होणार?''

''सर,'' मी म्हटले,''मेंढी, सूकर, मर्कट यांच्या पुनरावृत्ती करण्यात आल्या. मग तेच तंत्र वापरून मनुष्यावृत्ती करायची यात नवीन काय आहे?''

''असं कसं म्हणता? ही पुनरावृत्ती नाही, ही पुढली पायरी आहे. उत्क्रांतीत ज्याप्रमाणं प्राण्याच्या अवस्थेतून मनुष्याची अवस्था ही प्रगतीची झेप झाली, तशीच इथंही होणार नाही का?''

''नाही. प्राण्याचा मेंदू आणि मनुष्याचा मेंदू यांत मूलभूत स्वरूपाचा नवीन, प्रगत, अपूर्व, अतुलनीय फरक होता. पण मनुष्याची पुनरावृत्ती करण्यात एकाच साच्यातून नवीन वाटणारी पण तीच असणारी मूर्ती काढण्यात मला तरी विशेष काहीच अर्थ वाटत नाही. आपण म्हणालात ते बरोबरच आहे. उत्क्रांती पाहिजे आहे. मानवाच्या मानवी मर्यादा ओलांडून पुढे जाणारा नवाच अवतार जन्माला आला पाहिजे. पूर्वी

मर्कटसदृश प्राण्याचा मनुष्य झाला तो केवळ नैसर्गिक योगायोगानं झाला. आता मनुष्यातून नवा प्रकार, नवा आकार, नवाच विचार करणारा नवा मेंदू तयार झाला पाहिजे. आणि आपण तो कृत्रिम उपायांनी लवकर घडवला पाहिजे. आजचा मनुष्य मुळात अगदी जुनाच राहिला आहे. त्यामुळं नव्या विज्ञानयुगात त्याला प्रगतीशी जुळवून घेता येत नाही. ज्ञानाचा नित्य नवेपणा आणि मनुष्याचा जुनेपणा यांतला फरक आता इतका ताणला गेला आहे की तो तुटायला आला आहे. हे तुटणे हा मनुष्याचा अंतच आहे. घोडा चौखूर उधळला आहे आणि मनुष्य घोड्याच्या शेपटीकडे तोंड करून बसला आहे. तो फेकला गेल्याशिवाय राहील काय? आणि फेकला गेल्यावर मेल्याशिवाय राहील काय? बहुसंख्य माणसांकडे बघितल्यावर असं वाटतं की, जुन्या रूढी, जुने धर्म, जुनी समाजकारणं, जुनी राजकारणं टाकून देऊन नव्या रीती, नव्या जीवनशैली, नवी समाजकारणं, नवी राजकारणं, नवी अर्थकारणं स्वीकारण्याची कुवतच या जुन्या माणसांत नाही. अशा माणसांची लोकसंख्या आज बुडणाऱ्या जहाजात नव्यानं चढणाऱ्या उतारूंच्या वाढत्या लोंढ्यांसारखी झाली आहे. यात आणखी असल्याच उतारूंची भर घालणं शहाणपणाचं होईल काय? स्वत:चं मरण दिसत असूनही ज्याला समजत नाही, जो त्या मरणाकडेच वाढत्या वेगानं धावत चालला आहे, त्याला त्याच्यामागे पळणारे लोक करून द्यायचे काय? आम्हांला नवीनच माणूस जन्माला घातला पाहिजे. आमचं जैविक तंत्रज्ञान खूप प्रगत झालं आहे. आम्हांला नवजैविक प्रारूपशास्त्र निर्माण करून विकसित केलं पाहिजे.''

''अहो, या तुमच्या कल्पनाच अवास्तव आहेत. याला किती खर्च येईल, याची तुम्हाला कल्पना आहे का?''

''खर्च फारच मोठा आहे. म्हणूनच सध्याच्या पुनरावृत्तीचा खर्च वाचवून इकडे वळवला पाहिजे.''

''हे शक्य नाही. तुम्ही निराशावादी आहात. तुम्ही तुच्छतावादी आहात. तुम्ही मनुष्यप्रतिष्ठेचे तत्त्व झुगारणारे आहात.''

''नाही, नाही, मी आशावादीच आहे. मानवातून पुढे येऊ शकणाऱ्या नव्या जीवाची प्रारूपं पाहणारा मी ध्येयवादी आहे.''

''या केवळ कविकल्पना आहेत. वाटेवरच्या खड्ड्यांकडे न पाहता आकाशाकडे तोंड करून चालण्याचा हा वेडेपणा आहे.''

''सगळ्या क्रांत्या लोकांना आधी अशाच वाटल्या होत्या.''

''उगीच क्षितिजाला हात लावण्याच्या गप्पा मारण्यात काय फायदा? जवळ काय जळतंय पाहा. मनुष्यावृत्ती हे निपुत्रिकांना वरदान आहे.''

''निपुत्रिक बाईला तिच्याच पेशीची मुलगी झाली तर ती तिची कन्या कशी होईल? ती तीच होईल, आणि अशा व्यक्तीचं जोडपं असेल तर तो अशा मुलीला आपली छोटी मुलगी नव्हे तर छोटी बायको नाही का म्हणणार अन् मुलगा असेल तर ती बाई त्याला आपला छोटा नवरा नाही का म्हणणार? ही मुलं मोठी झाल्यावर त्यांचं या

तथाकथित आईवडिलांशी आणि एकमेकांशी नातं काय राहणार? आधीच मुलं असलेल्या जोडप्यांनी पुनरावृत्ती केल्या तर आधीची मुलं या नव्या छोट्या आवृत्त्यांना आपले छोटे वडील, आपली छोटी आई म्हणणार का?''

''हे सगळे शब्दांचे खेळ आहेत. आजच्या श्रेष्ठ मनुष्यांची पुनरावृत्ती करणं हे आपलं कर्तव्यच मानलं पाहिजे.''

''श्रेष्ठ कोण हे कुणी ठरवायचं? अन् त्यासाठी स्वत:ला कनिष्ठ मानून इतरांनी खर्च का करायचा?''

''ही लोकशाहीची समस्या आहे. असो. फार वेळ झाला. परिषदेची तयारी करायची आहे. भोजनविश्रांतीची वेळ आहे. आपण निघू या. तुमच्या खोलीची किल्ली जरा देता का? तुमचा निबंध शिपायाकडून आणवून घेतो. आणि त्याच्या परिषदेसाठी प्रती काढतो. द्या...थँक्यू.'' डॉ. विश्वनाथांनी चर्चा तिथंच संपवली.

आणि नंतर शॉर्ट सर्किटने माझ्या खोलीला आग लागल्याचे कळले. आगीचे बंब आले – सर्व काही अग्नये स्वाहा: झाल्यावर. माझा नवा निबंध, माझे अन्य शोध, प्रबंध जळणं, म्हणजे मी स्वत:च जळून जाणे होय.

डॉ. विश्वनाथ यांना मी जवळून पाहिले आहे. चांगले पाहिले आहे. त्यांच्याविषयी जवळचे, दूरचे शास्त्रज्ञ आणि परिचित काय बोलतात ते ऐकले आहे. ते स्वत:चीच मनुष्यावृत्ती काढणार आहेत. त्यांना मनुष्यावर हा प्रयोग प्रथम केल्याचा मान मिळवायचा आहे. आपल्यामागे आपली आवृत्ती, त्या आवृत्तीमागे तिची आवृत्ती अशी अखंड मालिका होऊन आपल्याला अमरपण मिळावे इतके आपण महान आहोत असा त्यांचा स्वाभिमान – खरे तर गर्व – आहे. आणि या अमरपणासाठी लागणारी किंमत ते स्वत:ची मनुष्यावृत्ती जगभर मदारीच्या अस्वलासारखी मिरवून मोठा लाभ जमा करणार आहेत.

त्यांच्या मार्गातला सगळ्यांत मोठा अडथळा मी आहे. हे त्यांना पक्के ठाऊक आहे हे मलाही पक्के ठाऊक आहे. आगीत माझेच शोधनिबंध जळाले; पण त्यांनी ते पळवून सांभाळून ठेवले आहेत आणि त्यांचे निबंध मीच पळवून जाळले म्हणून माझी चौकशी करण्याचा घाट त्यांनी घातला आहे.

संपादकमहाशय, सगळ्यांत श्रेष्ठ म्हणून मानल्या जाणाऱ्या व्यक्तीची ही अशी गोष्ट आहे! अशा व्यक्तीच्याच नव्या आवृत्ती काढायच्या काय? जे जग अशा व्यक्तींनी गर्दी केल्यामुळे आधीच दूषित झालेले आहे, त्याचा निरोप घेणेच मला योग्य वाटते.

धन्यवाद ! धन्यवाद !! धन्यवाद !!!

आपला कृपाभिलाषी,
एक अयशस्वी शास्त्रज्ञ.

*****

# शुभमंगल! विज्ञान!!

मला एक भयंकर दु:स्वप्न पडलं. काही केल्या ते मनातनं जाईना. दु:स्वप्नाला, खरं तर, भयंकर म्हणायचं कारणच नाही. दु:स्वप्न म्हणजेच भयंकर स्वप्न. पण भयंकर शब्दानंही त्याचं भयंकरपण सांगता येणार नाही. ते स्वप्नच सांगितलं पाहिजे.

काळ तसा नक्की सांगता येणार नाही. म्हटलं तर, बराच दूरचा. म्हटलं तर, बराच जवळचा. जगाची लोकसंख्या कित्येक हजार कोटी झालेली. प्रगतीही खूप झालेली. त्यामुळं नैसर्गिक साधनसंपत्ती संपत आलेली आणि उरलेल्या साधनसंपत्तीसाठी प्रगत शस्त्रास्त्रांनी महायुद्धं चाललेली. जिकडे तिकडे प्रचंड संख्येनं प्रेतं पडलेली. जाळणार कोण? कशानं? पुरणार कोण? कुठं? प्रेत पाहण्याचं, प्रेताच्या दुर्गंधीचं कुणाला काही वाटेनासं झालेलं. सगळ्या लोकांना फक्त एकच जाणीव राहिलेली – भूक. प्रचंड भूक. आताची भूक संपली की नंतरची भूक. नंतरची भूक संपली की उद्याची भूक. भूक, भूक करत लोकांचे लोंढेच्या लोंढे सारखे धावत असलेले. वाटेल तितकं सोनं, चांदी, रत्नं, मोती देऊनसुद्धा अन्नाचा कण कोणी देईना. मरणाऱ्याच्या हातांतलं उरलेलं उष्टं अन्न ओढून लोक आपल्या तोंडांत घालू लागलेले. झोपडपट्ट्या उंच हवेल्यांत चढलेल्या. हवेल्यांतले लोक अन्नाच्या पिशव्या पोटाशी धरून टेरेसवर चाललेले. भुकेले त्यांच्या मागे लागलेले. भीतीनं पिशव्यावाले उंच उंच इमारतींवरून उड्या मारू लागलेले. त्यांच्या पाठोपाठ भुकेलेले. मरतानासुद्धा अन्नाचा, धान्याचा कण जरी मिळाला तरी तोंडात घालू लागलेले. धान्याची कोठारं केव्हाच नाहीशी झालेली. अन्नाच्या शोधात धावून पळून थकलेली माणसं त्यांतच थोडावेळ पडू लागलेली.

शेवटी जमिनीवरलं सगळं धान्य संपलं. जिकडे-तिकडे एकच वार्ता–जगातलं सगळं धान्य संपलं. बियाणं म्हणून राखून ठेवलेलंसुद्धा लोकांनी ओरबाडून संपवलेलं. लोकांच्या लोंढ्यात राखणदार केव्हाच बुडून गेलेले. तेही ओरबाडण्यात सामील झालेले. मग लोकांचे मोर्चे जनावरांकडे वळले. कट्टर शाकाहारीसुद्धा कच्चं मांस खाऊ लागले. प्राणी मारायला वेळ कुणाला? एकेका प्राण्याला अनेकानेक लोक आपल्याकडे ओढून खाऊ लागलेले. शेवटी प्राणीही संपले. मग लोकांचं लक्ष पक्ष्यांकडे गेलं, कितीही उंच उडाला तरी पक्षी केव्हातरी कुठेतरी उतरणारच आणि तिथं लोकांचा लोंढा असणारच. शेवटी पक्षीही संपले. कीडमुंगी, साप, सरडे, अळी, फुलपाखरू काहीही नाही राहिलेलं. मग लोकांची धाव समुद्रावर जाऊन लोक जलचरांवर ताव मारू लागले. प्रगत प्रचंड बोटी होत्या. समुद्रतळाला जाणाऱ्या पाणबुड्याही होत्या. शेवटी सगळे जलचर फस्त झाले. मग लोकांचे लोंढे जंगलांकडे वळले आणि पानं-पाला खाऊ लागले. गवत-चारा खाऊ

लागले. फुलं खाऊ लागले. काटे खाऊ लागले. शेवटी तेही संपले. जिकडे तिकडे फक्त माणसांचे सापळेच उरले. हे सापळेच एकमेकांना खाऊ लागले. ज्याला जमेल तो ज्याला जमेल त्याला खाऊ लागला. एकजण दुसऱ्याला खातो आहे तोच तिसरा त्यालाही खातो आहे. दुबळ्या मुलांना आईबाप आणि दुबळ्या आईबापांना मुलं खाऊ लागली. अजून माणसं माणसांना जन्माला घालतच होती. मातांना दूध येत नव्हतं पण मुलं होतच होती. आणि लोक वाटच बघत होते. काही लोकांना तेवढाही दम नव्हता. पुरुषांना नव्हता. बायकांनाही नव्हता. भुकेनं वेडे झालेले लोक शेवटी तोंडात माती कोंबण्याचा प्रयत्न करीत होते. शेवटी मनुष्यजात संपली. सगळी सृष्टी म्हणजे एक हाडांची टोपली झाली. उन्हाळा, पावसाळा, हिवाळा–चक्र चालूच होतं. त्या हाडांचा चुरा झाला, भुगा झाला. मातीत मिसळला. उंच उंच इमारती भुईसपाट झाल्या. भूमीत विरून गेल्या. सगळ्या धातूंची विविध उपकरणं गंजून जाऊन त्यांतच मिसळली. एक प्रचंड मिश्रण झालं. भूकंप, ज्वालामुखी, वादळं, विजा– सगळे उत्पात होतच होते. शेवटी सूर्यही विझत चालला. विझण्यापूर्वी दिवा मोठा होतो तसा सूर्यही मोठा झाला आणि त्यानं पृथ्वीचा ग्रास घेतला. शेवटी सूर्य संपला. सूर्यमाला संपली. आकाशगंगा संपली. ब्रह्मांड संपलं.

आणि मी मोठ्यानं ओरडलो. ब्रह्मांड संपलं. सगळंच संपलं. स्वप्नही संपलंच. म्हणून मी जागा झालो. उठून बसलो. बायको विचारत होती, ‘जागे झालात का? पाणी प्या आणि शांत झोपा.’ तिनं घरातले सगळे दिवे लावून ठेवले होते. एका हातात पाणी घेऊन दुसऱ्या हातानं ती मला हलवीतच होती. पुन: पुन: विचारीत होती. ‘काय झालं? काय झालं? काय झालं?’ मी म्हटलं, ‘स्वप्न पडलं. फार वाईट स्वप्न पडलं.’ ती म्हणाली, ‘उद्या सांगा. आता झोपा. संपलंय ना ते?’ मी म्हटलं, ‘सगळं संपलं!’ ती म्हणाली, ‘मग झोपा सुखानं.’ तिनं मला चांगलं पाणी पाजलं. पेला बाजूला ठेवून तिनं मला आडवं केलं. अंगावर पांघरूण घातलं, म्हणाली, ‘दिवे विझवते म्हणजे शांत झोप लागेल.’ मनात म्हटलं, ‘झोप लागली अन् पुन: स्वप्न पडलं तर?’

कारण, हे स्वप्न की सत्य? उद्याचं असेल, परवाचं असेल; पण हेच तर सत्य नसेल? काळ म्हणे मोठा. पण संपणारच ना? काय करावं? कुठं जावं? कुणाला सांगावं? कुणाला विचारावं? बायकांचं बरं असतं. बायका दिसतात स्वप्नाळू पण पक्क्या व्यवहारी असतात. त्यांचं सगळं लक्ष चालू क्षणात. आज जेवण काय करायचं? भाजी कोणती करायची? कोशिंबीर कसली करायची? चटणी कुठली करायची? बायकोला हे स्वप्न सांगितलं असतं तर ती नुसती हसतच सुटली नसती तर जगातल्या सगळ्या बायकांना सांगत सुटली असती आणि मग जगातल्या सगळ्या बायका त्यांच्या रोजच्या न संपणाऱ्या जेवणगप्पांना माझं स्वप्न चटणीसारखं तोंडी लावत बसल्या असत्या. आणि माझं मन भयाकुल होऊन आतल्या आत रडत असताना त्या उचकी लागेपर्यंत हसत राहिल्या असत्या.

*****

डॉ. विश्वनाथ ब्रह्मे यांचं नाव विश्वरचनाशास्त्राचे पंडित म्हणून जगात गाजत होतं. त्यांचे शोधनिबंध जगन्मान्य झालेले होते. पण विज्ञान लोकप्रिय व्हावं, मुलांना लहानपणीच शक्य तर सातवं वर्ष पूर्ण होण्यापूर्वीच विज्ञानाची प्राथमिक तत्त्वं कळावीत, वैज्ञानिक दृष्टिकोन यावा, शोधबुद्धी जडावी, म्हणून त्यांनी अनेक सोपी मनोरंजक पुस्तकं तयार केली होती आणि अनेक सुंदर उपकरणंही बनवली होती. त्यांतलं एक उपकरण मला फार आवडलं होतं आणि ते मी माझ्या मुलाला वाढदिवसाची भेट म्हणून दिलं होतं. ती एक दुर्बीण होती. काळोख्या रात्री तिच्यातून आकाशनिरीक्षण करायला फार मजा वाटे. या दुर्बिणीच्या काचेच्या वर बसविण्यासाठी सत्तावीस नक्षत्रांच्या सत्तावीस अपारदर्शक प्लॅस्टिकच्या चकत्या वेगवेगळ्या नक्षत्रांची भोकं पाडलेल्या होत्या. दुर्बिणीतून त्या भोकांतून फक्त त्या नक्षत्राचेच तारे दिसत. आणि त्याच वेळी लाल रंगाची त्या नक्षत्राची आकृतीही चमके, मध्ये त्या नक्षत्राचं नावही चमके. मुलांना नक्षत्रांची ओळख इतक्या सुंदर रीतीनं पूर्वी कुणीच करून दिलेली नव्हती. आताचं युग हे नक्षत्रयुगच म्हटलं पाहिजे. पृथ्वीचा प्रवास तर आता पोरखेळच झाला आहे. केव्हाही कुठंही जाता येतं. इतकंच नव्हे, तर अवकाशपर्यटनसुद्धा सुरू झालेलंच आहे. आता खरोखर नक्षत्रांशीच संपर्क साधला पाहिजे. डॉ. ब्रह्मे यांनी तयार केलेली ही दुर्बीण हे एक नक्षत्रयुगाचं प्रतीकच होतं. जगभर हे लोकप्रिय झालेलं होतं. त्यांतून त्यांना प्रचंड पैसा मिळालेला होता आणि साहजिकच त्यांनी तो परत संशोधनात गुंतवला होता.

पण डॉ. ब्रह्मे यांची भेट मिळणं अशक्यच होतं. त्यांना वेळ वाया गेलेला मुळीच खपत नसे. बायको-मुलांत वेळ जाऊ नये म्हणून त्यांनी लग्नही केलेलं नव्हतं. हिमालयात एका शिखरावर त्यांनी प्रयोगशाळा उभारली होती. प्रदूषित हवा खूप खाली राहिल्याकारणानं तारे, नक्षत्रं स्वच्छ दिसत म्हणून; आणि कोणी त्रास द्यायला नको म्हणून! त्या ठिकाणी एखादा गौरीशंकरवीरच जायचा! शिवाय, अथांग शांतता, चिंतनाला उत्तम. गर्दी, गडबड, गोंधळ नाव नको. डॉ. ब्रह्मे यांचं संशोधन सगळ्या माणसांसाठीच चाललं होतं. पण माणसाचा संसर्ग मात्र त्यांना नकोच होता. माझ्यासारख्या विज्ञानाचे सगळे लाभ हवे असलेल्या पण संसारात रमलेल्या माणसाला हा विश्वनाथ देव कसा प्रसन्न होणार?

अरे, हो! आपल्या घरी विश्वसूत्रधार इंटरनेट आहेच की! डॉक्टरसाहेब संशोधन करतात म्हणजे सगळ्या संशोधनक्षेत्रांशी संपर्क साधून असणारच. आपली संशोधनं ते सतत प्रसिद्ध करीत असतात. तेव्हा प्रकाशकांशी तरी संबंध ठेवणारच. आणि, विश्वाचं संशोधन करणाऱ्या शास्त्रज्ञाला विश्वाचीच वार्ता नाही, असं कसं होईल? जगातल्या घडामोडींचं दुर्बिणीसारखं त्या विश्वसूत्रधाराच्या साह्यानं ते कधी ना कधी निरीक्षण करीत असणारच. बरोबर. हा विश्वसूत्रधार आपलं सूत्र जुळवून देणार. मग मी ते स्वप्न थोडक्यात लिहून, हे खरं की खोटं, खरं असल्यास त्याला कसं सामोरं जावं, असा प्रश्न करून त्यांच्या प्रकाशकाच्या पत्त्यावर पाठवून दिलं. प्रकाशकानं ते त्यांच्या पत्त्यावर

धाडलं, आणि काय आश्चर्य, माझा विश्वसूत्रधार नान्दी गाऊ लागला! डॉ. ब्रह्मे लिहीत होते, 'हेच स्वप्न मलाही पडलं. तुमचा प्रश्न मलाही पडला. त्याचं उत्तरही मला सापडलं आहे. ते मी प्रकाशित करीतच आहे. पण तत्पूर्वी माझ्या स्वप्नबंधूला म्हणजे तुम्हाला प्रत्यक्ष भेटावं अशी माझी फार इच्छा आहे. चर्चेनं माझे विचार अधिक स्पष्ट होतील आणि माझं उत्तर जगातल्या माणसाला कसं भावेल, हेही मला कळेल. माझ्या प्रकाशकाकडून दुसऱ्या कुणालाही, बायकोमुलालाही न सांगण्याच्या अटीवर माझा पत्ता घ्या आणि ताबडतोब या. माझी भेट! तेव्हा उत्तम शुभ मुहूर्त पाहा. ईश्वरास स्मरून संकल्प सोडा. इष्ट देवतेची षोडशोपचारे पूजा करा. प्रार्थना करा. आरती करा. आणि तीर्थ, प्रसाद, अंगारा इत्यादी इत्यादी घेऊन या.या.'

त्यांचं उत्तर आलं म्हणून मला मोठेपणा वाटला. पण त्यांची श्रद्धा पाहून जावं की नाही असंच मनात आलं. हिमालयात जाऊन या शास्त्रज्ञाचा बुवाच झाला की काय? हा आपल्याला शिष्य करून दीक्षा देणार की काय? आपण परत येऊ शकणार की नाही? बायकोमुलांचं काय होईल? स्वप्नासारखीच भीती वाटली. भीतीसुद्धा माणसाला धीट करते. मी परत विश्वसूत्रधारामार्फत विचारलं,'डॉक्टरसाहेब, आपण शास्त्रज्ञ की संन्यासी? आणि विज्ञानशास्त्र अभ्यासिता की धर्मशास्त्र? कृपया, कळवावे.' पुन: तत्क्षणी विश्वसूत्रधार हसला. त्याची चकाकणारी दंतपंक्ती अक्षररूपानं दिसली. डॉक्टरमहाशय म्हणत होते,'शाब्बास! हाच प्रश्न मला हवा होता. घाबरू नका. मी शास्त्रज्ञच आहे. साधुबुवा नाही. प्रश्न विचारणारा वैज्ञानिक दृष्टीनं विचारीत असेल तरच वैज्ञानिक उत्तर त्याला कळणार. उगीच पाया पडून जन्मकल्याणाचं पुण्य मागणारे भाविक मला नकोत. त्यात ज्यांना समाधान मानावंसं वाटतं त्यांची धन्य आहे. पण मी त्यांच्या उपयोगी पडू शकत नाही. तुम्ही हा प्रश्न विचारला नसतात तर प्रकाशकांकडून माझा पत्ता तुम्हाला मिळालाच नसता. आपलं स्वप्न एक आहे. आपला प्रश्न एक आहे. आपली रीत एक आहे. आपण बोलू शकतो. तुमच्या भेटीनं मला आनंदच वाटेल. मला भेट देऊन तुम्ही मलाच उपकृत करत आहात. मी तुमची वाटच पाहत आहे. या. मी आता कामाला जातो; पण तुम्ही उठण्यापूर्वी माझ्या सूचना वाचा आणि लक्षात ठेवा. लिहून घेऊ नका.'

त्यांच्या सूचनांप्रमाणं हिमालयातल्या एका उंच खिंडीत खास गाडीतून मी येऊन तर पोचलो. जंगलं, तुरळक वस्ती केव्हाच खूप खाली राहिली होती. उरली होती फक्त एक पांढरी रेशमी चादर सगळ्या डोंगरांवर पांघरलेली. सूचनांप्रमाणे टॅक्सीवाल्याला 'जा' म्हणून सांगितलं. तोसुद्धा घाबरला. म्हणाला, 'साहेब, इथं तुम्हाला तास-दोन तासच थांबता येईल. मी थांबतो. परत कसं जाणार?' पण डॉ. ब्रह्मे यांना आपलं स्थान यात्रास्थल किंवा पर्यटन केंद्र बनवायचं नव्हतं. जिवाचा धडा करून मी टॅक्सीवाल्याला परतायला सांगितलं. आसपास काही म्हणजे काही नव्हतं. फक्त बर्फ, बर्फ आणि बर्फ. ही खिंड आणि समोर एक शिखर, बस्स. वेळ जात चालला तशी भीती वाढत चालली. म्हटलं, चांगला वेडेपणा झाला. आता काही नाही - थंडीनं आणि भुकेनं मरायचं. त्या

स्वप्नाची सुरुवात आपणच अशी करायची. इतक्यात आकाशात एक तांबडा ठिपका दिसला आणि पाहता पाहता मोठा होऊन उतरू लागला. ते बलून होतं. माझ्यासमोर ते बलून तरंगत राहिलं. त्याला झोपाळ्यासारखी लोंबती खुर्ची होती. समोर येताच खुर्चीच्या हातांवरची पट्टी बाजूला झाली आणि मी बसताच परत पक्की बसली. मी बसताच बलून उडालं. म्हटलं, छान. हे चालकरहित बलून. कुठंतरी भरकटलं, तर? खालची खोली बघून डोळे मिटावेसे वाटत होते पण कधी नव्हे ते दिसणारं दृश्य बघून पाहावंसंही वाटत होतं. नशीब. फार वेळ लागला नाही. ते बलून त्या शिखरापाशी गेलं. तिथंही काहीच नाही का! नुसतंच शिखर. ते बलून बरोबर शिखरावर थांबलं. म्हटलं, आपण जर इथे पडलो तर शिखर आपले तुकडे करणार आणि ते घरंगळत भूमीच्या पोटात जाणार. पण शिखरच उघडलं. खुर्ची आत शिरून एका फलाटावर स्थिर झाली. बलूनची हवा सुटली. ते मिटलं, घडी होत होत आत आलं, शिखर बंद झालं आणि खुर्चीच्या हातांवरची पट्टी उघडली.

समोर डॉ. ब्रह्मे मोठ्यानं हसत होते, त्यांची पांढरी दाढी छातीवर येत होती आणि डोक्यावरचे पांढरे केस खांद्यावरून खाली लोंबत होते. त्यांनी अंगावर सैलसर पांढरा अंगरखा घातला होता. त्यांच्या चष्म्याच्या दांड्याही जाड होत्या आणि पांढऱ्या शुभ्र होत्या. 'अभिनंदन! अभिनंदन!!' ते मला मिठी मारून मोठ्यानं ओरडले अन् म्हणाले 'छान! तुम्ही हिमालयवीराचं धैर्य दाखविलंत. अहो, मागे एकजण त्या खिंडीपर्यंत आले. पण टॅक्सीतून उतरायलाच तयार होईनात. तसेच परतले. मला भीती वाटली, आपला पत्ता आता जगाला कळणार. पण लगेच म्हटलं, तो माणूस आपला मूर्खपणा जगाला सांगेलच कसा आणि सांगितलाच तरी त्यावर कोणाचा विश्वास बसेलच कसा! तसंच झालं! आज तुम्ही आलात. अहो, धैर्य दाखविल्याशिवाय आणि अशा उंचीवर आल्याशिवाय सत्य दिसतं काय?'आणि ते मोठ्यांदा हसले.

त्या हास्याचा प्रतिध्वनी त्या रिकाम्या प्रयोगशाळेत घुमत राहिला आणि तेथल्या सगळ्या काचेच्या नळ्या, काचेचे चंबू, काचेची चंचुपात्रं, काचेच्या बाटल्या एकमेकींना मिठ्या मारून एकमेकांवर आपटून गाताहेत, खिदळताहेत, म्हणून किणकिणताहेत असं वाटू लागलं. अंगावर शहारा आला. हे स्वप्न तर नसेल? ही भुताटकी तर नसेल? डॉक्टर ब्रह्मे ब्रह्मीभूत होऊन भूत तर झालेले नसतील? मी हळूच स्वत:लाच जोरात चिमटा काढून बघितला. चिमटा दुखला. चांगलाच दुखला खरा. पण आपण, आपलं शरीर, आपला चिमटा, त्याचं दुखणं.... सगळंच भास-आभास तर नसेल?

'नमस्कार, डॉक्टर महाशय, नमस्कार, माफ करा. इतक्या वेगळ्या आणि विचित्र विश्वात आल्यानं मला नमस्कार म्हणायलासुद्धा उशीर झाला,' मी म्हटलं. त्यावर हसून डॉक्टर म्हणाले,'नमस्कार, तुम्हाला वेगळं आणि विचित्र वाटणार, हे खरंच आहे. तुम्ही तुमच्या पृथ्वीवर नाहीच आहात.' अधिकच घाबरून मी किंचित ओरडलोच,

'म्हणजे?' 'तुम्ही चंद्रावर आहात.' हा माणूस भूत की वेडा की दोन्ही, कळेचना. ते ओळखून मोठ्यानं हसून ते म्हणाले, 'आधी आपण बसू या. शिस्तीत खाणंपिणं करू या. ते करता करताच बोलू या.'आणि त्यांनी चार मोठ्या टाळ्या वाजवल्या. त्याबरोबर चार कोपऱ्यांतून दोन पुरुष आणि दोन स्त्रिया हातांत ट्रे घेऊन बाहेर पडल्या आणि एकामागे एक रांग करून शिस्तीत समोर आल्या. एक म्हणाला,'गरम पाणी, साबण, टॉवेल.' मी हात, तोंड धुतलं. डॉक्टरसाहेबांसाठी त्यानं तसंच पण वेगळं सामान आणलं होतं. त्यांनीही हात, तोंड धुतलं. दुसऱ्या सेवकानं टेबलावर डिशेस, बाऊल्स, काटे, चमचे, सुऱ्या ठेवल्या. मग एका सेविकेनं पाणी, चहा, पाव, लोणी, वडे, सामोसे, केळी, सफरचंद ठेवली. दुसऱ्या सेविकेनं गुलाबाची फुलं शर्टांवर लावली. गळ्यात मोगऱ्याच्या फुलांच्या माळा घातल्या. हातात बकुळांच्या फुलांचे वळेसर घातले आणि इतकं करूनही वर,'सुस्वागतम्! आपण आम्हांला प्रिय आहात. फार आनंद वाटला. इथं अगदी आरामात राहा. आपली मी काय सेवा करू?' म्हटलं, आणि अतिशय गोड हसून बघितलं! आपण मरून स्वर्गात तर आलो नाही ना, असं मला वाटलं. पण या अप्सरा आणि त्यांच्या लाघवी हालचाली , वर सुहास्य, बघून माझ्या मध्यमवर्गीय मनाला भीतीच वाटली. दरदरून घाम फुटायची वेळ आली. ते पाहून मोठ्यांदा हसून डॉक्टरमहाशय म्हणाले,'अहो, घाबरू नका. हे सगळे रोबो आहेत. तुम्हाला मी सांगितलं ना, तुम्ही चंद्रावर आहात म्हणून. अहो, चंद्रावर माणसांनी कामं करायची तर किती अन्न, किती पाणी, किती प्राणवायू लागेल! रोबोंना यांतलं काहीच लागणार नाही. रोबोंना फक्त वीज लागेल आणि ती सूर्याच्या उन्हानं मिळेल. चंद्रावरच्या शेतीचे प्रयोग मी करीत आहे. कोणत्या भागात कोणतं पीक चांगलं येईल, हे ठरवीत आहे. चांगलं गवत कुठं वाढेल, दुभती जनावरं कुठं वाढतील, हे ठरवीत आहे. त्यातूनच ही न्यारी न्याहारी तयार केली आहे, घ्या. छान आहे की नाही?'

'फारच छान, डॉक्टरसाहेब, चंद्रावरच्या कल्पित कवितांपेक्षासुद्धा हे वास्तव पदार्थ जास्तच छान आहेत. डॉक्टरसाहेब, चंद्रावरच्या पिकांतून तयार केलेल्या पदार्थांची दिवाळी किती छान होईल, नाही? आणि, चंद्रावरचे पेढे, चंद्रावरची बर्फी ! वा:! वा:! वा:! ती खरी मानवजातीची दिवाळी! डॉक्टरसाहेब, तृष्णासूर आणि क्षुधासूर यांचा वध करून तुम्ही मानवजातीची दीपावली करणार!'

'थांबा,' डॉक्टरसाहेब माझ्या खांद्यावर हात ठेवून म्हणाले आणि पुढे बोलू लागले,'अहो, चंद्रावरचं जेवणही माणसांना पुरेनासं झालं तर मंगळ आहेच की!'

'वा:! वा:! वा:! हा मंगळ तर आपली चंगळच करील. मंगळावरचं श्रीखंड! मंगळावरची बासुंदी! मंगळावरचे लाडू! मंगळावरची जिलबी! मंगळावरून श्रीबालाजी प्रसन्न! हा मंगळ मानवजातीचं शुभमंगल करणार! शुभमंगलऽऽऽ' मी आनंदानं ओरडलो अन् 'साऽऽऽवधाऽऽऽन' डॉक्टरसाहेबांनी पूर्ण केलं.

मला इतका अनावर आनंद झाला की, मी 'शुभमंगलऽ शुभमंगलऽ' म्हणत

नाचायलाच लागलो! 'सावधाऽऽन' 'सावधाऽऽन' म्हणत डॉक्टरसाहेब नाचायला लागले, आणि मग ते चार स्त्रीपुरुषरोबोही नाचायला लागले! आमच्याबरोबर प्रयोगशाळेतल्या काचेच्या नळ्या, काचेचे चंबू, काचेची चंचुपात्रं, काचेच्या बाटल्या सगळे किणकिणकिण करीत नाचायला लागले. नाचाची गती वाढली आणि एकदम मोठ्यानं धाडधडाड्, खण्ण, खळ्ळखळ्ळ आवाज झाला. ते रोबो नाचाच्या भरात प्रयोगशाळेतल्या काचसामानावर धडकले. सगळं काचसामान फुटलं अन् ते रोबोही फुटून तुटून मोडून पडले. त्या काचसामानावर मीही कोसळलो आणि नक्षत्रयुगाच्या स्वप्नात दंग असणाऱ्या माझ्या अंगावर रक्तबिंदूंची नक्षत्रं उमटली आणि मी जमिनीवर आलो. डॉक्टरसाहेबच फक्त उभे होते. ते खुश्शाल मोठ्यानं हसत होते. त्यांना काहीही झालेलं नव्हतं! आश्चर्य वाटून मी त्यांच्याकडे बघताच, ते म्हणाले,'अहो, मी नाचत नव्हतो. सावधान, सावधान म्हणून तुम्हाला इशारा देत होतो. पण तुम्हाला चढलेली श्रीबालाजीची धुंदी. ती अशा अपघाताशिवाय कशी उतरणार? शोध लावतात शास्त्रज्ञ त्या शोधांचा सगळा लाभ तुम्हाला हवा. पण तुम्हाला आठवतो फक्त देव. मी शास्त्रज्ञ की संन्याशी अशी शंका तुम्ही मला विचारलीत, हे खरं. पण तुमच्या अंतर्मनावर अजून प्रभाव आहे श्रद्धेचा. कोणत्या तरी अज्ञात शक्तीनं काहीतरी चमत्कार करावा आणि आधी आपल्याला, मग आपल्या लोकांना आणि नंतर वाटल्यास इतर लोकांना वाचवावं, असं तुमच्या मनांत असतं. म्हणूनच तुम्हाला ते भयानक स्वप्न पडलं, हे खरं; तुम्हाला निराश, निराधार वाटलं, हे खरं; पण त्याचं खरं उत्तर तुम्हाला पटलं असतं तर तुम्ही त्या उत्तराच्या दिशेनं स्वत:च पावलं टाकायला सुरुवात केली असती. अज्ञात शक्तीची भीक कशाला मागता? अन् चमत्कारांची हाव कशाला धरता? ज्ञात शक्ती तुमच्या हातांतच आहे ना– विज्ञान! आणि चमत्कार नव्हेत तर तुम्हांला वाचवणार आहे– संशोधन– प्रयत्नपूर्वक संशोधन. सांगा, तुम्हाला जखमा झालेल्या आहेत. वैज्ञानिक इलाज करू की नको?'

'करा, करा डॉक्टर. वैज्ञानिक इलाजच करा. तोच खरा. मी खरंच स्वप्नांत धुंद झालो आणि अपघातात पडलो. स्वप्नांत धुंद होण्याऐवजी सत्यशील मंद परंतु निश्चित मार्गावर, विज्ञानाच्या अभ्यासावरच, विज्ञानाच्या संशोधनावरच मी लक्ष केंद्रित करायला हवं होतं ', मी म्हणालो.

डॉक्टरांनी मला उठवलं. अंगातल्या सगळ्या काचा काढल्या. औषध लावलं अन् हळुवार आवाजात म्हणाले,'अहो, तुम्हाला जसं हे उमजलं तसं जगातल्या सगळ्या लोकांना हे उमजलं पाहिजे. तरच ते दु:स्वप्न नाहीसं होईल.'

एक वेदनाशामक औषध मला देऊन मला बिछान्यावर झोपवून डॉक्टर अगदी हळू, शांत, प्रेमळ आवाजात जवळ येऊन म्हणाले,'बोलू ना? की त्रास होतोय?'

'बोला, डॉक्टरसाहेब, बोला. तुमच्या बोलण्यानंच मला बरं वाटतंय,' मी म्हणालो. तेव्हा डॉक्टर म्हणाले,'अहो, माणसाजवळ आजचं तंत्रज्ञान मुळीच नव्हतं तेव्हासुद्धा माणसानं सृष्टीची केवढी उलथापालथ केली बघा. अहो, हजारो मैलांवरून

प्रचंड शिलाखंड आणून इजिप्तमध्ये भव्य पिरॅमिड्स रचले. चीनमध्ये देशाच्या हजारो किलोमीटर सरहद्दीवर लांबच लांब बळकट भिंत बांधली. हिंदुस्थानात डोंगरांतले मोठमोठे खडक पोखरून लेणी कोरली आणि उंचच उंच दगडी देवळं बांधली. आज त्या मानानं तंत्रज्ञान केवढं विकसित झालेलं आहे! आणि पुढे किती होणार आहे! मग काय अशक्य आहे? सांगा, गंगायमुना नद्यांतून वाहून वाया जाणारा सुपीक गाळ हिमालयातून थेट राजस्थानच्या वाळवंटात नेणं अशक्य आहे का? नाईल नदीचा सुपीक गाळ सहारा वाळवंटावर पसरणं अशक्य आहे का? आणि त्याबरोबर वाया जाणारं पाणीपण नेणं अशक्य आहे का? गंगा-कावेरी योजना वास्तवच आहे ना! पण ती कागदावरच का राहते? जमिनीवर का अवतरत नाही? जगातली सगळीच वाळवंटं अशी सुपीक करणं कठीण का आहे?'

डॉक्टरसाहेब उत्साहानं बोलत होते. त्यांच्या डोळ्यांत अश्रू तरळले. क्षणभर ते थांबले. मीपण भारावलो. पण मग मीच म्हणालो, 'बोला, डॉक्टर बोला. ऐकू द्या मला. मग शक्य तितक्या लोकांना, शक्य तितक्या संस्थांना, शक्य तितक्या देशांना मी हे सांगेन. पटवून देण्याचा प्रयत्न करीन.'

डॉक्टर पुढे शांतपणे म्हणाले, 'अशा प्रकारे केवळ जगाचीच नव्हे तर सगळ्या विश्वाचीच पुनर्रचना केली पाहिजे. आणि ते माणसाला शक्य आहे. नव्हे, ते फक्त माणसालाच शक्य आहे. सबंध ब्रह्मांडात फक्त पृथ्वीवरच माणूस असल्याचा पुरावा आहे. इतर कुठेतरी जीव असेल अशी फक्त शंका आहे. असला तरी तो माणसासारखा बुद्धिमान असेलच कशावरून? माणूस तरी बुद्धिवान आहे का हो? अखिल ब्रह्मांडातला एकमेवाद्वितीय असा हा प्राणिश्रेष्ठ आत्महत्या करायला निघाला आहे की काय, अशीच शंका येते! अहो, मनुष्य मनात आणील तर चंद्रमंगळावर आणि इतर ग्रहगोलांवर अन्नधान्यांचे, फुलाफळांचे मळेच पिकवील असं नव्हे तर उद्या सूर्य विझू लागल्यावर त्यात दुसरीकडून आणून इंधनसुद्धा टाकू शकेल! हाच अणुविद्येचा खरा उपयोग नाही का हो? हाच खरा यज्ञ नाही का हो? विश्वालासुद्धा नष्ट होण्यापासून माणूसच वाचवू शकेल... माणूसच. आणि हेच विश्वविकसनशास्त्र मी निर्माण करीत आहे. पण प्रत्येक माणसाला उमजलं पाहिजे की देव दुसरा कोणीही नाही, तर प्रत्येक मनुष्य हाच देव आहे!'

*****

# आपुलाचि वाद आपणांशी

‘‘तू लग्न करूच शकत नाहीस.’’

‘‘मी तुमची परवानगी मागायला आलेलो नाही.’’

‘‘परवानगीचा प्रश्नच नाही. तू परवानगी मागूच शकत नाहीस आणि मी परवानगी देऊच शकत नाही.’’

‘‘मी तर लग्न करायला चाललोच आहे.’’

‘‘मी तुला जाऊ देणार नाही.’’

‘‘गेल्याशिवाय मी राहणार नाही.’’

‘‘तुझा जीव गेल्याशिवाय राहणार नाही.’’

‘‘होय. होय. माझा जीव गेल्याशिवाय राहणार नाही.’’

‘‘शक्य नाही. शक्य नाही. शक्य नाही.’’

‘‘का?’’

‘‘मी लग्न केलं नाही.’’

‘‘का?’’

‘‘माझ्या स्वभावातच ते नव्हतं.’’

‘‘म्हणून माझ्या स्वभावात...’’

‘‘ते शक्य नाही. जे नाही त्याची वाट पाहू नकोस.’’

‘‘मी काही तुमचा मुलगा नव्हे.’’

‘‘म्हणूनच.’’

हा वाद एका जैवतांत्रिक, बायो-टेक्नॉलॉजिकल प्रयोगशाळेत चालला होता. ‘डॉ. अमरेन्द्र यांची जैवतांत्रिक प्रयोगशाळा’ असा बाहेर मोठा फलकच होता. आत समोरील भिंतीवरील कॅलेंडरवर वर्ष होते – २०५०. डॉ. अमरेन्द्र हे सुमारे पन्नाशीतले शास्त्रज्ञ होते. त्यांचा पोषाख पांढराशुभ्र होता. पायांतले बूटसुद्धा पांढरे शुभ्रच होते. त्यांनी दाढी राखली होती आणि ती अगदी वळू लागलेली आणि दुरून पांढरीच म्हणावी लागेल अशी होती. त्यांच्या डोळ्यांवर मोठ्या काचांचा चष्मा होता आणि अंगावर पांढरा लांब गाऊन होता. त्यांच्याशी वाद घालणारा मनुष्य पंचविशीतला असावा. त्याचाही पोषाख अशा प्रयोगशाळेत काम करणाऱ्या संशोधक शास्त्रज्ञाचा म्हणजे पांढरा शुभ्र आणि वर लांब पांढरा गाऊन असाच होता. दोघांनीही डोक्याला केस झाकणाऱ्या प्लॅस्टिकच्या कॅप्स घातल्या होत्या आणि हातांतही पांढरे प्लॅस्टिकचे मोजेच घातलेले होते. ‘लग्न करायलाच चाललो आहे,’

म्हणता म्हणताच त्या तरुणाने कॅप, मोजे, गाऊन काढून वॉशिंग मशीनमध्ये टाकून दिले.

एक क्षण थांबून डॉ. अमरेन्द्र पुढे म्हणाले,'तू मुलगा असतास तर गोष्ट वेगळीच होती. बापलेकांचं कधीच पटत नाही. बापलेक विभक्त होणारच. बापलेकांत दुरावा येणारच. म्हणूनच मला मुलगा नकोच होता. माझ्याजवळ कायम राहणारा, माझ्याशी एकरूप होणारा, माझ्याशी आत्मीयता बाळगणारा...''

''माझ्यासारखा क्लोन हवा होता.''

''होय, होय. क्लोन. निअरेस्ट, डिअरेस्ट, क्लोजेस्ट क्लोन.''

''क्लोन?.... की क्लाऊन?''

''तू माझा अपमान करतोस. मला संताप आणतोस. तू म्हणजे मीच, तर मी तुला क्लाऊन कसा समजेन?''

''तुम्हाला हवा आहे एक निअरेस्ट, डिअरेस्ट, क्लोजेस्ट – गुलाम.''

''खोटं. खोटं. खोटं. माझं नाव– डॉ. अमरेन्द्र. सगळ्या जुन्या गोष्टींचा मला पुरा कंटाळा आला होता. त्या जुन्या चालीरीती, ते अंधविश्वास, ते पारंपारिक धर्म. म्हणून मी माझं नावसुद्धा बदलून घेतलं. जुने सगळे विषय टाकून देऊन मी फक्त विज्ञानसंशोधन घेतलं. शेकडो पेटंट्स घेतली आणि त्या पैशातून ही प्रयोगशाळा बांधली. हरितक्रांतीनं ज्याप्रमाणं बरबँक, बोरलॉग इत्यादी शास्त्रज्ञांनी संपूर्ण सर्वांगीण क्रांती केली आणि अगदी नवीन सृष्टीच निर्माण केली त्याप्रमाणं माझ्या मेंदूत मी संपूर्ण सर्वांगीण क्रांती केली आणि माझी बुद्धी मी कोणत्याही विषयांत संपूर्ण नवी सृष्टी निर्माण करण्याइतकी फुलवली. आणि अशा या बुद्धीनं माझ्यानंतरसुद्धा सृष्टीचं चित्र पूर्णपणे पालटता यावं म्हणून मी तुझ्यासारखी माझीच नवी आवृत्ती निर्माण केली. – अमर्त्येंद्र.''

''मला तुम्ही माझ्या प्रेयसीशी लग्नसुद्धा करू देत नाही. आणि ही म्हणे माझ्याशी आत्मानुभूती!''

''तू तुझ्या प्रेयसीच्या मागे गेलास की तिचा गुलाम झालास. तू तिच्या गळ्यात मंगळसूत्र घालणार पण ती तुला तिचा नवरा म्हणून दारोदार मिरवणार. तू ग्रंथालयात बसणार पण ती तुला स्वयंपाकघरात ओढून नेणार. तू प्रयोगशाळेत संशोधनात गढणार पण ती तुला आतल्या खोलीत ओढून नेणार.''

''माझी प्रेयसी अशी नाही आहे. ती माझ्याबरोबर विज्ञानातच काम करू इच्छिते.''

''भ्रम आहे तुझा. निसर्गानंच स्त्रियांना मुलं जन्माला घालण्याचं काम दिलंय. तेच त्यांचं सर्वस्व. इलाजच नाही म्हणून त्या पुरुषावर प्रेम करतात. तेवढ्यापुरतंच.''

''आता तुम्ही माझ्या प्रेयसीचा अपमान करताय. अन् तिच्यावर प्रेम करण्याची चूक करतोय म्हणून माझा अपमान करताय. मला कळलंय सगळं. तुमच्या प्रेयसीनं तुम्हाला नकार दिला त्याचा बदला तुम्ही असा घेताय. तिच्यावर प्रेम करण्याचं स्वातंत्र्य तुम्हाला होतं. मान्य. पण तुम्हाला नकार देण्याचं स्वातंत्र्य तिला होतं हे मात्र तुम्हाला अमान्य. तुम्ही स्त्री जातीचा, नव्हे मानवजातीचा, अपमान करताय.''

‘‘नाही. नाही. नाही. माझ्या मनात स्त्रीप्रेम नव्हतं असं नाही. पण माझ्या मनात ज्ञानप्रेम जास्त होतं. तू मीच आहेस. तुझ्याही मनात स्त्रीप्रेमापेक्षा ज्ञानप्रेम जास्त आहे. तू फशी पडू नकोस म्हणून तुला मी इशारा देतोय.’’

‘‘तुम्ही मला तुमचा क्लोन म्हणून निर्माण केलंत. तुमची इच्छा पूर्ण झाली. तुमचंच मी प्रतिरूप. माझा इलाजच नाही. पण तुम्ही स्वत:ला महान वैज्ञानिक म्हणवता आणि विज्ञानाचा मूल सिद्धांत विसरता. उत्क्रांती ! उत्क्रांती !! तुमचंच मी प्रतिरूप पण उत्क्रांत प्रतिरूप ! मी तुमच्या पुढे आहे. पुढचं जग पाहतोय. तुम्ही माझ्या खूप मागे आहात. तुम्हाला पुढचं दिसत नाही आहे. स्त्रीप्रेमापेक्षा ज्ञानप्रेम जास्त होतं, म्हणे ! तुम्हाला स्त्रीचं जबरदस्त आकर्षण होतंच, आहेच आणि राहणारच आहे!’’

‘‘कशावरून?’’

‘‘माझ्यावरून ! मी तुमचंच प्रतिरूप ना? स्त्रीचं जबरदस्त आकर्षण तर पाहिजेच पण त्याबरोबर येणारी जबाबदारी मात्र नको!’’

‘‘पुष्कळ झालं. पुरे.’’

‘‘आपला दोघांचा स्वभाव अगदी सारखाच, नव्हे एकच आहे खरं, पण आपल्या दोघांच्या प्रेमपूर्तीच्या परिस्थितीतं जमीनअस्मानाचं अंतर आहे, हेही खरं.’’

‘‘पुरे. पुरे. पुरे.’’

‘‘का पुरे? अजूनही माझ्या लग्नाला पाठिंबा द्यावा असं तुम्हाला वाटत नाही. तुमच्या मते, तुम्ही जगातील एकमेव अभूतपूर्व अलौकिक व्यक्ती, तुम्ही कसंही वागावं. सत्य कायमचं कधीच लपून राहत नाही. मला कळलंय सगळं!’’

‘‘ काय कळलंय?’’

‘‘माझी प्रेयसी माझी वाट बघत रडत बसली असेल. मला ताबडतोब निघालंच पाहिजे. एकच सांगतो – स्त्रीचं माझं आकर्षण जबरदस्त असणारच हे तुमच्या कहाणीवरून मला पटलं. पण त्या आकर्षणाला बळी पडून अनिर्बंध, स्वैर संचार करण्याऐवजी लग्नाचं अतूट बंधन स्वीकारण्याचं मी ठरवलंय. निघालो मी.’’

अमर्त्येंद्र ताडताड निघून गेला. क्षणभर डॉ. अमरेन्द्र त्याच्याकडे बघत पुतळ्यासारखे ताठ उभे राहिले. मग धावत जाऊन त्यांनी दारांतून बघितले आणि ते उद्‌गारले, ‘‘गेला. न विचारता गेला. भांडून गेला. प्रेम करतोय. स्त्रीचं मोठेपण मला शिकवतोय. मानवतेची महती मला पटवतोय. मला! हा कसला माझा क्लोन! हा माझा कोण? माझा कुणीच नव्हे. माझा प्रयोग फसला, एवढा प्रयत्न केला पण फुकट गेला. हा काय माझ्यानंतर माझी प्रतिमा जिवंत ठेवणार? आजवर मोठे लोक आपल्यामागे आपली तैलचित्रं नाहीतर पुतळे ठेवत. मी जिवंत चित्र, जिवंत पुतळा ठेवणार होतो. पण हा... हा...हा तर माझी प्रतिमा उजळ ठेवणारच नाही. मलीन करणार. चुकला. चुकला माझा प्रयोग. माझा प्रयोग हा. मीच केला. वाया गेला तर मीच तो नष्ट का करू नये?’’

डॉ. अमरेंद्रांच्या चेहऱ्यावरचे भाव भराभर बदलत गेले आणि मूर्तिमंत क्रोध

होऊन क्षणभर ते पुतळ्यासारखे खिळले. मग घाईघाईनं त्यांनी खिशातून एक रिमोट कंट्रोल काढला, घाईघाईनं त्यांनी त्याच्या कळा दाबल्या आणि ते वाट बघत राहिले. फार वेळ लागला नाही. त्यांच्यासारखाच दिसणारा एक यंत्रमानव यंत्रमानवाच्या चालीने त्यांच्यासमोर येऊन उभा ठाकला आणि यंत्रमानवाच्याच सुराने म्हणाला,''डॉ. अमरेन्द्रमहाशयसरकार, आपला विजय असो! काय हुकूम? फर्मावा. बंदा हाजीर आहे. साहेबस्वारींनी माझं स्मरण केलं हे मला माझं भाग्य वाटतं. आपली सेवा करण्यास मला आनंद वाटेल.''

''काम तातडीनं करायचं आहे''.

''आपण सांगण्याचीच खोटी आहे''.

''काम खासगी... गुप्त आहे''.

''फोटो, आवाज...कसलंही रेकॉर्डिंग, कुठलीही नोंद कुठेही न राहता काम केलं जाईल. बिनचूक होईल.''

''मला खात्री आहे. पण काम फार नाजूक आहे.''

''आपण नाजुकपणाचा अंश सांगा. त्या अंशानं काम केलं जाईल.''

''शाब्बास ! माणसापेक्षा यंत्रच चांगलं! माझ्यामागे माझी प्रतिमा राहावी म्हणून मी तुला तयार केलं. माझ्या बुद्धीचे सर्व घटक तुझ्या संगणकात भरले. खरोखर, तूच माझा आहेस; तो क्लोन नव्हे. तो माझा प्रयोग फसला, चुकला, वाया गेला. तो नष्ट करायचा आहे.''

''कसा?''

''अर्थात रिव्हॉल्व्हरनं! त्या अमर्त्येंद्राला अद्दल घडवलीच पाहिजे. माझ्या जिवानं मी त्याला मोठा केला अन् तो माझ्यावरच उलटला! त्याला फसवून एकांतात दूर न्यायचं आणि अख्खं एक रिव्हॉल्व्हर त्याच्या डोक्यापासून पायापर्यंत त्याच्यावर रिकामं करायचं. तू रोबो आहेस. मानवासारखा काम करणारा पण यंत्रमानव आहेस. तुला त्रास दिला तर तू बदला घेऊ शकतोस. तू माझीच प्रतिमा-चालता बोलता पुतळा आहेस. तो अमर्त्येंद्र- माझी प्रतिमा मलीन करण्याचा त्यानं विडाच उचललाय. त्याला धडा शिकवायचाच. तू कोणतीही गोष्ट करू शकतोस. रिव्हॉल्व्हरपण चालवू शकतोस. हे धर. रिव्हॉल्व्हर मीच केलेलं आहे. आणि गोळ्यापण मीच केलेल्या आहेत. जगातल्या कुठल्याही रिव्हॉल्व्हरपेक्षा हे अधिक श्रेष्ठ आहे. घे. अरे, तू माझ्यासारखा बुद्धिमान आहेस. तू सापडणारच नाहीस. आणि सापडलास तरी यंत्रमानवाला थोडंच फाशी देणार?'' आणि डॉ. अमरेन्द्र खुनशीपणानं आणि स्वत:वरच्या खुशीनं अनिवार हसू लागले.

त्यांचं हसणं संपल्यावर त्यांचा यंत्रमानव म्हणाला, ''सरकार, मी आपली प्रतिमाच आहे हे खरंच आहे आणि त्याचा मला अभिमान वाटावा, माझी मान ताठ राहावी, अशीच आपण रचना केलेली आहेत, हेही खरंच आहे. पण आपल्याला आपली प्रतिमा मानवतेवर प्रेम करणाऱ्या महापुरुषाची, महात्म्याची, संताची हवी आहे आणि

तसाच आदेश आपण मला देऊन ठेवलेला आहे. म्हणून मी फक्त विधायकच कार्य करू शकतो. विनाशक नाही.''

''तुझा नाश करायला मला उशीर लागणार नाही.''

''आपण तो करू शकता.''

''ठीक आहे तर. करतोच.''

असे म्हणून डॉ. अमरेन्द्र यांनी त्या यंत्रमानवासमोर दूरनियंत्रक धरला. भराभर बटने दाबली. तो यंत्रमानव खाली पडला. त्याचे डोके, हात, पाय त्यांनी तोडून फेकून दिले. त्याच्यातला तारा ओढून टाकून दिल्या. सेल्स दूर भिरकावून दिले.

मग त्यांनी रिव्हॉल्व्हर समोर धरले, उघडले, सर्व गोळ्या ठिकाणी असल्याची खात्री केली आणि ते खिशात ठेवून त्या खिशावर हात धरून ते रागारागाने बाहेर पडले.

थोड्याच क्षणानंतर रिव्हॉल्व्हरचे बार ऐकू आले.

त्यानंतर काही क्षणांनी डॉ. अमरेन्द्रांना बेड्या घातलेल्या स्थितीत घेऊन एक पोलीस इन्स्पेक्टर आला, आणि म्हणाला, ''डॉ. अमरेन्द्र, हुबेहूब स्वत: दिसणारा क्लोन आणि हुबेहूब स्वत:सारखा दिसणारा यंत्रमानव तुम्ही केलात आणि नष्टही केलात. आता जरा नीट डोळे उघडून माझ्याकडे पाहा, मीही हुबेहूब तुमच्यासारखाच आहे का? मग मलादेखील तुम्ही नष्ट करणार?''

डॉ. अमरेन्द्र विस्फारलेल्या डोळ्यांनी मग नुसते पाहतच राहिले!

*****

# अण्वस्त्रांचं उत्पादन दुप्पट करा

'अण्वस्त्रांचं उत्पादन दुप्पट करा!' डॉ. विज्ञान योगी यांनी आदेश दिला.

'काय? अण्वस्त्रांचं उत्पादन... आणि दुप्पट?'

'होय. मी एकदाच सांगत असतो. ताबडतोब हा आदेश जारी करा. केवळ आपल्याच देशात नव्हे तर, आपल्या शत्रूंच्या देशांतसुद्धा!'

– आणि डॉ. विज्ञान योगी यांनी पाठ फिरवून आपल्या केबिनचे दार बंद केले. इतकेच नव्हे, तर आतून लॉकसुद्धा केले. तसा आवाजच आला!

डॉ. शांतिस्वरूप नागर तो आदेश ऐकून थक्कच झाले. ते होते तसेच स्तब्ध झाले. त्यांच्या कानांत ते शब्द मोठ्याने ऐकू येत होते... 'होय... अण्वस्त्रांचं उत्पादन दुप्पट करा.. शत्रूंच्या देशांतसुद्धा!' पण तो आदेश पाळणे त्यांना नियमाप्रमाणे भागच होते. कितीही अनुभवी असले तरी ते दुय्यमच होते. त्यांचे काम डॉ. विज्ञान योगी यांना जागतिक परिस्थितीची अगदी अलीकडची बातमी देणे आणि त्याची प्रतिक्रिया म्हणून डॉ. विज्ञान योगी जो आदेश देतील, तो शासनाला कळविणे एवढेच होते. डॉ. विज्ञान योगी यांना ते सांगायला गेले होते, 'आपल्या उपग्रहांतून पाहणी करून आणि आपल्या सुपरकॉम्प्युटरला सर्व माहिती पुरवून एकच निष्कर्ष निघाला आहे की, आपल्या शत्रूंजवळ एकेक खंड नष्ट करू शकतील असे जवळ जवळ हजार बॉम्बस् आहेत. अन् तितकेच त्वरित करता येतील एवढी सामग्री शत्रूंनी सज्ज ठेवली आहे. आपलीही परिस्थिती तशीच आहे. अन् त्यामुळंच शत्रू बॉम्बस्‌चा वापर करण्यापासून परावृत्त होत आहेत.'

डॉ. शान्तिस्वरूप नागर ही माहिती द्यायला गेले, तेव्हा डॉ. विज्ञान योगी सुपरकॉम्प्युटरवर काहीतरी प्रचंड आकडेमोड भराभर मांडीत होते. त्यांनी हा सुपरकॉम्प्युटर शासनाकडून मुद्दाम करवून घेतला होता. एवढा मोठा कॉम्प्युटर जगात दुसऱ्या कोणत्याही देशांत नव्हता. कुणाला तो परवडणारा नव्हता. जगातल्या तर राहोच, पण अवकाशातल्या ताऱ्यांच्या संख्यांचीही गणिते हा कॉम्प्युटर क्षणार्धात सोडवीत होता. तो करण्यात डॉ.विज्ञान योगी यांचाच पुढाकार होता. डॉ. विज्ञान योगी यांची बुद्धिमत्ता निर्विवाद होती. एवढा मोठा सुपरकॉम्प्युटरसुद्धा ते खेळण्यासारखा वापरीत. या सुपरकॉम्प्युटरने एक पंचवीस मजली इमारत व्यापली होती. पण डॉ. विज्ञान योगी यांच्या तंत्रामुळे बचतच झाली होती! त्यांचे तंत्रच अगदी नवीन होते. असा सुपरकॉम्प्युटर उभारायला शत्रूंना प्रचलित तंत्राप्रमाणे पाचशे मजली इमारत उभी करावी लागली असती ! म्हटले तर, तेही अशक्य नव्हते. पण शत्रूंना ते परवडणारे नव्हते. परवडले असते, तर ते डॉ. विज्ञान योगी यांच्याच शासनाला आणि डॉ. विज्ञान योगी यांनी तसा आदेश दिलाच असता, तर त्यांच्या शासनाने तेही करायला कमी केले नसते. सुपरकॉम्प्युटर असू देत; डॉ. विज्ञान योगी हे सुपर सुपर सुपर कॉम्प्युटर होते, हे मान्य करण्यावाचून कोणाला गत्यंतरच नव्हते.

'.... पण म्हणून काय, अण्वस्त्रांचं उत्पादन दुप्पट करायचं? अन् आपल्या शत्रूंनीसुद्धा? मग या जगाचं काय होईल? सबंध पृथ्वीची नुसती राखरांगोळी नव्हे तर वायुरूप होऊन जाईल अन् तो वायूसुद्धा सूर्याकडे ओढला जाऊन सूर्याच्या महाभयंकर भट्टीत जळून जाईल. पृथ्वीची खूणसुद्धा शिल्लक राहणार नाही! छे छे ! अति शहाणी माणसे अति वेडी बनतात, तसंच डॉ. विज्ञान योगींचं झालं काय? खरं तर, अण्वस्त्रं नष्ट करण्याच्या चर्चा शत्रूंबरोबर चालू होत्या. अन् त्या यशस्वी होण्याचीही शक्यता होती. अन् अशा वेळी अचानक डॉ. विज्ञान योगी यांनी हा आदेश दिला! म्हणे, अण्वस्त्रांचं उत्पादन दुप्पट करा, अन् शत्रूंच्या देशांतसुद्धा!'

डॉ. शान्तिस्वरूप नागर यांनी आपल्या हातातल्या घड्याळाकडे पाहिले. हे घड्याळ म्हणजे जणू कालचक्रच होते. त्यात सर्वकाही कालमापन होते–स्थूल आणि सूक्ष्म. सन २०३१. महिना डिसेंबर. तारीख बारा. दुपारचे बारा वाजायला पंधरा सेकंद बाकी. डॉ. विज्ञान योगी यांचा आदेश शासनाला न कळवून चालणार नव्हते. नियमाप्रमाणे दहा सेकंदांच्या आत कळविणे आवश्यक होते. इलाज नाही. त्यांनी फोन उचलला. हा फोन थेट राष्ट्राध्यक्षांशी जोडलेला होता. या फोनपाठी संदेश असो, नसो, राष्ट्राध्यक्षांचे एक कार्यालयच चोवीस तास जागे असे; अन् दुसरे कसलेही फोन चालू असले तरी, राष्ट्राध्यक्ष जेवत असले, झोपेत असले, काहीही करीत असले तरी, म्हणजे स्नानगृहात असले तरीही, हा फोन त्यांना अगदी ताबडतोब दिला जात असे. यावेळी सुदैवाने राष्ट्राध्यक्ष कार्यालयातच होते. त्यांचे कार्यालय नेहमीप्रमाणे सज्ज होतेच. या फोनची केवळ घंटा वाजत नसे. या फोनला मोठा लाल दिवा लावलेला होता. घंटा वाजायलाही वेळ लागेल; अन् ऐकायलाही वेळ लागेल; प्रकाश ताबडतोब दिसेल. 'प्रकाशाच्या गतीनं सर्व कामं झाली पाहिजेत,' राष्ट्राध्यक्ष श्री. सूर्यप्रकाश यांची ताकीद होती.

लाल दिव्याच्या प्रकाशाचे कारंजे क्षणार्धात उसळले. घंटेचा खणखणाट सुरू होताच राष्ट्राध्यक्ष श्री. सूर्यप्रकाश यांनी फोन उचलला. सर्व कार्यालय तयार होऊन पाहू लागले. अन् राष्ट्राध्यक्ष श्री. सूर्यप्रकाश फोन हातात धरून पुतळ्यासारखेच बसले! पण फोन टेपरेकॉर्ड केलेलाच होता! या कार्यालयातील सर्व अधिकारी गुप्त अधिकारी होते आणि कार्यालय आवाजबंद होते. म्हणून टेपरेकॉर्डर वाजू लागला,'अण्वस्त्रांचं उत्पादन दुप्पट करा! केवळ आपल्याच देशात नव्हे, तर शत्रूंच्या देशांतसुद्धा !' सर्व कार्यालय खडे झाले! अन् आपापले टेबल सोडून सर्वजण राष्ट्राध्यक्षांच्या टेबलापाशी गोळा झाले. या हालचालीमुळे राष्ट्राध्यक्ष सूर्यप्रकाश सावरले आणि त्यांनी विचारले,'इतके ॲटमबॉम्ब केल्यावर अण्वस्त्रांची कच्ची सामग्री उरेलच कशी? कच्ची सामग्री काय अशी लवकर होते? सर्व कच्ची सामग्री वापरून टाकण्याचा धोका कोण घेणार? अन् शत्रूंना काय म्हणून हा आदेश द्यायचा? तो कोण पाळणार?'

'राष्ट्राध्यक्षमहाशय, मला वाटतं काहीतरी गंभीर घटना आहे, पण कदाचित

काही घोटाळाही असेल. आपण डॉ. विज्ञान योगी यांच्या कार्यालयातच जाऊ या ना!' संरक्षणमंत्री तलवार म्हणाले. 'चला, चला,' राष्ट्राध्यक्ष सूर्यप्रकाश उद्गारले; पण लगेच पुढे म्हणाले, 'अहो, पण डॉ. विज्ञान योगी भेटले पाहिजेत ना? मला जनतेच्या सेवेसाठी सतत सज्ज राहावं लागतं.पण डॉ. विज्ञान योगींना मात्र ज्ञानसाधनेत अणुमात्र खंड पडून चालत नाही.' 'जाऊ या अन् बघू या'. 'गेलं हे पाहिजेच. चला.' सर्व कार्यालय हेलिकॉप्टरमध्ये बसले अन् हेलिकॉप्टरमधूनच राष्ट्राध्यक्षांनी डॉ. विज्ञान योगी यांच्या कार्यालयाशी संपर्क साधला. डॉ. विज्ञान योगी यांना फोनवर बोलावणे अशक्य होते. डॉ. शान्तिस्वरूप नागर यांनीच फोन घेतला अन् ते म्हणाले,

'राष्ट्राध्यक्षमहाशय, आपणच माझी या अणूच्या मोठ्या संकटातून सुटका करणार आहात! लवकर या. माझा राजीनामाच घ्या. मला काहीच सुचत नाहीसं झालंय. म्हणे, 'अण्वस्त्रांचं उत्पादन दुप्पट करा अन् शत्रूंच्या देशांतसुद्धा!'.. छे, छे!'

'तुम्ही राजीनामा देऊ नका! तुमचा काय दोष? अहो, आमचीही स्थिती तुमच्यासारखीच झालीय. आपण डॉ. विज्ञान योगी यांनाच विचारू.'

'त्यांनी आपल्या केबिनचं दार लॉक करून घेतलंय अन् हा संदेश तर तातडीचा म्हणून दिलाय.'

'बघू या. नाही त्यांची समाधी उतरली तर ती भंग करू या. ते माझ्यावर सोपवा. आल्या प्रसंगाला तोंड द्यायलाच पाहिजे.'

फोनवरून एवढा संवाद होत आहे तोच राष्ट्राध्यक्ष आणि त्यांचे कार्यालय यांचे हेलिकॉप्टर डॉ. विज्ञान योगी यांच्या संशोधनमंदिरापुढे उतरले. डॉ. शान्तिस्वरूप नागर दाराशीच उभे होते. त्यांचा चेहरा चिंताग्रस्त दिसत होता आणि त्यांच्यामागे त्यांचे सर्व कार्यालय खडे झाले होते. सगळी चिंतातुर. राष्ट्राध्यक्ष आणि त्यांचे सहकारी संशोधनमंदिरातील संशोधनवर्ग असे सर्वजण पायांतील बूट न वाजवण्याची शक्य तेवढी काळजी घेत पण शक्य तितक्या लवकर पावले उचलीत डॉ. विज्ञान योगी यांच्या केबिनसमोर आले.

आश्चर्य म्हणजे, केबिनचे दार ठोठावणे किंवा फोडणे वगैरे काहीच करावे लागले नाही. डॉ.विज्ञान योगीच नेमके दार उघडून बाहेर आले. कधी नव्हे इतका त्यांचा चेहरा प्रसन्न आणि प्रफुल्ल दिसत होता. त्यांचे लांब वाढलेले पांढरे केस आणि तशीच लांबलचक पांढरी दाढी वाऱ्यावर उडत होती. त्यांच्या अंगावरचा सैलसर अंगरखापण वाऱ्यावर लाटा दाखवीत होता.

'नमस्कार, मंडळी, नमस्कार!' डॉ. विज्ञान योगी हात उंचावून म्हणाले, 'मला खात्री होतीच की, आपण सर्वजण येणार. माझं हे भाषण मी आकाशवाणीवरून जगभर प्रक्षेपित करण्याची व्यवस्था केली आहे. होय. मला गुपित सापडलं आहे अन् ते आपल्या शत्रूंनाही कळलं पाहिजे. घाबरू नका. त्यातच त्यांचं हित आहे आणि अर्थात आपलंही. माझं भाषण थोडं तांत्रिक होईल. पण त्याला माझा नाईलाज आहे. आपणा सर्वांना आपलं

भविष्य माहीत आहे की, काही अब्ज वर्षांनी आपली सबंध सूर्यमाला एका कृष्णविवरात– ब्लॅकहोलमध्ये – गडप होणार आहे अन् एक अत्यंत सूक्ष्म कण बनून कदाचित कायमची तशीच राहणार आहे. कदाचित कायमची म्हणायचं कारण असं की, स्पंदन सिद्धांताप्रमाणं हे ब्रह्मांडाचं आकुंचन सध्या चालू आहे गेली काही अब्ज वर्षं. पण गणित करून करून मला असा गृहीत तर्क स्वीकारणं भाग आहे की, स्पंदन आणि प्रसरण यांचं प्रमाण सतत सारखंच राहत आलेलं नसून चेंडूच्या उडीप्रमाणे ते कमी कमी होत आलं आहे आणि, माफ करा, सध्याची ही विश्वचेंडूची उडी शेवटची आहे. म्हणजे, यानंतर हा चेंडू पुन्हा वर उडणार नाही, हे विश्व प्रसरण पावणार नाही. हा खरा कल्पान्त! घाबरू नका. हे प्रथम कळलं तेव्हा माझं हृदय बंदच पडलं. एकदा नव्हे तीनदा. मॅक वन, मॅक टू, मॅक थ्री असे मानसिक धक्के देऊन मीच ते पुन्हा गतिमान केलं. अन् हा कल्पान्त टाळण्याची समस्या सोडविण्यावरच सर्व लक्ष केंद्रित केलं अन् जे उत्तर सापडलं तेच तुम्हांला कळवलं– अण्वस्त्रांचं उत्पादन दुप्पट करा; केवळ आपल्याच देशात नव्हे तर शत्रूंच्या देशांतसुद्धा! आपली काय अन् शत्रूंची काय, अण्वस्त्रं क्षेपणास्त्रांत बसवून सज्जच आहेत. फक्त या क्षेपणास्त्रांच्या गतिवर्धकात वाढ करायची ती इतकी की, ही अण्वस्त्रसज्जक्षेपणास्त्रं उडाल्यावर पृथ्वीवर न पडता अंतराळात गेली पाहिजेत. एकामागून एक, अखंड, अविरत. योगायोगानं आपल्या पृथ्वीवर आज जी अण्वस्त्रं तयार आहेत आणि जी त्वरित तयार होण्याची शक्यता आहे ती जेमतेम का होईना पण पुरेशी आहेत. एकदा ही अण्वस्त्रक्षेपणास्त्रं पृथ्वीची कक्षा सोडून अंतराळात निघाली की त्यांना फक्त एक विशिष्ट दिशा द्यायची, तिच्यात मात्र अणुमात्र चूक होता कामा नये, पण ती मी ठरविली आहे. म्हणजे क्षेपणास्त्रं आधी इंधनाच्या बळावर आणि नंतर विश्वातील ताऱ्यांच्या आकर्षणांच्या बळांवर या अखिल ब्रह्मांडाच्या कृष्णविवराच्या केंद्रबिंदूकडे प्रचंड वेगानं धाव घेतील. काही अब्ज वर्षं लागतील पण ही सर्व अण्वस्त्रं त्या कृष्णविवराच्या केंद्राशी पोचली की त्या प्रचंड दाबानं त्यांचा प्रचंड स्फोट होईल आणि स्पंदनसिद्धांताप्रमाणं होणाऱ्या आकुंचनाचं रूपांतर प्रसरणात होईल. इतकंच नव्हे, तर माझ्या तर्काप्रमाणे विश्वचेंडूची गती स्तब्ध न होता हा विश्वचेंडू पुन्हा जोरानं उसळी घेईल. असं झालं तर आपली ही सुंदर पृथ्वी अन् तिच्यावरील सुंदर मनुष्यजात कृष्णविवरात जाण्यापूर्वीच वाचेल. अन् बहुधा या अखिल ब्रह्मांडात एकमात्र असलेला मनुष्य नष्ट होणार नाही. या सर्व प्रक्रियेस काही अब्ज वर्षं लागतील, पण ही प्रक्रिया सुरू करण्याचा विश्वमुहूर्त येऊन ठेपलेला आहे. तो चुकवून चालणार नाही. यासाठीच सर्व कच्ची सामग्री खर्च करून अण्वस्त्रं तयार करा. अण्वस्त्रांचं उत्पादन दुप्पट करा. केवळ आपल्याच देशांत नव्हे, तर आपल्या शत्रूंच्या देशांतसुद्धा!'

राष्ट्राध्यक्ष सूर्यप्रकाश स्तंभित होऊन पाहतच राहिले. काही क्षणातच त्यांनी स्वत:ला सावरले आणि पुढील कार्यवाहीसाठी ते त्वरेने पुढे सरसावले!

*****

# वस्तू

मध्यरात्रीचा सूर्य? पण इथं अमेरिकेत कसा? क्षितिजावर हा पिवळाजर्द प्रकाश ! आँ ? हां ! हा तर विमानतळ ! आ ऽ ली अमेरिका ! अमेरिका म्हणजे चमत्कार खराच. हिंदुस्थानातले विमानतळ येताना प्रकाशाच्या बेटाकडे आल्यासारखं वाटतं. इथं प्रकाशाच्या महासागरात उडी मारल्यासारखं वाटतंय. अमेरिका आली, पण बाळ आला असेल ना? नाही तर एवढ्या या प्रकाशात विरघळून गेल्यासारखं होईल. लहानपणी कुणालाही न सांगता, कुणाचंही न ऐकता, कुठंतरी दूर एकटाच भटकायला जाणारा अन् जिवाला घोर लावून केव्हातरी उशिरा येणारा बाळ. मोठेपणी अमेरिकेत येऊन राहिलाय. इथंही त्याची भटकंती काही संपली नसणारच म्हणा. आताही कुठं भटकायला गेला नसला म्हणजे मिळवली. कधी ऐकायचा नाही.

काचेच्या भिंती न् काचेची दारं! अमेरिका काय काचेचीच बांधली आहे की काय? अन् हा कोण पलीकडून आपल्याकडे निरखून पाहतो आहे? केवढा धिप्पाड ! केवढा उंच! गोरापान ! निळागर्द सूट घातलेला हा अमेरिकन ! आपल्यावर त्याची नजर. येथे म्हणे, कुणाशी बोलायचं नाही, कुणाला ओळख द्यायची नाही. अमेरिका हा थोरांचा देश, आणि अमेरिका हा चोरांचा देश. इथून आपल्यावर पाळत सुरू झाली की काय? बाळ्या कुठाय?

'चला बाबा ! आलात ! प्रवास कसा झाला?'

'अरे, दुरून तुला मी ओळखलंच नाही. केवढा फुगला आहेस? अन् गोरा तरी किती झाला आहेस? उंचीपण वाढली की रे तुझी. तसा हिंदुस्थानात माझ्यापेक्षा कितीतरी उंच झाला होतास तू. पण अमेरिकन नागरिक झालास म्हणून काय इतकं बदलायचं? कितीकिती वर्षांनी भेटतो आहेस रे बाळ ! बरं, माझ्या म्हातारपणी तरी आठवण झाली तुला माझी. पण आपलाच शब्द खरा केलास तू. नेहमीप्रमाणंच तू काही घरी हिंदुस्थानात आला नाहीस. मलाच तुझ्यामागं यायला लावलंस. उडत उडत. कसा ठीक आहेस ना?'

'ठीक दिसतोय ना बाबा? हिंदुस्थान सोडला. अमेरिकन झालो. पण मूळचा मी आहे तसाच आहे बाबा. भटक्याऽ.... उनाड. डोकं असूनही अभ्यास न करणारा.....'

'पुरे पुरे. थांब. बस्स. नको बोलूस पुढं.' कदाचित म्हणायचा, ..... मार खाणारा... छळवादी... घोर लावणारा..... दिवे लावणारा..... अमेरिका ही दिव्यांचीच दुनिया! खरोखर, दिवे लावलेन खरे! 'बाळ, मोठा झालास तू . खरोखर मोठा. फार चांगलं केलंस. आम्ही जिथल्यातिथं राहिलो. तू अंजनीच्या सुतासारखी झेप घेतलीस. या सूर्यबिंबावर येऊन ठेपलास. लहानपणी तू झाडावरून पडलास. सायकलवरून धडपडलास. स्कूटरवरून हातपाय मोडून

घेतलेस. पण हॉस्पिटलमध्येसुद्धा बँडेज घेऊन हिंडतच राहिलास...!'

'अमेरिकेत हिंडायला पाय पुरत नाहीत, बाबा. अमेरिकेत पायाला चाकं लावावी लागतात. साधी नव्हे, मोटरची. ही पाहा आपली कार! हो, हो, आपली ! बसा अगदी आरामात. बसा पुढंच माझ्याशेजारी. हा पट्टा असा बांधून ठेवा. होय. अमेरिकेतल्या मोटारी विमानासारख्याच धावतात. फक्त जमिनीवरून. घाबरायचं नाही. फारच भीती वाटली तर डोळे मिटा, अन् जा हिंदुस्थानात मनानं ! अमेरिका ही वेगाची बाग आहे, बाबा! वेग! पुढच्याच्या पुढं जायचा वेग ! अमेरिकेत पाय ब्रेकवर नसतो, बाबा; ॲक्सिलरेटरवर!'

'सांभाळून रे बाबा, मला.... मला भीतीच वाटते. काय रे तुझी ही गाडी ! सशांच्या पाठीवर बसल्यासारखं वाटतंय. अन्.... अरे.... बापरे : शंभर मैल ... तासाला ... पण आवाज येतच नाही आहे... जरा हळू रे... अन् थंड किती... तरीपण आल्हाददायक वाटतंय.... काय लख्ख आहे गाडी ... अरे नको रे त्याच्याशी स्पर्धा लावू. अरे, माझ्या नोकरीत तीन वर्षांनी बदली. सामानाचा ट्रक ठरवण्यापूर्वी मी अट घालीत असे, रेस लावायची नाही– नको, रेस नको, निदान मी असताना नको– नको–'

'बाबा, अमेरिकेत आहात तुम्ही. बघा, तो कुठल्याकुठे मागं पडला. आपल्याला आता तो गाठूच शकत नाही. संपला, खलास! खरं म्हणजे त्याची गाडी आपल्यापेक्षा नवी होती. लेटेस्ट मॉडेल. म्हणूनच जरा जपून चालवीत असावा बेटा. आता हेही मॉडेल टाकूनच द्यायचंय.'

'इतकी सुंदर गाडी अन् टाकून द्यायची? दिवस तरी झाले किती?'

'तीन आठवड्यांनी पहिला वाढदिवस येईल या गाडीचा. पण तो वाढदिवस ती साजरा करील दुसऱ्या कोणाकडे तरीच.'

'अरे इतकी सुंदर रंगीत गाडी?'

'बाबा, तुमच्या भारतात अनासक्तियोग नुसताच भकतात. आहे काय कुणाजवळ भारतात? इथं आम्ही अनासक्तियोग आचरणात आणतो. '

'पण एवढी ही एअरकंडिशंड दिमाखदार गाडी तू घेतलीस तरी कशी?'

'फुकटात !'

'फुकटात ?'

'होय, बाबा. अगदी फुकटात ! आपला नियम आहे, बाबा, आणि खरं म्हणजे तुम्हालाही तो माहीत आहे. डोकं असूनही अभ्यास करायचा नाही ! अन् हातपाय असूनही काम करायचं नाही ! मजा मात्र मस्त मारायची ! अन् त्यासाठी जास्तीत जास्त भटकंती करायची! इतकी वर्षं मी अमेरिकेत आहे, पण एक दिवस मी काम केलं नाही ! म्हणूनच असा फुगलोय ! हा:... हा:!'

'काम करीत नाहीस? आणि एवढी मजा मारतोस? अरे मग करतोस तरी काय?'

'हा:! हा:! चोरी करीत नाही, बाबा. घाबरू नका. तशी मला अब्रूची कधी पर्वाच नव्हती. पण चोरीची चैन परवडेल कशी? इथं चोर जबरदस्त असतात अन् पोलीसही

जबरदस्त असतात.  चोरीचा विचार मनात येत नाही असं मुळीच नाही. कधी कधी खिशात डॉलर नसले म्हणजे चोरीचा विचारसुद्धा अनावर होतो. पण चोराच्या मनात चांदणं. अन् तुरुंगात पडल्यावर मजा कसली? आपली मजा तर अहोरात्र चालली पाहिजे!'

'चोरी कशी करशील तू? माझाच मुलगा आहेत तू, पण मग....?'

'भीकही मागत नाही, बाबा. इथं खूप श्रीमंत भिकारी असतात. कसल्या तरी भिकारी समाजसेवी संस्था काढतात. नाहीतर मतलबी धर्मपंथ काढतात. अन् श्रीमंतांच्याकडून अव्वाच्या सव्वा पैसे काढतात. पण बाबा, मनानंच जो भिकारी आहे तो जीवाची चैन करीलच कशी? कोणी पैशाचे भिकारी तर कोणी मनाचे भिकारी. बाबा, मनाचा भिकार असली कार घेईल काय? सेकंडहँड मोटारीवर संतुष्ट असणारे इकडेही काही कमी नसतात. सगळ्यांत मोठा धंदा आहे तो. पण आपल्याला मजा पाहिजे ती ऐटीत. मनकी खुशी; दिनका राज ! मेरे लिये दिनका नही, जीवनका राज! जीवनाची मजा लुटायची तर राजासारखी! बाबा, तुम्हाला माहीतच आहे. कसलीच शिस्त नको असलेल्या मला देवाधर्माची शिस्त तर शिसारी आणणारीच होती. खूप भारतीय साधूंनी अमेरिकेत गडगंज संपत्ती मिळवली, अन् उपभोगलीसुद्धा. पण त्यांचे उपभोग म्हणजे आलीशान गाड्यांत बसायचं अन् तोंडावर सुतकी कळा आणायची. उंची मिठाई अन् फळं खायची पण तोंडानं वासनेला नावं ठेवायची. शृंगारसुद्धा करायचा पण त्याला मधुराभक्तीचं लेबल लावायचं ! छे ! छे! किळसवाणा प्रकार सारा ! डर्टी ! भगव्या पताका न् भगव्या कफन्या न् भगव्या मोटारी न् भगवी विमानं न् भगव्या सिगरेटी ! सगळं भगवं अन् नागवं. शी शी शी !'

'शाब्बास! माझाच मुलगा आहेस तू ! शाब्बास! अशीच ढोंगाची चीड पाहिजे! जे काही करायचं ते राजरोस. चोरून-लपून नव्हे. उजळमाथ्यानं, पण....'

बारा लेनवाल्या रस्त्यावरून कारनं एकदम गिर्रेबाज गर्रकन वळण घेतलं अन् ती एका पन्नास मजली इमारतीसमोर थांबली. कंपाउंडचं फाटक बंद होतं. पण गाडीतून रिमोट कंट्रोलचं बटन दाबताच फाटकानं आ केला अन् गाडी आत वेगानं घुसून एकदम थांबली. गचका बसला पण गुद्गुदल्याच झाल्या.

'बाळ, काय रे तुझी ही दणकट, वेगवान पण नाजूक नखरेल गाडी!'

'अगदी एखाद्या लेडीसारखी!'

'अरे पण लेडी प्रेम करून तुझ्यामागे येईल. पण ही गाडी...?'

'ऐकायचंय तुम्हाला, बाबा?'

'का नाही?'

'खरं तर हे सारं तुम्हाला सांगायलाच पाहिजे, बाबा. ही अमेरिका आहे. इथं सर्व गोष्टी म्हणजे विक्रीच्या वस्तू आहेत. जास्तीत जास्त किंमत वसूल करील, आणि तीही गिऱ्हाइकाचं समाधान करून, तोच इथं महान विक्रेता अन् महान मनुष्य!'

'तू काय आणलं होतंस म्हणून विकलंस?'

'माझी किडनी!'

‘काय, तुझी किडनी?’

‘त्यात काय, बाबा? एका कोट्याधीशांचा मुलगा मृत्युशय्येवर होता. त्यानं किडनीसाठी जाहिरात दिली होती. माझी किडनी बरोबर जुळणारी होती. मी पैसे नाही मागितले. मला नवी गाडी हवी होती ती त्यानं आनंदानं दिली.’

‘त्या कोणा श्रीमंताच्या मुलाला तू एक किडनी दिलीस आणि माझ्या मुलाची एक किडनी घालवलीस!’

‘एका पायावर मी उभा राहू शकतो, बाबा. चला. या लिफ्टमध्ये या. आपल्याला पन्नासाव्या मजल्यावर जायचंय. सबंध मजलाच आपला आहे. आपला मजला बघा अन् मजल्यावरून सगळी अमेरिका बघा. लवकरच हेही बदलायचंय. पन्नासाव्यावरून पंचाहत्तराव्या मजल्यावर जायचंय! सध्या हे बघा--- ही ड्रॉइंगरूम.’

‘अरे, ड्रॉइंगरूम की बाग? बागेतल्या बाकावर बसल्यासारखंच वाटतंय.’

‘बागेत दगडी बाक असतात.’

‘पण हा सोफा आहे ना हिरवळीसारखा लुसलुशीत! अन् किती फुलांच्या कुंड्या ह्या.’

‘बाबा, हा इमारतीचा टॉवर इतका उंच आहे की वाऱ्यानं त्याला झोके मिळतात. नव्या माणसाला भीतीच वाटते. म्हणून आपण जमिनीवरच आहोत, बागेतल्या झोपाळ्यावर बसलो आहोत, असा आभास उत्पन्न केलाय. इकडे या. ही किचन. ही विजेची कुकिंगरेंज अन् हा फ्रीज. खरं म्हणजे इथं सगळं फूड रेडीमेड मिळतं. फक्त गरम किंवा थंड जसं हवं असेल तसं करायचं. इथे ज्यूसर आहे, मिक्सर आहे, क्रशर आहे, ग्राइंडर आहे. बाजारातलं कोणतंही आधुनिक उपकरण इथं नाही असं नाही. नवं आलं की जुनं सरळ फेकून द्यायचं. नवं घेतलंच पाहिजे अन् जुनं टाकलंच पाहिजे. शेजारीच ही बाथरूम.’

‘अरे ही बाथरूम की स्नानमहाल? एका वेळी काय दहाजण आंघोळ करतात का रे? आहे कोण आणखी इथं?’

‘हे सगळं माझं एकट्याचं आहे, बाबा.’

‘आणि तू हे काम न करता कमावलंस?’

‘होय, अगदी बसल्याबसल्यासुद्धा नव्हे, अगदी पडल्यापडल्या!’

‘काय, केलंस तरी काय, बाळा?’

‘माझी कातडी विकली!’

‘काय?’

‘मराठीत नुसतीच म्हण आहे, माझ्या कातड्याचे जोडे करून तुमच्या पायांत घालीन. पण इथं ते जवळजवळ खरं आहे. अमेरिकेतसुद्धा माणसं भाजण्याचे प्रकार खूप होतात. जळालेल्या कातडीवर कव्हर करायला कातडी लागते. मी सगळ्या मोठ्या हॉस्पिटल्समध्ये माझं नाव देऊन ठेवलेलं आहे. गरज लागली की त्यांचं हेलीकॉप्टर येतं

आणि इथंच गच्चीवर उतरतं. मी तयारच असतो. आपली कातडी काय पुन: आपोआप येतेच. हॉस्पिटलमध्ये खायला-प्यायला भरपूर मिळतंच. दिवस उत्तम जातात. अन् मिळणाऱ्या पैशानं या फ्लॅटचा हप्ता भरता येतो. नुकतेच हप्ते पूर्ण झाले!'

'अरे बापरे! काय रे हे? काय काय सहन केलंस हे?'

'बाबा, आता माझी भारतीय कातडी जाऊन पूर्ण अमेरिकन कातडी पांघरलीय मी! आणि माझ्या भारतीयत्वाचं दान कितीतरी अमेरिकन माणसं आपलेपणानं मिरवताहेत!'

'मला नाही ऐकवत हे ! बाळ, किती रे त्रास करून घेतलास तू!'

'वाईट वाटून घेऊ नका, बाबा. वाईट वाटलं तर इकडे या. ही करमणुकीची खोली बघा. इथं सिनेमाचं यंत्र आहे. रंगीत आणि एकाचवेळी अनेक केंद्रं दाखवणारा टी.व्ही. आहे, व्ही.सी.पी. आहे. थ्री-इ-वन् आहे. लेसर किरणावर चालणारा फोनो आहे. रंगीत कॅमेरा आहे अन् लगेच फोटो तयार करून देणारा डेव्हलपरही आहे. सांगा, संगीत ऐकायचंय की फिल्म पाहायचीय?'

'ते काही नकोय मला. मला तुला पाहायचंय. तुला भेटायचंय. तुझ्याशी बोलायचंय. पण बाळ, आता भीती वाटते रे की या सगळ्यासाठी तू काय-काय करून घेतलं असशील?'

'काहीही करून घेतलेलं नाही, बाबा.'

'काहीही नाही? खरं? अगदी खरं?'

'अगदी खरं!'

'मग एवढं हे सगळं भांडार तू आणलंस तरी कसं?'

'मेंदू विकून.'

'काय?'

'मेंदू-मेंदू विकून. इथल्या शास्त्रज्ञांना बुद्धिमान व्यक्तींचे मेंदू संशोधनाला हवे असतात. यासाठी ते टेस्टही घेतात. बाबा, तुम्हाला आनंद वाटेल, त्यात मी पहिला आलो, मी मेल्यावर...'

'शुभ बोल रे, मुलाऽ!'

'... माझा मेंदू काढून घेण्यात येईल. त्यासाठी मला त्या वैद्यकीय संस्थेनं आधीच मोठी रक्कम दिली आहे. मी जिवंत आहे की नाही पाहण्यासाठी रोज एकदा फोन येतो. माझं उत्तर नसेल तर त्यांची गाडी येईल. तो पाहा फोन वाजतोय. तुम्ही ऐकणार आहात?.... ठीक आहे. मी फक्त 'ओ.के.' म्हटलं तरी त्यांना पुरतं. त्यांना घाई नाही अन् मलाही चिंता नाही. जन्माची काळजी मिटली अन् मृत्यूचीही काळजी मिटली! मीच त्यांना सांगितलं, आणखी पैसे द्या आणि माझी बॉडीही घेऊन जा!'

'बाळ, बाळ तू काय केलंस रे हे? कशाला असं केलंस? अरे, लहानपणी तू किती गोंडस दिसायचास म्हणून सांगू! तुला न्हाऊमाखू घालणं हा परमानंद होता रे! टबात तू पाण्यात खेळायचास, हसायचास अन् तुझ्या कोवळ्या नाजुक त्वचेला तेल, पीठ, साबण लावताना नुसता हर्ष व्हायचा रे! अन् आंघोळ झाल्यावर स्वच्छ पुसून पावडर लावून तुझा

मुका घेताना तर स्वर्ग हातांत यायचा रे! तुझी आई तुला माझ्या हातांत देऊन लगेचच निघून गेली! आपलं दुर्दैव. पण त्यामुळं तुझ्या स्पर्शाचं सुख मला मनमुराद मिळालं. आईवेगळं मूल म्हणून तुझे मी फारफार लाड केले. तुझ्या खोड्या वाढतच चालल्या, अन् माझं कौतुकही वाढतच चाललं. त्यामुळंच कदाचित, तू फार हूड झालास, अनावर झालास, म्हणून क्वचित तुला शिक्षा केली पण मीच पोळलो रे!'

'ते जाऊ दे, बाबा, आणखी खोल्या बघायच्या राहिल्या आहेत.'

'नाही. त्या बघायची छाती नाही माझी.'

'बसा, बाबा. ड्रिंक घेणार का? सॉफ्ट की हार्ड? सॉफ्टच घेणार, घ्या. अन् तुम्हाला स्मोक विचारणं हा तुमचा अपमानच होईल, बाबा. पण माफ करा. माझं त्यावाचून चालणार नाही. तुम्ही मद्य घेऊ नका, बाबा. पण हे कॅबिनेट पाहा तरी. यांची असंख्य मिश्रणं बनतात. दरवेळी नवीन तलफ. सगळी सुखं, सगळी दुःखं विसरायला होतं. बाबा, तुम्ही हिंदुस्थानात नाही आहात, अमेरिकेत आहात. तुम्हाला बरं वाटत नाही आहे. औषध म्हणून थोडं घेऊन पाहा... नाही, तर राहिलं. माझ्या या मोठ्या अंगात रक्त नाही आहे, नुसती दारू आहे! रक्त निर्माण झालं की मी विकून टाकतो अन् तिथं दारू भरतो. पण रक्त बेटं आपोआप लोचटपणानं येतंच. हाकललं तरी येतं. आता बाबा, एकच खोली बघायची राहिलीय. चला.'

'बाळा, मला सांग, तू लग्न केलं आहेस की नाही?'

'लग्न?... हाः ! हाः! लग्न? हाः! हाः! हाः! लग्न? ... या, या तुम्हाला दाखवतो ना माझी बेडरूम. याला रिव्हॉल्व्हिंग बेड म्हणतात. हव्या त्या वेगानं तो खालीवर होत फिरत राहतो. त्यात काथ्या, कापूस, फोमरबर नाही आहे! पाणी आहे पाणी. हव्या त्या तापमानाचं पाणी त्यात भरून झोपायचं. तो तिकडे खिडकीत एअरकंडिशनर आहे बघा. थंडी असेल तर खालून वरून गरम. गरमी असेल तर खालून वरून थंड !... आणि केवळ भिंतींनाच नव्हे तर छतालाही मोठे आरसे!'

'अरे, पण केवढा मोठा बेड हा! चार माणसं सहज झोपतील यावर!'

'झोपतील नव्हे, लोळतील. दिवसभर मरमर राबल्यावर कुठंतरी कोपऱ्यात फाटकी सतरंजी टाकायला हा हिंदुस्थान नव्हे. ही अमेरिका आहे, अमेरिका!'

'अरे पण तुझी पत्नी, माझी सून, तुझी मुलं, माझे नातू?'

'बाबा, ही अमेरिका आहे! तुम्हाला मघाशीच मी सांगितलं ना की बुद्धिमान मेंदूंच्या परीक्षेत माझा पहिला नंबर आला? हे दुसऱ्या एका डॉक्टरांच्या संस्थेला कळलं. त्यांनी आपण होऊन मला बोलावून घेतलं, अन् माझ्याशी एक करार करून मला भरपूर पैशांची सोय करून दिली. त्यांचं योग्य ते कमिशन घेऊन माझी रक्कम मला न चुकता मिळते. हे अमेरिकन धंद्यांत मोठे चोख. लबाडी मुळीच नाही.'

'अरे पण तू काय देतोस ते तरी सांग.'

'बाबा, ती एक जागतिक संस्था आहे. जगातल्या सगळ्या देशांतून त्या

संस्थेकडे सतत मागणी येत असते अन् सगळ्या जगाची ती मागणी मुख्यत: मीच मोठ्या प्रमाणात पुरवीत असतो! ती संस्था माझ्यावरच चालली आहे म्हणा ना! अनेकांना माझ्यामुळे वरदान लाभलं आहे!'

'अरे, पण काय?'

'वीर्यदान!'

'काय, वीर्यदान?'

'होय, बाबा, निपुत्रिकांना वीर्यदान ! आणि बुद्ध्यंकाप्रमाणं दरही चढता असल्याकारणानं माझा दरही सर्वांत जास्त आहे! शीतपेटीत वीर्य गोठवून ठेवलं जातं आणि मागणीप्रमाणे पुरवठा होऊन माझे चेक्स परस्पर बँकेत जमा होतात. आता मला पैशांची ददात राहिली नाही आहे. हिंदुस्थानात अहोरात्र छळणारी पैशांची चिंता येथे एका रात्रीत नाहीशी झाली आहे. आणि बरं का, बाबा, ऐका. काही बायकांना असं अप्रत्यक्ष गर्भाधान चालत नाही! त्या पत्ता काढून प्रत्यक्षच इथं येतात. त्यासाठीच ही व्यवस्था...'

'बाळ, बाळ, काय केलंस तू हे? अरे, कसला सूड उगवलास माझ्यावर? लहानपणी शिक्षा केली म्हणून कसला हा दंड करतो आहेस तू मला! अरे बाळ, तू माझे नातू विकलेस? अरे, तुझ्या एका पुत्रमुखानंही माझा आत्मा तृप्त झाला असता. तू असंख्य पोरांना जन्म दिलास आणि दाही दिशांना माझे नातू भिरकावून दिलेस? अरे, कुठल्या वंशात, कुठल्या देशांत, कुठल्या कुळांत असतील माझे चिमुकले नातू? कुणी त्यांना प्रेमानं वाढवतील की गुलाम म्हणून विकतील की त्यांचे अवयव काढून त्यांचा व्यापार करतील! बाळू, त्यांना मी कुठं अन् कसं शोधू? मला माहिती आहे, वीर्यदान कोणाला केलं हे कायद्यानं गुप्तच ठेवलं जातं! आणि कळलं असतं तरी मी म्हातारा एकटा कुठंकुठं जाणार होतो? बाळ, बाळ, ती चिल्ली-पिल्ली रडत असतील- आक्रोश करीत असतील, तान्हेलीभुकेली असतील, आजारी असतील. तुझ्या एकट्याच्या भवितव्यानं माझ्या मनाचं सारं आकाश व्यापलं होतं. आता त्यांच्या भवितव्याच्या चिंतेनं माझं आकाश फाटलं रे फाटलं!'

दोन देह पडले होते -

एक शोष होऊन.

दुसरा अतिमद्यसेवन करून.

फोन घणघणत होता.

हेलिकॉप्टर वर घिरट्या घालीत होतं.

*****

# प्रत्यक्षाहुनि प्रतिमा उत्कट

टॅक्सी थांबल्याचा आणि हॉर्नचा आवाज आला म्हणून डॉ. नवीनचंद्र आपल्या फर्टिलिटी क्लिनिकमधून आतमध्ये आले आणि हातावरल्या घड्याळात पाहताच त्यांच्या चेहऱ्यावर आश्चर्याची आणि काहीशा त्रासिकतेची मुद्रा उमटली. त्यांनी गळ्यातल्या स्टेथॉस्कोपची घडी करून टेबलावर ठेवली. आणि मधले दार उघडून बाहेर बघितले. क्षणभर बघून ते तसेच परत फिरले. टेबलावरल्या वाईनचा एक पेग त्यांनी चटकन घेतला आणि खुर्चीत बसून कॉम्प्युटर सुरू केला. कॉम्प्युटर सुरू केल्याचे संगीत आणि दारावरली कॉलबेल एकाच वेळी वाजली.

''या, घर आपलंच आहे.'' काहीशा रागानेच ते बोलले अन् आपले काम त्यांनी चालूच ठेवले. दारातली स्त्री दारातच उभी होती. हे लक्षात येऊन जरा वेळाने डॉक्टर म्हणाले,''अहो, या ना. मोठ्या निर्धारानं बाहेर पडला होतात. आम्हाला वाटलं, तुम्ही तिकडेच रमणार, पण परतलात. ठीकच म्हटलं पाहिजे. या.''

पुन: कॉलबेल!

''काय, स्वागत समिती पाहिजे काय हारतुरे घेऊन?'' डॉक्टर म्हणाले आणि उठले. ''आता काय पुन: पाणिग्रहण करून सप्तपदी चालून उंबरठ्यावर माप ठेवून आत आणायचंय?''

डॉक्टर त्या स्त्रीसमोर उभे राहिले. मग तीच म्हणाली.

''तुम्ही? ... डॉक्टर? ... बाबा?''

''बाबा म्हणून नकोस. बाबा नाही. पण ... तू... ती? तीच तू? ... पण तुला यायला तर खूपच अवकाश होता?''

''राहवलं नाही म्हणून आधीच्याच फ्लाइटनं आले. तुमची तर पहिलीच भेट, बाबा!''

''बाबा नाही... बाबा नाही...''

''मग?''

''मग सांगेन. आधी आत ये. ये, घर तुझंच आहे. बघ, मीसुद्धा फसलो. तुला टॅक्सीतून उतरताना बघितलं–हुबेहूब ती! माझा प्रयोग शंभर टक्के यशस्वी झाला ! तू ... माझी... यशस्विनी!''

''यशस्विनी? नाही. नाही. मी घर चुकले तर नाही? पण नावाची पाटी वाचूनच बेल वाजवली. आपण डॉ. नवीनचंद्रच ना? माझं पत्र पोचलंय ना तुम्हाला? मी...''

''संयुक्ता! संयुक्ता! संयुक्ता!.. माझी संयोजिता! माझी यशस्विता! माझी यशस्विनी!

माझं यश ! माझं सर्वश्रेष्ठ यश! माझी यशा!''

डॉक्टर धावतच तिच्याकडे गेले. सूटकेस खाली ठेवून ती त्यांच्या पाया पडणार होती. पण डॉक्टरांनी तिचे हात हातांत घेतले आणि हातांचे मुके घेतले. तिची सूटकेस घेऊन तिचा हात धरून ओढतओढत धावतधावत तिला त्यांनी सोफ्यावर बसविले. फुलांनी शृंगारलेले आणि नाना शोभनांनी नटवलेले हार ती बघतच राहिली. त्याच आवेगात डॉक्टरांनी सगळे दिवे, सगळे पंखे सुरू केले. रंगीबेरंगी दिव्यांच्या माळा चमकू लागल्या. दिव्यांची झाडे लकलकू लागली. मग त्यांनी एका टेपरेकॉर्डरवर सनई लावली. दुसऱ्यावर पाश्चात्य नाचाचे संगीत लावले. ऑटोमॅटिक कॅमेरे, व्हिडिओ सुरू केले. रूम फ्रेशनरचे फवारे त्यांनी सर्वत्र मारले. घरातल्या कृत्रिम फुलांच्या कुंड्यांवर उडविले. तिच्या अंगावर एका कुपीतून अत्तराचा शिडकावा केला. मग एका बॉक्समधून पेढा आणि दुसऱ्या बॉक्समधून बर्फीचा तुकडा चमच्याने तिला भरवला. रंगीत सरबत दिले. ती ''नको... नको... पुरे... पुरे'' म्हणत होती. आणि डॉक्टर म्हणत होते,''अग, आज तुझा वाढदिवस! तू पूर्ण अठरा वर्षांची झालीस! टीनेजरचं तुझं शेवटचं वर्ष! तू पूर्ण स्त्री झालीस ! माझा प्रयोग पूर्ण झाला!''

''कसला प्रयोग?'' ती विचारीत होती. पण तिकडे लक्ष न देताच डॉक्टरांनी तिला उठवली आणि तिच्याबरोबर नाच सुरू केला. थोड्याच वेळात तो थांबवून ते म्हणाले,''हे घड्याळ बघ. ही तुला भेट. बरोबर अठरा वर्षांपूर्वी याचक्षणी तुझा जन्म झाला.'' आणि तिच्या हातात संगीत सुरी देऊन ते म्हणाले, ''हा केक काप लवकर! हॅपी बर्थ डे टू यू!'' डॉक्टरांनी टाळ्या वाजवीत गाणे म्हटले आणि म्हणाले,''चल, डान्स कर.''

''या सगळ्या आनंदात आई असायला हवी होती. हवीच होती. का नाही ती?'' तिने विचारले.

''तिला हा आनंद नको होता.'' ते उद्‌गारले.

''काय? हा एवढा मोठा आनंद आईला नको होता?''

''होय. होय. नको होता.''

''मग काय हवं होतं तिला?''

''शांती! शांती!''

''कसली शांती?''

''आत्मिक! आध्यात्मिक!''

''कुठं असेल ती आता?''

''कैलासवासीच झाली असेल!'' ते मोठ्याने हसले.

''कैलासवासी? आणि इथं आपण नाचगाणी करतो आहोत! आई... आई... आई...''ती मोठ्याने रडू लागली.

''रडू नकोस.''

''मग काय हसू?''

‘‘होय. हास, हास.’’

‘‘मला नकोय हा आनंद. माणूस स्वर्गात गेल्याचा आनंद. जन्ममरणातून सुटल्याचा आनंद. कैलासवासी झाल्याचा आनंद.’’

‘‘मलाही नकोय तसला आनंद.’’

‘‘मला या जगातला आनंद हवाय. खराखुरा आनंद.’’

‘‘मलाही या जगातलाच आनंद हवाय. खराखुरा आनंद. पूर्णानंद.’’

‘‘आनंद हवाय म्हणता अन् मला रडवता? रडवल्याचा आनंद?’’

‘‘रडण्याचं कारणच नाही. तुझी आई कैलास पर्वतावर स्वामी शिवानंदांच्या आश्रमात शांतीची साधना करायला गेली आहे.’’

‘‘मला टाकून?’’

‘‘मलासुद्धा!’’

‘‘मी येणार आहे हे माहिती असूनसुद्धा?’’

‘‘तुझं पत्र वाचूनसुद्धा!’’

‘‘जन्मभर हॉस्टेलमध्ये वाढले मी आणि आता माझ्या आयुष्यातल्या सर्वांत महत्त्वाच्या माझ्या वाढदिवशीसुद्धा?’’

‘‘या सगळ्याचा जप करीत मी तिच्यामागे जात असतानासुद्धा!’’

‘‘का, बाबा, का?’’

‘‘बाबा म्हणू नकोस. बाबा नाही.’’

‘‘का? का? का? का, बाबा, का? आई नाही आणि तुम्ही बाबा नाही, तर मी कोण? मी तुमची मुलगी नाही? मग अनाथाश्रमातून मला दत्तक आणलीत? की दुष्काळात अर्ध्या भाकरीवर विकत घेतलीत? की रस्त्यावरच्या कचराकुंडीत टाकून दिलेली दयेपोटी वाढविलीत?’’

‘‘यांतलं काहीही नाही, मुली. शांत हो. शांत हो. ती तुझी आईच. प्रत्यक्ष तिच्या पोटीच तुझा जन्म झाला आणि तुझा जन्म माझ्यामुळेच झाला. मीच तुला या जगात आणलं. आम्ही दोघांनीही आजवर तुझ्यावर जिवापाड प्रेमच केलं. आणि जन्मभरात आम्ही जे काही जमा केलं ते सारं घरदार तुझ्या हक्काचंच केलं.’’

‘‘प्रेम? प्रेम घरात असतं. तुम्ही मला कायम घराबाहेर ठेवलीत.’’

‘‘तुझ्या भल्यासाठीच. मुली, जगात जगायला नुसता गडगंज पैसा पुरत नाही. तो तर गुंडसुद्धा मिळवतात. मुली, माझ्याकडे तोसुद्धा नव्हताच. पण माझ्याकडे होती बुद्धी. अचाट, अफाट, भन्नाट कल्पना माझ्या मस्तकात थैमान घालीत असत. त्या कळण्याचीसुद्धा माझ्या आसपासच्या लोकांची लायकी नव्हती. पण मला त्या प्रत्यक्षात आणायच्या होत्या. त्यांतल्या बहुतेक मी आता प्रत्यक्षात आणल्या आहेत. मला ठोकरणाऱ्यांकडूनसुद्धा मी रोखठोक प्रशस्ती आणि संपत्ती पैदा केली आहे. ही पाहा स्मृतिचिन्हं. ही पदव्यांची भेंडोळी, ही मानपत्रं. पण या सगळ्याची किंमत मला आजपर्यंतच्या काळरूपानं द्यावी लागली.

माझा प्रयोग यशस्वी झाला ! त्यात माझा हात धरणारा जगात कुणीही नाही. जगभर माझा प्रयोग करून दाखवीत मी भटकलो. आणि या सगळ्या भटकंतीत मला मदतनीसाची आवश्यकता होती ती तुझ्या आईनं केली.''

''मग जन्मभर कष्ट करून विश्रांती मिळण्याच्या वेळीच ती निघून कशी गेली?''

''स्त्रीस्वभाव! दुसरं काय? जाऊ नकोस म्हणून मी तिचे पायसुद्धा धरले होते. अवघ्या जगावर लाथ मारणाऱ्या मी तिचे पाय धरले होते!''

''स्त्रीस्वभाव? मीसुद्धा स्त्रीच आहे ना?''

''काय सांगू? पण तुला कळलंच पाहिजे. तशी तू आता मोठी झालीच आहेस. तू स्त्रीच आहेस. पण जीवनाच्या सुरुवातीच्या दिवसांत आहेस. ती शेवटच्या दिवसांत होती.''

''शेवटच्या? काय वय आहे आईचं?''

''छत्तीस.''

''हे शेवटचं?''

''स्त्रीत्वाचं. तिची रजोनिवृत्ती झाली आणि ती जीवनातूनही निवृत्तच झाली. तिचा जीवनातला रस संपला. माझं आकर्षण संपलं. माझी वासना भडकत जाऊन बंड करू लागली पण ती मात्र शरीरानं थंड होत गेली. मनांत शांतीसाठी बेचैन झाली. शेवटी निघून गेली.''

''जन्मभर तिला तुम्ही दुय्यम भूमिका दिलीत. दुसरं काय करणार ती?''

''दुय्यम भूमिका? अग, मी तिच्यावर प्रेम केलं. तिला डोक्यावर घेतलं. माझ्या प्रयोगातली सहायक म्हणून जगभर तिला मानानं मिरवलं. माझ्या बुद्धीचा मला गर्व होता. म्हणून मलाही रूपगर्विताच हवी होती. तशीच ती होती. आणि सौंदर्यालासुद्धा विशिष्ट बुद्धीशिवाय सुंदरपणाच नसतो. तशी ती बुद्धिमतीसुद्धा होतीच. अशाच स्त्रीला मला अमर करायचं होतं. आणि ते मी केलं. तू तिचीच हुबेहूब प्रतिमाच आहेस. आणि मी ती केली. हाच माझा प्रयोग! पाहा. पाहा. आरशात पाहा. कुणीही पुरुष घायाळ व्हावा असंच तिचं रूप होतं. तसंच तुझंसुद्धा आहे! अग, व्हीनस, क्लिओपात्रा, जूलिएट, मस्तानी अशा सुंदरींची नुसती नावंच राहिली आहेत. पण तुमच्या प्रतिमा; साक्षात जिवंत चैतन्यमय प्रतिमा जगाच्या अंतापर्यंत यच्चयावत पुरुषांना घायाळ करीत मागे राहतील. देव आणि अप्सरा अजर असतात, अमर असतात आणि सर्वांगसुंदर असतात. तशाच तुमच्या प्रतिमा शाश्वत राहतील, हे जग नंदनवन होईल. त्या देवानं तुझ्या आईला केलं. पण तिची ही तू प्रतिमा मी केली. पाहा. पाहा.''

''आरशात नाही पाहायची मला माझी प्रतिमा. माझी प्रतिमा मला पाहायची आहे माझ्या आईच्या रूपातच. मला आईकडे घेऊन चला.''

''तुला तुझी प्रतिमा तुझ्या आईच्या रूपातच पाहायची आहे. पण तुझ्या आईला तुझी प्रतिमा तिच्या डोळ्यांसमोरसुद्धा नको आहे, त्याचं काय?''

''कसं शक्य आहे हे? काय सांगताहात तुम्ही मला हे? तुम्ही आहात तरी कोण?

बाबा नव्हेत तर मग कोण?''

''केव्हातरी कसंतरी कळणारच तुला हे. कळलंच पाहिजे. मनाची तयारी कर. धीर धर. मन शांत कर.''

''अहो सांगा लवकर.''

''मी डॉक्टर. मी तुझ्या आईवर क्लोनिंगचा प्रयोग केला. तिच्याच अंगातली एक पेशी काढून ती तिच्या कोषात घालून तिच्या गर्भाशयात तो कोष स्थापन केला. गर्भाधान केलं पण ते असं. सांगायला सोपं वाटतं पण करायला कमालीचं कौशल्य लागतं. प्राण्यांचं क्लोनिंग सोपं असतं. प्राण्यांची शरीरं माणसाच्या तुलनेनं सोपी असतात. माणसाचं शरीर फार फार गुंतागुंतीचं असतं. स्त्रीला शारीरिक आणि मानसिक औषधंही काळजीपूर्वक देत राहावं लागतं. प्राण्यांवर अनेकांनी प्रयोग केले होते. माणसांवरही अनेकजण करीतच होते. सर्वांत उत्तम माझा ठरला.''

''आणि मी बिनबापाची कन्या ठरले! कुणाला 'बाबा' म्हणू मी? बाबा, बाबा, कुठे आहात हो तुम्ही माझे बाबा? बाबा ऽ! बाबाऽऽ! कोण देणार ओ मला? कोण घेणार मला जवळ? कुणाच्या मांडीवर लोळू मी? कुणाच्या गळ्यात गळा घालू ? कुणापाशी हट्ट धरू? कुणाची वाट पाहून रडू?''

''रडण्याची कसली हौस? अग, हास, हसत राहा. सगळ्याच मुलींना काय बाबा असतात? कितीतरी मुलींचे बाप त्यांच्या जन्मापूर्वीच मरतात. कित्येक बाप असून नसल्यासारखेच असतात. कित्येक बाप मुलींना फक्त कामाला जुंपतात. कित्येक मुलींना मारहाण करतात. मुलींची विक्री करणारे बदमाष बापसुद्धा असतात आणि मुलींचा जीव घेणारे बापसुद्धा असतातच.''

''पण बाबा हे बाबाच असतात. मुलींचा छळ करणारे, मुलींचा जीव घेणारे बाबासुद्धा नाइलाजापोटी रडतच असतात. कोणता पिता माझ्यासाठी घळाघळा रडणार?''

''वेडे, प्रत्यक्ष पोटच्या पोरीवर डोळा ठेवणारे बापसुद्धा असतात. अग, साक्षात ब्रह्मदेवसुद्धा...''

''बाईवर सगळ्यांचीच नजर. बाईच्या वाट्याला सगळीच दु:खं. त्यांतच हे एक भरीला. बुडत्याला काडीचा आधार. माझ्यासारखीला तोही नाही.''

''हं. बायका म्हणजे रडणं. दु:खात तर रडायचंच. पण सुखातही रडायचं. अग, आज तुझ्या आयुष्यातला मंगल दिन आहे!''

''मंगल?''

''होय. होय. शुभ मंगल! तुझ्या आयुष्यातला आणि माझ्या आयुष्यातला. आपल्या दोघांच्या आयुष्यांतला! जे काही नाहीच त्यासाठी वेड्यासारखी का रडतेस? तुझ्यापुढे काय आहे पाहा तरी! अग, जगातला सर्वांत मोठा आधार तुझ्या पाठीशी आहे अन् तू निराधारासारखी रडतेस? जगातल्या सर्वश्रेष्ठ शास्त्रज्ञांपैकी एक म्हणून माझं नाव घेतलं जातंय. अन् यापुढे माझ्याबरोबर तुझंही नाव घेतलं जाणार आहे.''

“माझं?”

“होय. तुझं. अग, जगातल्या सगळ्या देशांतून मला मोठी मागणी आहे. बहुतेक देशांत आता क्लोनिंगला परवानगी आहेच. पण ज्या देशांत नाही तेथले लोक मला बोलावून घेतात, तेथील लोकांना आणि सरकारला पटवून देण्यासाठी आणि पटवून दिल्यावर क्लोनिंग करून दाखविण्यासाठी. तुझ्यासारखं सुंदर उदाहरण माझ्याबरोबर असेल तर हे काम किती जोरात होईल! अगं, ही विज्ञानानं केलेली मानवतेची सेवा आहे. तू वयात येईपर्यंत मी मुद्दामच थांबलो. तुला तुझ्या मनाप्रमाणं वागू देण्यासाठी. अगं, माझा प्रयोग प्रत्येक ठिकाणी बहुधा यशस्वी होतोच. पण त्यासाठी खूपखूप प्रयोग करावे लागतात; आणि त्यांत निष्णात आणि कुशल माणसाची मदत लागते. तुझी आई ती करीत होती. ती गेली. तिची वासना गेली. ती गेली. पण माझी वासना वाढतच गेली. मुळातच माझी वासना जबरदस्त होती. अतिसमर्थ होती. मलासुद्धा भयचकित करणारी होती. मी वयात आलो अन् आपल्या हातून काय होईल अन् काय नाही म्हणून घाबरत राहिलो. बाई, मग ती मोठी असो वा छोटी असो, यासाठीच मला तिची भीतीच वाटायची. पण माझी मतीही मला गुंग करणारीच होती. बुद्धी आणि अतिवासना एकत्रच वास करीत असतात. पण तरुणपणीच माझ्या लक्षात आलं – अनेक बायका निसर्गानं दिलेली प्रजननाची प्रेरणा नष्ट झाली की स्त्रीपुरुषसंबंधाच्या दृष्टिकोनातून निव्वळ प्रेतं बनतात. यावर अजून औषध निघालेलं नाही. आणि तेच बरं आहे. अगं, मुलाला जन्म देणं म्हणजे शरीराला कमाल ताण देणं आहे. ते तारुण्यातच शक्य आहे. अन् तेच योग्य आहे. पण पुरुषाला निसर्गानंच कधीही न संपणारी वासना दिली आहे आणि पुरुषानं ती वाढवणारी, नव्हे खवळवणारी, औषधंपण निर्माण केली आहेत. माझ्या आयुष्याची मी कालबद्ध योजना केली अन् ती काटेकोरपणे अमलात आणली. एकविसाव्या वर्षीच मी डॉक्टर झालो आणि विवाहित झालो. पुढे शिकत राहिलो पण संसारही करीत राहिलो. मूल न होणाऱ्या जोडप्यांना मूल कसं होईल, या शास्त्राचा मी प्रगत अभ्यास करीत होतो. तो करताकरताच क्लोनिंगचा अभ्यास अन् प्रयोग करीत होतो. त्यातून तुझा जन्म झाला. मला अन् माझी मदतनीस तुझ्या आईला तुझ्याकडे लक्ष द्यायला वेळच नव्हता. म्हणून तू थोडी मोठी होताच तुझी रवानगी वसतिगृहात केली. आज तू विशीला आलीस; मी अजून तिशीतच आहे. माझी पत्नी गेली पण तू तिची क्लोन आहेस. अगदी तश्शीच, तीच आहेस. माझं तिच्यावर प्रेम होतं आणि वयात असेपर्यंत तिचंही माझ्यावर प्रेम होतं. वाढत्या कामामुळं संसार वाढवणं आम्हांला शक्यच नव्हतं. आता ते शक्य आहे. माझ्या बुद्धीचा वारसा पुढे चालू ठेवणारे वारस मला निर्माण केलेच पाहिजेत. माझ्यासारखे बुद्धिमान; तुझ्यासारखे सुंदर. आणि तुझे एकदोन क्लोनही, ज्यांतून भावी काळी पुन्हा क्लोन करता येतील जे तुझ्या आईच्या, तुझ्या सौंदर्याचे वारस असतील. हा बघ. या ऑटोमॅटिक कॅमेऱ्यातून तुझा आताचा फोटो काढला आहे. हा आमचा लग्नाचा फोटो. तुझा फोटो तिच्या ठिकाणी फिट बसतो. अग, तू माझ्या पत्नीची क्लोन... साक्षात् प्रतिमाच... पत्नीच...”

‘‘माझ्या रक्ताचं या जगात एकच माणूस आहे– माझी आई.’’

‘‘म्हणूनच आपल्या लग्नाला काहीही हरकत नाही. अग, तुझ्या जन्माच्या दाखल्यावरचं तुझं नावसुद्धा बदलण्याचं कारण नाही. तू फक्त ‘हो’ म्हण.’’

‘‘मला आधी आईला भेटायचंय.’’

‘‘ती परत येणार नाही आहे.’’

‘‘पण मला तिला भेटायचंय.’’

‘‘पण तिला तुला भेटायचं नाही आहे. म्हणून तर ती निघून गेली आहे.’’

‘‘तुमच्याबरोबर भेटायचं नाही आहे. मी एकटीच गेले तर नक्की भेटेल.’’

‘‘कशावरून?’’

‘‘मी स्त्री आहे म्हणून.’’

‘‘मग मीपण पुरुष आहे. मीपण तुला सोडणार नाही आहे.’’

‘‘आधी मला तिला भेटायचंय. तिची परवानगी घ्यायची आहे.’’

‘‘ती तुला मिळणारच नाही आहे. तुला ठाऊक आहे.’’

‘‘आईऽ आईऽऽ आई’’

‘‘तू माझी झाल्याशिवाय मी तुला सोडणार नाही.’’

ती उठली आणि दाराकडे पळून जाऊ लागली. एक प्रकारचे वेडाचे वारेच तिच्या अंगात शिरले होते. पण डॉक्टरांनीही दार अडवले. दोघांची झटापट झाली. डॉक्टरांनी फाडकन तिच्या तोंडात दिली. ती सोफ्यावर पडली. तिचा पदर ढळला होता. तिच्या पोटऱ्या उघड्या पडल्या होत्या. ती धुमसत मुसमुसत होती. अन् डॉक्टर तिला न्याहाळत होते. मग ते उद्‌गारले,‘‘तुझं हे वेड जाण्याचा एकच मार्ग आहे– लग्न, शरीरसंबंध. तुझ्यासारख्या बायकांना पुरुषांकडून असं मारून घेणं आवडतं. पुरुषाच्या मर्दपणाचा हात पुराव्यासहित त्यांना असा हवा असतो. अन् तोच पुरुष त्यांच्या सौंदर्यानं त्यांच्या पायाशी लागण्याइतका घायाळ झालेला पाहणंही त्यांना आवडतं. मग त्या त्याला हवं ते देतात अन् स्वत:ला हवं तेही घेतात.’’

‘‘ठीक आहे.’’ ती म्हणाली आणि उठली. उभी राहिली. म्हणाली, ‘‘मी वॉश घेते. प्रवासातून आलेय. कपडे बदलते. तयार होते. मला भूक लागली आहे. मग जेवू या.’’ ती आतल्या खोलीकडे निघाली. डॉक्टर तिच्या मागोमाग आले आणि त्यांनी आतल्या खोलीचे दार अडवले. ते म्हणाले,‘‘घर तुला नवीन आहे. मी तुला दाखवतो. मदत करतो.’’ ‘‘नको, नको,’’ ती म्हणाली,‘‘बायकांना घराची ओळख करून द्यावी लागत नाही. मला सगळं ठाऊक आहे. मी खूप दमले आहे. आधी चांगली फ्रेश होते. मग सगळं.’’ मग डॉक्टरांनी अडवलं नाही. ते तिच्याकडे खिळून पाहतच होते. ती आपली सूटकेस घेऊन आत गेली. तिने दार लावून घेतले, पण डॉक्टर तिकडेच खिळून पाहत राहिले.

डॉक्टर प्रफुल्लित झाले. तेही दुसऱ्या खोलीत गेले. सैलसर कपडे म्हणजे नाइटसूट

घालून आणि वर ड्रेसिंग गाऊन घालून ते बाहेर आले. त्यांनी वाईन घेतली. झगझगीत दिवे बंद करून मंद दिवे लावले. टेपरेकॉर्डरवर शांत लयीतले पण नाचाचे संगीत लावले. स्वत:वर आणि खोलीवर त्यांनी अत्तराचे फवारे उडवले. एका दागिन्याच्या पेटीतून रंगीत लाल खड्याची अंगठी काढून बघून पुन: ठेवली. एका बॉक्समधून गुलाबाच्या फुलांचे हार, गजरे काढून बघून त्यांचा सुगंध घेऊन ती बॉक्स उघडीच त्यांनी ती ज्या खोलीत गेली तिच्या दाराशी स्टुलावर ठेवली. सोफ्यासमोरच्या टीपॉयवर पेढेबर्फीच्या बॉक्सेस उघड्याच होत्या. त्यांतली पेढे-बर्फी तोंडात टाकून त्यांनी त्या बंद केल्या. बर्थडे केकच्या बॉक्ससह सगळ्या त्यांनी उचलून घेतल्या. सुरीही घेतली आणि मध्यभागी उभे राहून 'कुठे ठेवू या' असा विचार करीत राहिले.

इतक्यात आतल्या खोलीतून मोठे फर्निचर धाडकन पडल्याचा आणि श्वास कोंडल्याचा आणि एकच मोठी उचकी लागल्याचा आवाज ऐकू आला. हातांतले सामान तसेच टाकून धावत जाऊन त्यांनी दार उघडण्याचा प्रयत्न केला. ते बंद होते. त्यांनी धक्के मारले, लाथा मारल्या. शेवटी स्टूल उचलून पुढे धरून त्यांनी दारावर झेप टाकली. दार मोडले. ते पडले. आतून पंख्याला बांधलेला दोरीचा फास गळ्याला लावून घेऊन लोंबणाऱ्या स्त्रीदेहाची काळी छाया ते उठले तेव्हा त्यांच्या अंगावर पडली. उशीर झाला होता. त्यांच्या लक्षात आले. त्यांना धक्का बसला. ते परतले. त्यांनी सुरी उचलली अन् स्वत:च्या हृदयात खोलवर खुपसून घेतली. तसेच ते दाराकडे बघत होते. ती काळी छाया त्यांच्या अंगावरून झोके घेत होती. मग आधी गुडघ्यांवर आणि मग जोडलेल्या हातांवर ते कोसळले.

*****

# विषकन्या

मी एकदम जागा झालो. घड्याळात बघितलं. बॉम्बे सेंट्रल यायला खरं तर अजून तास होता. अचानक जाग कशी आली? एस.टी. च्या खिडकीतून बाहेर बघितलं. गोवा-मुंबई रस्त्याला बंगलोर-मुंबई रस्ता येऊन मिळालेला होता. वाहनांची गर्दी दुप्पट झालेली. बिनसाखळ्यांच्या आगगाड्याच भरधाव वेगानं उलटसुलट चाललेल्या. खरं तर, त्यांच्या आवाजानंच एक प्रकारची गुंगी येते. मग जाग कशी आली? अन् एकदम जाणवलं, गुदमरायला होतंय, श्वास घेता येत नाही आहे. दमा तर आपल्याला कधीच नव्हता. मग? हां! हा ह्या वाहनांचा धूर, डिझेलचा धूर, धूर, धूर. समुद्रसपाटी असूनही, वारा असूनही दाट होणारा काळानिळा विषारी धूर. आता इतक्यातच मुंबई सुरू होणार. मग तर उंचउंच इमारतींमुळे धूर अडून राहणार. श्वास गुदमरू लागला. जीव कासावीस झाला. मी रुमाल काढला. तो चांगला चौघडी केला. नाकाला लावून शक्य तितक्या हळू श्वास घेऊ लागलो. वाटलं, गाळून गाळून पण धूरच येणार की! काय करणार? ही दमलेली, नाही म्हटलं तरी ऐंशी वर्षांच्या वाटचालीत खराब झालेली फुफ्फुसं एकदम बंद पडली, तर?

''आजोबा, कशाला दूर खेडेगावात एकटं राहता? या ना मुंबईत. आमचा तीन कोटींचा सहा खोल्यांचा फ्लॅट पाहा तरी. वास्तुप्रवेश केला तेव्हा 'बरं नाही' म्हणून आला नाहीत. आता तब्येत ठीक आहे तर या आणि राहा इथंच.'' नातीचं पत्र खिशात होतंच. तिचा तो पक्ष्यासारखा गोडगोड आवाज कानात गुंजत होता. गाण्यांच्या पालुपदासारखा पुन: पुन: मनात येत होता. मोठी झाली. शिकली. एअरहोस्टेस झाली. तरी आवाज लहानपणीसारखा कोवळा राहिला होता; निर्मळ, निरागस राहिला होता; लोभस, जीव लावणारा राहिला होता. कुणालाही आपलंसं करणारा, जिंकणारा. म्हणून तर एअरहोस्टेस झाली. तिच्या आवाजानंच सगळंसगळं विसरायला होतं.

''आजोबा!'' तिचाच आवाज. पण एकदम चार पदरी कसा? छान ! इतक्या सकाळी तिन्ही मुलांना घेऊन आलीय. बरोबर! पहाट झाली ना! पक्ष्यांचा चिवचिवाट सुरू झाला. नको, नको म्हणताना तिच्या नवऱ्यानं हातातली पिशवी काढून घेतली. मी म्हटलं,''जरा वरचं सामान बघता का? नारळाचं पोतं, फणसांची पार्सलं आणि... ''
''आजोबा, किती कष्ट करता? मुंबईत सगळं मिळतं.''

''घरचं?'' मी विचारलं.

भली मोठी आठ माणसांची गाडी. गाडीत माणसं फक्त सहा! म्हटलं तर साडेचार. म्हणजे जवळजवळ दुप्पट क्षमतेची गाडी; पण मोठ्या माणसाला गाडीपण मोठीच हवी ना! जावईबापू एका मोठ्या आंतरराष्ट्रीय कंपनीत एम.डी. होते- मॅनेजिंग डिरेक्टर! ड्रायव्हर ठेवलेला होता; पण आता गंमत म्हणून- आणि माझा मान म्हणून - ते स्वत: गाडी चालवीत

होते. ते म्हणाले, ‘‘प्लीज, जरा खिडकीची काच उघडता का? एअरकंडिशनिंगमध्ये काहीतरी प्रॉब्लेम आहे. सकाळी निघताना समजला. दुपारी दुरुस्त करू.’’ गॉगलसारखी दिसणारी काच मी खाली केली. अन् काय! सकाळ असो, दुपार असो, रात्र असो, मुंबईत रस्ते लहानमोठ्या गाड्यांनी भरलेलेच. त्यातही पहाटे मोठ्या ट्रक्सच्या रांगा, रात्रभर दुरून प्रवास करून मुंबईत येणाऱ्या. आणि ट्रक्स म्हणजे डिझेल. आणि डिझेल म्हणजे आवाज आणि धूर. माझा जीव गुदमरला. मला कसलाच धूर चालत नाही. बिडी, सिगरेट तर राहोच, उदबत्तीसुद्धा. मुंबईत तर सोन्याचाही धूर!

शेवटी ती तीस मजली इमारत आली. सॉरी, इमारत नव्हे, मंझिल. सितारा मंझिल! ‘‘आजोबा, सामान राहू द्या. जरा वेळानं गडी येतील, ते आणतील. चला.’’ लिफ्ट! थोड्याच वेळात सत्ताविसाव्या मजल्यावर आली. ‘‘आजोबा, मला जास्तीतजास्त उंच राहायला आवडतं.’’ मी म्हटलं,‘‘बरोबरच आहे. उंची लोक, उंची राहणी.’’ पण हसून ती पुढे म्हणाली,‘‘अहो, तेवढीच शुद्ध हवा नाही का?’’ ‘‘बरोबर आहे,’’ मी म्हटलं.‘‘शिवाय दूरवरचा देखावाही छान दिसतो.’’ शुद्ध हवेचा प्रॉब्लेम मुंबईकरांनी उंची राहण्यानं सोडवलाय. खरं म्हणजे सोडवण्याचा प्रयत्न केलाय. वरून एक विमान गेलं. जरा वेळानं दुसरं. जरा वेळानं तिसरं. लोकलगाडीच जणू. खालचा धूर वर येणार. वरचा धूर खाली येणार. धूर, धूर, धूर फक्त धूर.

‘‘चला, वॉश घ्या. मग, आधी ब्रेकफास्ट.’’ टूथपेस्ट. मला एक सवय लागलीय, वेष्टनावरचा मजकूर वाचायची. ‘चोवीस तास जंतूंचा नाश करणारी टूथपेस्ट.’ छान! म्हणजे चोवीस तास जंतुनाशक विषाची गुळणी तोंडात घेऊन बसायचं! साबण जर्मिसायडल आणि डिओडोरण्ड. सगळ्या जगातल्या जंतूंनी तुमच्या अंगावर वसाहत केली तरी ती मारून नष्ट करण्याचं आश्वासन देणारा. वास चांगला होता; पण म्हणजे साबणाचा– जंतुनाशकाचा –थर तोंडावर राहिला होता. आंघोळीनंतर तर सर्व अंगावर! सुगंध मला आवडतात. कोणाला आवडणार नाहीत? पण कायम तीव्र सुगंध घेत राहणं मला कसंसंच वाटतं. भरपूर पाण्यानं स्वच्छ आंघोळ केल्यावर प्रसन्न वाटतं. तो जीवनसुगंध; पण मुंबईत भरपूर पाणी असणार कुठून? तिथं हे कृत्रिम सुगंधच. सुगंधांतही नैसर्गिक ताज्या फुलांचा सुगंध कसा आपल्यालाही ताजं करतो. नाहीतर हे!

‘‘वा! किती सुंदर आहे हे ब्रेकफास्टचं टेबल! लाकडीच आहे ना? की प्लॅस्टिकचं? काचेसारखं चमकतंय.’’ त्यावर हसून ती म्हणाली,‘‘अहो, अगदी लाकडी. पण काही सांडलं लवंडलं तरी पॉलिश जाऊ नये असं पॉलिश लावलेलं.’’ ब्रेड, बटर, जॅम, सॉस, मुलं आणि त्यांचे आई–वडील आवडीआवडीनं खात होते. चव चांगलीच होती. मी पदार्थांचं, मुलांचं, घराचं कौतुक करत होतो. अन् एकीकडे बाटल्यांची वेष्टनं वाचीत होतो. सर्वत्र एक घोषणा ‘आवश्यक ती प्रिझर्व्हेटिव्हस् घातलेली!’ म्हणजे जंतुनाशकं मिसळलेली. खाद्यपदार्थ खराब होऊ नयेत म्हणून. अंगावर जंतुनाशकं, पोटांत जंतुनाशकं! अंतर्बाह्य जंतुनाशकमय होऊन राहायचं!

''चला, बाथरूम बघा. स्नान करा आणि विश्रांती घ्या. रात्रभराच्या प्रवासानं दमला असाल.''प्रेमानं ती म्हणाली. बादलीभर गरम पाणी ताबडतोब तयार. त्यात एक औषध तिनं ओतलं. ''पाणी शुद्ध, आपलं अंग शुद्ध.'' ती म्हणाली. हवं तितकं पाणी घ्या. अन् हे औषधही.'' काय बोलणार? ''वा! वा! छान! छान!'' असं श्वासागणिक म्हणत राहिलोच. शुद्ध म्हणजे जंतू असलेलं पण जंतू नष्ट झालेलं, अशीच जणू शुद्धतेची व्याख्या झालीय. ''काय ग, ही बाथरूम की ताजमहाल?'' सगळी चकमक पाहत मी कौतुकानं म्हटलं. तिलाही ते आवडलं. ती मनापासून हसली आणि बाहेर गेली. चला, जंतू असलेल्या पण जंतू निर्जीव झालेल्या पाण्यानं स्नान ! मला एकदा कुठंतरी संसर्ग झाला अन् एक त्वचारोग झाला. कातडीवर लाल पुरळ येई अन् त्यातून पाणी येई. मी असेच जंतुनाशक साबण आणि जंतुनाशक औषधं पाण्यात घालायची आणून निर्जंतुकीकरणाची मोहीम चालू ठेवली. पण रोग वाढतच गेला. शेवटी तज्ज्ञांकडे जावंच लागलं. या मोहिमेचं त्यांना सांगितलं. ते म्हणाले,''अहो, ती जंतुनाशकं वापरू नका. फार तीव्र आहेत. त्यांनी वाईट जंतू मरतात हे खरंच पण चांगलेही मरतात. म्हणूनच रोग बरा होत नाही. आता मी देतो ती औषधं घ्या.'' चार दिवसांत रोग खलास! आंघोळ झाली. अंग पुसता पुसता बाथरूम निरखून बघितली. ही काय बाथरूम की रासायनिक प्रयोगशाळा? शाम्पूच्या बाटल्या, अँटिडॅन्ड्रफ म्हणजे जंतुनाशकं, घशातले जंतू मारण्यासाठी चुळा भरण्याची औषधं. अर्थातच जंतुनाशकं बाथरूममध्ये. अर्थातच टॉयलेटमध्येसुद्धा! ही आधुनिक पद्धत! टॉयलेट स्वच्छ करण्यासाठी आणखी तीव्र जंतुनाशक औषधं. स्वच्छतेत आपल्याकडून गावंढळपणा होऊ नये म्हणून मी ते टॉयलेटमध्ये शिंपडलं. त्या वासानं माझा घसा धरला. ओकारी आल्यासारखं झालं! आता तोंड स्वच्छ करायचं तरी जंतुनाशकांनीच ना? बाहेर आलो. स्वच्छ हवा गॅलरीत जाऊन घेतली. जरा बरं वाटलं.

मग तिनं सगळं घर दाखवलं. आधी स्वयंपाकघर, सॉरी, किचन. काचेची कपाटं. भलामोठा दोन दारांचा फ्रिज. 'वा! वा! छान! सुंदर! सुरेख! अप्रतिम! कमाल आहे!' असे चांगले या अर्थाचे आठवतील तितके शब्द उच्चारून मी कौतुकाचा वर्षाव करीत होतो. 'चांगलं' म्हणायचं नाही, 'उत्तम'च म्हणायचं. पण माझं लक्ष नाही म्हटलं तरी जंतूंशी लढाया करणाऱ्या द्रव्यांकडे आणि साधनांकडे जातच होतं. झुरळं मारण्याची औषधं, किडे मारण्याची औषधं, औषधं कसली? विषंच ती. नंतर दिवाणखाना. सॉरी, ड्रॉइंगरूम. एक बाई बादली आणि जंतुनाशकाची बाटली घेऊनच लादी पुसत होती. घरात सर्वत्र सुगंध पसरविणारी उपकरणं होती. ''त्यांनी बारीकसारीक किडे-जंतूही नाहीसे होतात,'' ती म्हणाली. शेवटी झोपण्याची माझी खोली. तिच्यात रात्री डास मारण्याची यंत्रं तयार ठेवलेलीच. म्हणजे जागेपणीच नव्हे तर झोपेतही विषमय होत राहायचं! मी नातीला म्हटलं,''मुली, अगं विषांनी घर भरलंय, असं नाही का तुला वाटत?'' ती म्हणाली,''आजोबा, आपल्याला बाधणार नाहीत इतकंच प्रमाण असतं त्यांत.'' ''अगं, पण एकेकात. या सगळ्यांचा एकत्र परिणाम? मुली, मला भीती वाटते, या सगळ्या विषांत राहून तू विषकन्या झाली असशील! आणि मुलं, आणि मिस्टर! तुम्ही विश्वसंचार करता की विषसंचार करता?''

*****

# न्यायाला मदत

न्यायाधीश महाराज निकालपत्र वाचीत होते :-

'फिर्यादी पक्ष आणि बचाव पक्ष या दोघांनी उपस्थित केलेल्या सर्व मुद्यांची कसून चिकित्सा केल्यानंतर न्यायालय याच निर्णयाला येऊन पोचले आहे की सदर खूनखटल्याच्या प्रकरणात आरोपीवर खुनाचा आरोप निर्विवादपणे शाबीत होत आहे. हा खून पूर्वनियोजित रीतीने, थंड डोक्याने, आणि बळी पडलेल्या व्यक्तीचा अपराध किंवा चिथावणी नसताना झालेला आहे. याबाबतची कारणे सारांशरूपाने थोडक्यात पुढीलप्रमाणे सांगता येतील–

(१) आरोपीने स्वत:च आपण आपल्या एकेकाळच्या प्रेयसीचा खून आपण बेकार झाल्याकारणामुळे, तिने लग्नास नकार दिला याचा राग येऊन केल्याचे कबूल केले आहे. ही कबुली आपण स्वेच्छेने देत असल्याचे त्याने आवर्जून सांगितले आहे. पोलिस अधिकाऱ्यांनी आपला शारीरिक किंवा मानसिक छळ केला नाही, हेही आरोपीने कबूल केले आहे. इतकेच नव्हे तर आपल्या प्रेयसीने आपणांस मनाचा समतोल बिघडेल अशा प्रकारची कोणतीही चिथावणी कृतीने किंवा शब्दांनी दिली नव्हती; हेही आरोपीने सांगितले आहे. राम गणेश गडकरी या सुप्रसिद्ध मराठी नाटककर्त्यांनी आपल्या 'भावबंधन' नाटकात वर्णन केल्याप्रमाणे सदर आरोपीने घनश्यामची भूमिका साकार केली आहे. लतिकेच्या अपराधाबद्दल घनश्यामने मालतीसही प्रायश्चित्त देण्याचा प्रयत्न केला. त्याप्रमाणे इतरांनी केलेल्या अपमानाचा सूड आरोपीने प्रेयसीवर उगवला आहे.

(२) ज्या हत्याराने म्हणजे गावठी पिस्तुलाने हा खून आरोपीने केला, ते त्याने खाडीत टाकून दिले होते. पण पोलिसांनी चौकशी करताच आरोपीने स्वत:च ती जागा दाखविली आणि पोलिसांनी शोध घेताच ते हत्यार मिळाले. या पिस्तुलानेच खून झाला आहे, हे तज्ज्ञांनी सांगितले आहे. नाटकात काम करण्याच्या निमित्ताने आरोपीने पिस्तुलाची आणि पिस्तूल चालवण्याची माहिती करून घेतली होती. इतकेच नव्हे तर नाटकात खऱ्या पिस्तुलासारखे दिसणारे पिस्तूल हवे म्हणून आरोपीने एका गावठी लोहाराच्या एजंटाकडून ते विकत घेतल्याचे कबूल केले आहे.

(३) आरोपीचा प्रेयसीचा खून करण्याचा हेतूसुद्धा सिद्ध होत आहे. आरोपीचा व्यवसाय नाटकांत कामे करण्याचा होता. शोकांतिकांत काम करणे त्याला विशेष आवडत असे. त्याच्या कामावर त्याची प्रेयसी खूष होती आणि त्यांचे संबंध प्रेमाचे झाले होते. पुढे आरोपीला कामे मिळेनाशी झाली. त्या प्रेयसीला मात्र अधिक जादा कामे मिळू लागली. तिने आरोपीला विनोदी नाटकांत कामे करण्याचा आग्रह केला. पण तो त्याला मुळीच पसंत नव्हता. इथे त्यांच्या वादास प्रारंभ झाला. प्रेयसीला सतत कामे मिळाल्यामुळे तिचा साहजिकपणेच इतर पुरुष नटांशी संबंध आला. नाटकात म्हणून तिला प्रेमप्रकरणे

रंगविणे भाग पडले. पण आरोपीच्या मनात मत्सराने ठाण मांडल्याने त्याला ते सहन होईना.त्यामुळे दोघांचे वादविवाद होऊ लागले, असे अनेक शेजाऱ्यांनी सांगितले आहे. या साक्षी खोट्या मानण्यास काही कारण नाही. एखाद्या प्रभावी शोकांतिकेत आपणास प्रेयसीबरोबर प्रमुख भूमिका मिळेल, अशी आकांक्षा हा नट बाळगून होता. परंतु ती सफल झाली नाही. इतकेच नव्हे तर एका नवीन नाटककाराने तसे नाटक तयार केले असता, कामाच्या गर्दीमुळे आणि नाटक प्रभावी न वाटल्याकारणाने प्रेयसीने ते नाकारले. त्यामुळे आरोपीचा क्रोध अनावर झाला, हे उघड दिसून येते. अशा प्रकारे आरोपीचा गुन्ह्याचा हेतू उघड होत आहे.

(४) प्रेयसीच्या घरी तपास घेतला असताना आरोपीचे आणि प्रेयसीचे एकत्र घेतलेले फोटो सापडले आहेत. हे केवळ नाटकांसाठी आणि नाटकांच्या जाहिरातींसाठीच घेतले असतील असे नव्हे. या फोटोंवरून त्या दोघांचे प्रेमसंबंध असावेत, या तर्कास पुष्टीच मिळते. त्याचबरोबर याच प्रेयसीचे ती काम करीत असलेल्या एका नव्या नाटकातील नायकाबरोबरचेही फोटो उपलब्ध झाले आहेत. आरोपीचे प्रेयसीच्या घरी जाणे नेहमीच चालू होते. तेव्हा त्याने ते फोटो पाहिलेले असणे अशक्य नाही; कारण असे काही फोटो तिच्या फ्लॅटमधील बाहेरच्या खोलीत टेबलावरच होते. हा परिस्थितिजन्य पुरावा महत्त्वाचा मानण्यास हरकत नाही.

(५) आरोपी या सर्व मानसिक संघर्षामुळे मनोरुग्ण झाला होता, हा एक महत्त्वाचा प्रश्न या खटल्यात उपस्थित झाला होता. तेव्हा मानसशास्त्रज्ञ डॉक्टरांची साक्ष घेण्यात आली. त्यांच्या मते, आरोपीने खुनाचा गुन्हा केल्यानंतर तो काही काळ मनोरुग्ण झाला असावा आणि त्यास मानसिक आजाराचे मधेमधे झटके येत असावेत. परंतु प्रत्यक्ष गुन्हा घडण्यापूर्वीपासून तो सतत मनोरुग्णच असेल असा निष्कर्ष काढता येत नाही.

तात्पर्य, आरोपीने हा गुन्हा जाणीवपूर्वक केला आहे, असेच म्हणावे लागते.

(६) आरोपीच्या या निर्घृण कृत्यामुळे एका निष्पाप व्यक्तीचा नाहक बळी गेलेला असून समाज एका चांगल्या कलावतीला कायमचा मुकलेला आहे. ही कलावती प्रसिद्धीच्या शिखरावर असताना तिच्या मृत्यूची योजना करण्याचा विचार फक्त एका विकृत, अपराधी वृत्तीच्या माणसाच्या मनातच येणे शक्य आहे. असा मनुष्य हा समाजाला धोकाच मानला पाहिजे.

या सर्व कारणांमुळे आरोपीला कायद्याने सांगितलेली कमाल शिक्षा देणेच न्यायाचे ठरणार आहे.''

न्यायाधीशमहाशय एवढे निकालपत्र वाचून त्यावर स्वाक्षरी करणार इतक्यात एक तरुण स्त्री त्यांच्यासमोर येऊन बोलू लागली–

''न्यायाधीशमहाराज, क्षमा करावी. हे माझे ओळखपत्र आपण, कृपया, पाहावे. मी येथील एका महाविद्यालयात मानसशास्त्राची प्राध्यापिका आहे. मनोविकृतींचा मी सखोल अभ्यास करीत आहे. त्यामुळे या खटल्याचा वृत्तांत मी रोज काळजीपूर्वक वाचीत होते.

माझी खात्री झाली आहे की सदर आरोपी खुनी तर नाहीच नाही उलट एक प्रतिभाशाली कलावंत आहे. जीनियस इज मॅड–प्रतिभावंत वेडे असतात, असं एक वचन आहे. त्याचं हे एक सुंदर आणि महत्त्वाचं उदाहरण आहे. जिचा खून झाला त्या नटीवर त्याचं खरोखरच मनापासून फार प्रेम होतं. तिच्या जिवालाच काय केसालासुद्धा धक्का लागणं त्याला मंजूर नव्हतं. पण तीच त्याला भीती वाटत होती. म्हणून तो तिला वरचेवर भेटत होता. तिच्यावर लक्ष ठेवत होता. इतकं करूनही आपण तिला वाचवू शकलो नाही, या अपराधीपणाच्या भावनेनं त्याला घेरलं. आणि म्हणून तिच्या मृत्यूला आपणच जबाबदार आहोत असंच त्याच्या मनानं घेतलं. आणि ती मृत्यूच्या अधीन झाली तसं आपणही मृत्यूच्या अधीन झालंच पाहिजे, असं त्यानं ठरवलं. आपण पापी आहोत, आपल्याला प्रायश्चित्त मिळालंच पाहिजे, आपल्याला फाशी झालीच पाहिजे, या दृष्टीनंच त्याच्या विचाराची पावलं पडू लागली. अहोरात्र त्याला मृत्यूचा ध्यास लागला. यालाच मानसशास्त्रात डेथविश–मृत्यूची ओढ–म्हणतात. आधीच त्याच्या मनात शोकांतिकांची ओढ होती. अनेक महान शोकांतिकांत कामं करून त्याची ती ओढ बलवत्तर झाली होती. तो स्वत:ला विसरून, बेभान होऊन काम करीत असे. कित्येक वेळा त्या ट्रॅजिक मूडमधून– शोकात्म वृत्तीमधून – बाहेर पडणं त्याला अशक्य होत असे. इकडे लोकांची अभिरुचीच नष्ट झाली. लोकांना बाजारू, भडक, उथळ, कामोत्तेजक दृश्यमालिकांची, नाचांची चटक लागली. या जगात तो परका ठरला. हे सगळं त्या नाट्यप्रेमी नटीला कळत होतं. तिचंही याच्यावर फार प्रेम होतं. ती याला बदलायला पाहत होती. त्याच्या शोकमय कोषातून त्याला बाहेर ओढत होती. हेच त्यांचे वाद होते. तिचे प्रयत्न अपुरे पडत होते. त्या नटीच्या सौंदर्याचा, कलेचा आणि प्रसिद्धीचा फायदा उठवू पाहणारे लोक तिच्या आयुष्यातून तिच्या प्रियकराला उठवू पाहत होते. पण ती त्याच्याशी विवाहही करू शकत नव्हती आणि त्याला विसरूही शकत नव्हती. या तिच्या वेडाची शिक्षा तिला द्यायची, असं तिचं प्रेम जिंकण्यात अयशस्वी झालेल्या माणसानं ठरवलं, आणि त्यात तो यशस्वी झाला आणि ही तिला दिलेली मृत्युदंडाची शिक्षा या आरोपीच्या माथी घालण्यातही तो यशस्वी झाला. नाटक पाहून त्याला एवढं माहीत झालं होतं की इतकं जिवापलीकडे प्रेम करणारे प्रियकर–प्रेयसी दोघांपैकी एकाच्या मृत्यूनंतर मागे राहत नसतात. म्हणून तो या आरोपीचं नाव त्यात गोवून मोकळा झाला आणि या आरोपीनं असल्या भिकार जगाचा कायमचा निरोप घेण्याच्या ओढीपुढं त्या कपटी माणसाच्या काव्याकडे कानाडोळा केला. या जगात खऱ्या पापी माणसाचं पाप सिद्ध करणं अशक्य पण पुण्यवान माणसाच्या माथी तो आरोप मारणं मात्र सहज शक्य! आणि तो कपटी माणूस पकडला गेलाच असता, त्याचा आरोप सिद्ध झालाच असता, तो फाशी गेलाच असता तरी त्यामुळे त्याची मरण पावलेली प्रेयसी त्याला थोडीच परत मिळणार होती? तिच्यावाचून तर त्याला क्षणभरही राहणं शक्य नव्हतं.

न्यायाधीशमहाराज, आपण विचाराल, मग त्यानं ते हत्यार, ते पिस्तुल कसं शोधून दिलं? न्यायाधीशमहाराज, हुशार पोलिसइन्स्पेक्टरनंसुद्धा तेथील स्थलविशेष पाहून

विचारपूर्वक ते शोधून काढलं असतंच की नाही? हा आरोपी तशा इन्स्पेक्टरपेक्षा काही कमी हुशार नाही. काकणभर जास्तच. आपलाही अंत लवकर व्हावा म्हणून तो भराभर कबुलीजबाब देत राहिला! न्यायाला मदत करीत राहिला!

त्याची मरणाची ओढ निश्चित होती. म्हणून त्या ओढीनं त्याला एक प्रकारची शांत वृत्ती प्राप्त झाली होती. म्हणून मानसशास्त्रज्ञ डॉक्टरांनासुद्धा वाटलं, की हा जाणिवेत आहे. पण त्याचा नेणिवेचा प्रवास केव्हाच सुरू झाला होता.

न्यायाधीशमहाराज, न्यायाला मदत करणं हे प्रत्येक नागरिकाचं कर्तव्य आहे. म्हणून मी आपल्याला त्रास दिला. क्षमा असावी.

न्यायाधीशमहाराज, घडलेल्या गुन्ह्यासाठी गुन्हेगार निश्चित ठरून त्याला शाश्वतची शिक्षा झाली की आपण अनंत कालचे मुक्त झालो असं मानणारे खरे गुन्हेगार प्रवृत्तीचे लोक असतात. म्हणून, अयशस्वी अर्जुनाचा मृत्यू पाहायला उत्सुक झालेल्या जयद्रथाप्रमाणे ते रणक्षेत्रावर उपस्थित असतात. इथं येण्यापूर्वी मी पोलिसइन्स्पेक्टरना विनंती करून आले की कोर्टाच्या आवारातून कुणालाही पळून जाऊ देऊ नका. पोलिस इन्स्पेक्टरांनी आपलं काम चोख केलं असेलच. आपण त्यांना बोलावून घ्यावं, ही विनंती. धन्यवाद!''

*****

# कालान्त

ठेंगणी, ठुसकी टेकडी. तिच्यावर नाजुक छोटासा बंगला. स्वच्छ काचांच्या सुंदर खिडक्या आणि दारांवर आणि खिडक्यांवर अर्धगोल कमानी. त्यांत रंगीबेरंगी काचा. दारांतून सकाळ–संध्याकाळ सुंदर सूर्यप्रकाश तर आत येणारच पण आत येताना तो रंगीबेरंगी मैत्रिणी घेऊन आत येणार. त्यांच्या नाचानं घर सजणार. मोजकंच पण सुंदर सामान. प्रशस्त आरामखुर्ची. जीवनाची संध्याकाळ आरामात घालवायला, कल्पना करायला, आणि छोटं टेबल आणि खुर्ची कविता लिहायला. दागिन्यांची पेटी– शोभेला, बायकोला आणि मुलींना नटायला; आणि वेळेला मदतीला. आयुष्यभराची कमाई. आता शांत झोप घ्यायची–सुंदर स्वप्नांचे स्वल्पविराम, अर्धविराम घेत आणि मग ...! मध्यरात्रीनंतर केव्हातरी वादळ सुरू झालं. वादळाचे कर्कश आवाज. त्यांत झाडं मोडल्याचे, पडल्याचे आवाज. लाकडं करकरत मोडली. काचा खळ्ळखळ्ळकन फुटल्या. वारा इतका, दिवा ठरेना. सकाळ झालीच. बंगली मोडून पडलेली. लाकूडकाम वाळवीनं खाल्लेलं. दागिन्यांच्या पेटीवर मोठं लाकूड पडलेलं. पेटीनं आ केलेला. अन् काय, सोन्याचे दागिने मोडलेले, ते नुसतेच मुलामा दिलेले, आत पितळ! आणि हिऱ्यांचे हार सगळे फुटलेले–म्हणजे काचांचेच निघाले! म्हणजे सगळंच संपलं! दूर खाली नदी वाहत होती. तिच्या काठावर एक छोटं लाल कौलारू घर उभं होतं. भोवती मळा होता. फुलबाग होती. नारळी–केळी होत्या. असं घर घ्यायला हवं होतं–पण आता ते स्वप्नातच! मग, पुढे...?

केशवसुत घामाघूम होऊन जागे झाले. म्हणजे हेही स्वप्नच. स्वप्नातलं स्वप्न. सगळा जन्म एक स्वप्नच ठरला. आपण स्वप्नामागेच धावलो. पुरती दमणूक होईपर्यंत धावलो. हसलो, रडलो, खरं म्हणजे रडलोच,.... सारं सारं स्वप्नातच. कशी कधी जाग आली नाही? आता गेलेला जन्म कसा मिळणार? अमोल आयुष्य मातीमोल झालं. पण आपलं आपणच केलं. सारी वाटचाल भलत्याच मार्गानं केली. नको त्या मार्गानं केली. आता परत फिरता येत नाही. गेलं. सगळं गेलं. सगळं हरपलं. निरर्थक झालं. निश्रेयस्कारक झालं. पण सांगणार कुणाला? कळणार कुणाला? का मनुष्यप्राणी असा जन्माला आला की एखादी वस्तू नष्ट झाल्यावरच त्याला तिचा अर्थ स्पष्ट व्हावा?

याऐवजी सगळा जन्म सतार शिकण्यात आणि सतार वाजवण्यात गेला असता, तर?– ते तर शक्यच नव्हतं. कोणत्याही प्रकारे शक्य नव्हतं.

सारं आयुष्य अगदी एकमार्गी झालं. आयुष्याची गाडी एकाच रुळांवरून गेली. तसलं आयुष्य. तेही खंडित खंडित. नुसतीच यातायात आणि वाताहात. अखंड प्रवास झाला असता, तर?

तसे कितीतरी भास व्हायचे. दिव्य भास. काळोखातल्या काजव्यासारखे. पण जणू निसटून जाण्यासाठीच व्हायचे. पुन: काळोखच गडद. किती थोडे पकडता आले! त्यांच्या कविता झाल्या. पण, महाकाव्य? एखादा भास धूमकेतूसारखा दीर्घकाळ दिसत राहिला असता, तर? सगळ्यांच्या नुसत्या उल्काच झाल्या. आल्या आणि गेल्या. पाण्यावरची रेघ तशी आकाशातली चमक. क्षणैकच.

झाडावरून फळ पडलं. क्षणातच पडलं. पण न्यूटनचं आयुष्य त्या क्षणात बदललं. तो क्षण त्याच्या आयुष्यात अक्षर ठरला, अमर ठरला. क्षण अनंत झाला. त्या क्षणात त्याला अनंताचं दर्शन झालं! आपलं असं का नाही झालं? एडिसनच्या आयुष्यात हजारो क्षण आले. त्यानं ते पकडले. बुडबुडे त्यानं गोठवले. दिव्य भास त्यानं दिव्यात रूपांतरित केला. त्यानं पेटवलेल्या दिव्यानं सारं विश्व उजळून निघालं. आता काळोख संपला. त्यानं आकाशातली वीज माणसाच्या हातात दिली. आकाशातली वीज क्षणार्धात नष्ट होते. यानं तो क्षण अटोक केला! आणि, फोनो? जन्मत:च नष्ट होणारा-मरणारा आवाज त्यानं अमर केला! आता तानसेन येईल आणि जाईल पण त्याची तान शाश्वत राहील. एडिसननं निसर्गावर वरताण केली! त्यानं निसर्गाचा, नियतीचा पराभव केला. हसून माणसाला रडविणाऱ्या नशिबालाच तो हसला. असाच तो पुन:पुन: हसला. हजारो वेळा हसला. त्याला तो वेधच लागला, नादच जडला. आपल्याला का नाही असा छंद जडला? आपल्याला छंद जडला अक्षरांचा. सुंदर! सुंदर अक्षरांचा छंद. सुंदर भावनांना सुंदर अक्षररूप देण्याचा छंद. आनंदच. पण न्यूटन, एडिसनसारखं वेड जडलं असतं तर नवीनच शोध आणि नवीनच शब्द नसते का आपल्या जीवनातून घडले? आता ते कसं होणार? कधी होणार? 'झपूर्झा' म्हणजे काय हे आपल्याला कळलं, हे आपलं सौभाग्यच; पण झपूर्झा अनुभवता आला नाहीच, हे दुर्भाग्यच. आपली बुद्धी अशी नव्हती का? आपणसुद्धा निश्चित नवनवे शोध लावू शकलोच असतो. आपल्याला निश्चित ती बुद्धी होती. पण त्या बुद्धीला तिचा हा हक्काचा वर का नाही लाभला? जन्म गेल्यावर पतिव्रतेला पती भेटावा? एडिसननं जगाचा काळोख कायमचा घालवला पण आपल्या आयुष्याचा काळोख मात्र गडदच झाला. आपण जन्म घालवला, वाया घालवला! एडिसननं फक्त रात्रीचा काळोख घालवला. आपण कदाचित आपल्या बुद्धीनं एकाच तत्त्वानं - जसं 'गुरुत्वाकर्षण'- एकाच शब्दानं मानवजातीच्या जन्मापासूनचा अंधार-अज्ञाताचा अंधार कायमचा घालवला असता. नियतीच्या कैदाशिणीनं घातलेलं कोडं पुरतं उलगडलं असतं. जीवनाचा नवाच पट विणला असता. सृष्टीला नव्यानंच नटवलं असतं. पण, आता?

प्रकृती आणि पुरुष यांच्या खेळांचे नियम उलगडायचे, त्यांचे खेळ शोधायचे, असंख्य खेळ पाहायचे, असंख्य खेळ नवीन निर्मायचे तर त्यांत सर्वस्वानं वाहून जायला हवं होतं, व्यावहारिक संसार विसरून जायला हवं होतं, त्याच्याशिवाय दुसरं काही सुचायला नको होतं. न्यूटनचं जेवणाकडे लक्ष नसायचं; संसाराकडेही नसायचं. संसार त्यानं केलाच नाही. ध्यानी-मनी-स्वप्नी विज्ञान. आपलं का नाही तसं झालं? आपण तारमास्तर म्हणून काम केलं. खरं तर, केवढं आश्चर्य! मातीतून धातू निघतो काय, त्यातून

तार काढता येते काय, त्या तारेतून वीज पाठवून देता येते काय, आणि तिच्यातून संदेश धाडता येतो काय! आत बसून चार निर्जीव पदार्थ जुळवून हवी तशी गाडी चालवता येते, म्हणजे काय! दुर्बिणीतून चंद्र-सूर्य-तारे हाताशी आणता येतात, म्हणजे काय! आणि सूक्ष्मदर्शकातून क्षयासारख्या आजपर्यंत असाध्य जीवघेण्या रोगांचे जंतू कैद करता येतात, त्यांच्याशी सामना करून त्यांच्यावर मात करायला शरीराला शिकवता येतं, म्हणजे काय! वेदनेतच प्राण्यांचा जन्म आणि वेदनेतच मृत्यू, त्या वेदनेला फुंकर घालून झोपवता येतं, म्हणजे काय! कृत्रिम डोंगर रचून कृत्रिम सागर बनवता येतो, म्हणजे काय! पाण्याला, ताठ उभं राहा, अशी माणूस आज्ञा देऊ शकतो! आणि छायाचित्र, त्यातून चालणारं, धावणारं चित्र! खरोखरच विज्ञानच धावायला लागलंय! माणसाची बुद्धी आजपर्यंत अर्थशून्य वाटलेल्या आणि कचऱ्यासारख्या समजून टाकून दिलेल्या गोष्टींतून नवी तत्त्वं, नवे पदार्थ, नवी सुखसाधनं शोधून मानवी जीवनाला नवा अर्थ देऊ लागली आहे! ही काय नुसती गंमत आहे, नुसती चैन आहे, घटकाभरची करमणूक आहे? हा खरा जीवनाचा अर्थ आहे. आपण जगात राहतो. हे जग खरं तर जादुगाराची पोतडी आहे! - कल्पवृक्षाची सावली आहे! - स्वप्नं साकार करायची किमया माणसाला गवसली आहे! खरंच, काळोखात चालती चित्रं पडद्यावर दाखवता येऊ लागली आहेत; आवाज पकडून केव्हाही ऐकता येऊ लागला आहे; हे दोन्ही एकत्र केलं तर माणसं चालतील तशी बोलतीलसुद्धा! त्या पाश्चात्य देशांत कुणीतरी लवकर करणारच तसं!

इकडे आपण देवाच्या नावानं टाहो फोडत रडत बसलो आहोत! तिकडे पाश्चरनं निर्जंतुकीकरणानं अकालमृत्यू प्रत्यक्ष टाळले! आणि इकडे आपले लोक नसलेल्या परमेश्वराच्या नावानं हाका मारीत बसले आहेत! देव म्हणे दयाळू. मग हे निर्जंतुकीकरणाचं तत्त्व देवानंच का नाही सांगितलं? पोथ्यांत म्हणे देवाची वाणी! मग पोथ्यांत तर सगळं विज्ञानच असायला हवं होतं! हजारो वर्षं जंतुबाधा होऊन माणसं तडफडून मरताहेत, ती काय सगळी पापी? आणि पापी लोकांना शिक्षा देत बसण्याचं कार्य करतो तो देव दयाळू की निर्दय निर्घृण जुलमी सैतान?

आपण या देववेडातून, दैवी(!) वेडातून, दिव्य वेडातून(!) लवकरच बाहेर पडलो, हे बरं झालं. पुण्याला आलो, बरं झालं. आगरकर सर लाभले, बरं झालं. नाहीतर आपण ठार वेडेच झालो असतो! तरी लोकांच्या कौतुकाचा विषय झालो असतो! पण आपल्याला विज्ञानाचं वेड का नाही लागलं? एडिसनसारखी प्रयोगशाळा-खरं तर, प्रयोगमंदिर, विज्ञानमंदिर-आपल्याला लाभलं असतं, तर? आपण सगळ्या रोगांवरची औषधं नसती का तयार केली? नुसत्या आणि नसत्या अमृताच्या कल्पनेनंच हजारो वर्षं माणसं मिटक्या मारीत बसली आहेत! काल्पनिक परीस आणि वेड्या किमयांच्या नादांत माणसं आपली आयुष्यं घालवताहेत, त्यांना आपल्या आयुष्यांची किंमत तरी कळली आहे का? उत्तर शोधण्याची रीत हाताशी आहे पण माणसं तिच्याकडे पूर्ण पाठ फिरवून विरुद्ध दिशेनंच जीव पणाला लावून धावत आहेत! आणि लोक त्यांच्याच जयजयकारात बुडाले आहेत!

प्रयोगशाळा मिळणं अशक्यच होतं. पण विज्ञानाच्या तत्त्वज्ञानाचा अभ्यास करण्याचा नाद लागणं अशक्य नव्हतं. जसा आगरकरांना लागला. पण त्यांचं आयुष्य वेड्यांची वेडं नाहीशी करण्याच्या वेडातच खर्ची पडलं. वेड्यांच्या जगात शहाणा काय करणार? सत्याचा दीप त्यांना लाभला. या दिव्यावर आपापले दिवे पेटवून घ्या म्हणून ते सगळ्यांच्या मागे लागले, पण लोकांनी मात्र असलेले डोळे फोडून घेण्यातच धन्यता मानली आणि पणत्या न पेटवता त्यांच्या कटोऱ्या करून भीक मागण्यातच जन्म घालवले!

फुलांचा नाद लागायला सुगंध यावा लागतो. वातावरणात सुगंध असावा लागतो. आमच्या विद्वानांना विज्ञान आलं म्हणजे काव्य नष्ट होतं असं वाटत होतं. आपण प्रथम आगगाडीतून मुंबईला निघालो तेव्हा मनातून किती घाबरलो होतो! आगगाडीत पाय टाकण्याऐवजी पळून जावं असं वाटत होतं. पण गाडी सुरू झाली, गाडीनं वेग घेतला आणि काव्याचाही आवेग आला.

फुला, सुरम्य त्या उषेचिया सुरेख रे मुला,
विकास पावुनी अता प्रभाव दाव आपुला!

आणि, मुंबई? विज्ञाननगरीच! एकदम भूतकाळातून भविष्यकाळात गेल्यासारखं वाटलं! नरकातून नंदनवनात आल्यासारखा आनंद झाला! किती आगगाड्या! केवढं स्थानक! बाहेर केवढे रस्ते! केवढ्या इमारती! आपोआप पळणाऱ्या मोटारी! काय झकपक पोषाख केलेले लोक! आणि ऐटीनं चालणारे युरोपियन आणि इंग्रज! केवढी बंदरं! केवढ्या बोटी! या युरोपियनांची ऐट ही केवळ साम्राज्याची नाही, ती विज्ञानाची आहे! विज्ञानानं त्यांना आत्मविश्वास दिला आहे, आत्मानंद दिला आहे; विज्ञानानं सर्व सृष्टी खुली करण्याची गुरुकिल्ली गवसल्याचं समाधान त्यांच्या अंगप्रत्यंगातून व्यक्त होत आहे! विज्ञान नवीन वस्तू देतं. त्याचं तत्त्वज्ञान नवनवा आनंद देतं!! या आनंदाची चटक आपल्याला पूर्वीच लागायला हवी होती!

हे पाश्चात्य लोक डार्विनची मुलं आहेत. आपले लोक अजून डार्विननं वर्णन केलेल्या उत्क्रांतिपूर्वीच्या माकडाचीच पिलं आहेत. इंद्रियं वापरली तर वाढतात; नाही, तर नष्ट होतात. असंच बुद्धीचंपण नाही का? या समाजाची बुद्धी अशी नष्टच झाली आहे का? बुद्धी नष्ट झाल्यानंच सगळं जीवन नष्टचर्यच झालं आहे; नाही का? महात्मा फुल्यांनी डार्विन वाचला हे त्यांचं खरं महात्मेपण आणि डार्विन वाचूनही ते 'अखंड' रचीत राहिले हे त्यांचं द्रष्टेपण! खरं तर आपला देश-खरं तर, आपलं जग-कपिलमुनींचं, सांख्य तत्त्वज्ञानाचं, उत्क्रांतिवादाचं! पण अपक्रांतीचा हटवादच सर्वत्र कसा चालू राहिला? कपिलमुनींच्यापासूनच विज्ञानाचा अभ्यास अखंड होत राहिला असता तर आज या जगाचं स्वर्गात रूपांतर नसतं का झालं? काय झालं असतं याची कल्पना तरी कुणाला करता येईल का? निश्चित, माणूस दीर्घायुषी झाला असता. निश्चित, माणूस आरोग्यसंपन्न झाला असता. निश्चित, माणसाची बुद्धी, प्रतिभा आणि कार्यक्षमता अधिकाधिक विकसित होत

गेली असती. निश्चित, जीवन धनधान्यानं समृद्ध झालं असतं. भूक नाहीशीच झाली असती. नवनवी उपकरणं मिळून जीवन सुरक्षित, सुखमय झालं असतं. वाहनांचे वेग वाढून जग जवळ आलं असतं. जगातले वेगवेगळे कलांचे प्रकार सगळ्या जगात पसरले असते. जग कलानंदात डुंबत राहिलं असतं. सगळ्या विश्वाचा कायापालट झाला असता. माणसालाही खरोखरच नवी काया, नवी कांती लाभली असती. नव्या विज्ञान-मनूत विज्ञानाच्या आत्मविश्वासानं नव्या दमानं प्रत्येकजण नवाच शूर शिपाई ठरला असता- सगळ्या जगातच नव्हे तर सगळ्या अंतराळात फिरून सृष्टीचा, विश्वाचा शोध घेऊन विश्वाचाही पालट करणारा शूर नवमानवच ठरला असता! पोथ्यापुराणांतल्या स्वर्गाच्या कल्पनाही फिक्या ठराव्यात अशा गोष्टी प्रत्यक्षात उतरल्या असत्या! आपण शब्दांची वाट पाहत राहिलो, स्फूर्तीची वाट पाहत राहिलो; पण विज्ञानाच्या चिंतनात पूर्ण मग्न झालो असतो-झपूर्झामयच झालो असतो- तर केव्हातरी नवीच स्फूर्ती आणि नवेच शब्द आपोआपच आले असते; नाही का?- आता?

गेलं! सगळं गेलं! जीवनाचा मळा करण्याऐवजी आपणच वाळवंट होऊ दिलं! फुलांच्याऐवजी फत्तरच आपणच डोक्यावर फोडून घेतले! विज्ञानही सांगतं-काळात उलटं जाता येत नाही.

आता, फक्त -कालान्त!

*****

# ग्रहान्तर

दहा, नऊ, आठ... अशी उलटी गणती सुरू झाली आणि ती संपताच प्रचंड आवाज करून ते प्रचंड यान अवकाशात झेपावलं.

'उड्डाण यशस्वी!' डॉ. अवकाश ज्ञानी यांनी जाहीर करताच सर्वांनी आनंदानं टाळ्या वाजवल्या.

सात शास्त्रज्ञ तरुण आणि सात शास्त्रज्ञ तरुणी तिथं होत्या. सर्वांच्या चेहऱ्यांवरून आनंद ओसंडून जात होता. त्यांनी एकमेकांना मिठाई वाटली.

'पण आपण कुठं चाललो आहोत?' डॉ. तारकाचंद्र नाथ यांनी विचारलं.

'का?' सगळ्यांनी रागानं आणि संशयानं विचारलं.

'आपल्याला जो मार्ग सांगितला होता, मला ज्या मार्गावर लक्ष ठेवायला सांगितलं होतं, तो हा नाही.'

'काय? मग आपण कुठं चाललो आहोत?' सर्वजण डॉ. अवकाश ज्ञानी यांच्या समोर येऊन जाब विचारू लागले.

'तुम्हीच सांगा, आपण सर्वजण कुठं चाललो आहोत?' डॉ. ज्ञानी यांनीच उलट विचारलं.

'इथं तत्त्वज्ञानाचा प्रश्न नाही आहे. इथं आमच्या जीवनमरणाचा प्रश्न आहे. सांगा, आपण कुठं चाललो आहोत?'

'जिथून आपण इथं कधीच परत येणार नाही.'

'पुन: तत्त्वज्ञान! ते जाऊ दे खड्ड्यात. सांगा, आपण कुठं चाललो आहोत?'

'सांगा','सांगा' म्हणून सगळेच गिल्ला करू लागले. डॉ. ज्ञानी यांना मारायला उठले. 'तुम्ही आम्हांला फसवलंत!' म्हणून ओरडू लागले. बायका रडू लागल्या.

'होय. मी तुम्हांला फसवलं आणि मी तुम्हांला वाचवलं.'

'मित्रांनो, हा वेडा आहे. चला, आपण नियंत्रण कक्ष ताब्यात घेऊ या आणि पुन: आपल्या ग्रहाकडे वळू या. चला.' म्हणून डॉ. नाथ निघाले. सर्वजण त्यांच्या मागोमाग निघाले.

'ते शक्य नाही.'

'पण निघताना आम्हांला आपल्या ग्रहावरच दुसऱ्या दूरच्या ठिकाणी जायचंय म्हणून वचन दिलं होतं.'

'ते शक्य नाही.'

'का? का नाही? का शक्य नाही?'

'निघताना सांगितलं होतं की आपल्याला आपल्या ग्रहावरच...'

‘आपल्या शत्रूच्या भागात जाऊन शत्रूचा नाश करायचा आहे.’

‘तेच शक्य नाही.’

‘पण का?’

‘आपल्या शत्रूचा नाश होईल...’

‘पूर्ण नाश होईल!’

‘होय. पण आपलाही पूर्ण नाश होईल. संपूर्ण जगाचाच नाश होईल. अण्वस्त्रांच्या युद्धात एकाच पक्षाचा विजय शक्य नाही.’

‘चला रे. यान परत फिरवू या.’

‘ते शक्य नाही. यान संगणकावर चाललं आहे. त्यात बदल केला तर स्फोट होणार आहे.’

‘तुम्ही आम्हांला फसवलंत.’

‘होय. फसवलं आणि वाचवलं.तुम्हांलाच नव्हे तर सर्व मनुष्यजातीला वाचवलं!’

‘म्हणजे?’

‘ऐका. आपल्या ग्रहावरच्या सर्व प्रकारे सर्वोत्तम सात पुरुष आणि सात स्त्रिया यांची मी खूप विचार करून निवड केली आहे. तुम्ही बुद्धिवान, प्रतिभावान मनुष्यजातीचा अर्क आहात. तुमचा नाश होणं म्हणजे विश्वाचाच नाश होणं.’

‘विश्वाचा?’

‘होय. विश्वाचा! आपल्या ग्रहावर विश्वातल्या कमालीच्या योगायोगानं बुद्धिवान, प्रतिभावान मनुष्य जन्माला आला. असा प्राणी अखिल विश्वात कुठं असल्याचा यत्किंचित् पुरावा नाही. नजीकच्या भविष्यकाळात मिळेल याची खात्री नाही. म्हणून काय वाटेल ते करून हा विश्वातील एकमेवाद्वितीय प्राणी वाचवलाच पाहिजे, असं नाही का तुम्हांला वाटत?’

‘अज्ञात अवकाशात तो कसा वाचेल? आपल्या ग्रहावरच वाचला असता.’

‘ते शक्य नाही.’

‘का?’

‘हे बघा, मी म्हटलं मी तुम्हांला वाचवलंय कारण मला कळलं होतं की आपण सगळेच अतिरेक्यांच्या ठार मारायच्या यादीवर होतो– शत्रूंच्या नि आपल्या.’

‘आपल्या?’

‘होय. आपल्या. कारण आपण शास्त्रज्ञ. आपण स्वतंत्र बुद्धीचे. कुणाचे गुलाम बनणार नाही. लोकांना स्वतंत्र बुद्धीचे मित्र नको असतात. आपला हुकूम मानणारे गुलाम हवे असतात.’

‘पण शास्त्रज्ञांवाचून कसं चालेल?’

‘त्यांना माहीत होतं की शास्त्रीय सत्य केव्हा तरी प्रगट होतंच. दुय्यम प्रतीच्या शास्त्रज्ञांकडून दुप्पट काम करून घेतलं तर संशोधन होणारच.’

‘पण विज्ञानाच्या संशोधनालाही प्रतिभा लागते, विज्ञानाखेरीज दुसऱ्या कशालाही शरण न जाण्याची वृत्ती लागते.’

‘बरोब्बर बोललात. हेच त्यांना नको होतं. आपली सत्ता त्या नेत्यांना गमावयची नाही. त्यांना सत्ता महत्त्वाची; सत्य नव्हे. आणि म्हणूनच, तुम्हांला जगाचा इतिहास माहीत आहे, धार्मिक नेत्यांनी शास्त्रज्ञांचा नेहमीच छळ केलेला आहे. कित्येक शास्त्रज्ञांना ठार मारलेलं आहे. शास्त्रज्ञ देव मानूच शकत नाहीत आणि देव मानल्यावाचून धर्मवेड्यांचं चालतच नाही. आपल्या देवाच्या विरोधी लोकांना मारणं त्यांना पवित्र कर्तव्य वाटतं.’

‘धर्मवेडे म्हणून नका. धार्मिक, धर्मवाले म्हटलं तरी चालेल. धर्मवेडे ही पुनरुक्ती आहे. धार्मिक म्हणजेच सत्य सोडलेले. म्हणजेच वेडे.’ मधेच एक शास्त्रज्ञ उद्‌गारले.

‘अगदी बरोब्बर. आणि तुम्हांला माहीतच आहे की, आपण सोडलेलं जग दोन धर्मांत म्हणजे दोन वेडांत विभागलं गेलेलं आहे. तिथं सत्याला, शहाणपणाला स्थानच नाही. म्हणूनच आपण ते स्थान सोडलेलं आहे.’

‘आपण कड्याला लोंबकळत होतो. तो आधाराचा दोरच तुम्ही कापून टाकलात. आता सर्वनाश!’ डॉ. नाथ ओरडले.

‘सर्वनाश त्या सोडलेल्या जगाचा. आपलं सरकार धर्मगुरूंच्या गुलामांचं बनलेलं. खरे सत्ताधीश धर्मगुरूच. त्यांनी सगळ्यांना वेडं केलेलं आणि सगळे त्यांच्या मागं लागलेले. असल्या सरकारनं मला आणखी मोठा अणुबाँब, आणखी मोठा अणुबाँब, आणखी मोठा अणुबाँब बनवायला सांगितलं आणि तो वाहून न्यायला आणखी मोठं क्षेपणास्त्र, आणखी मोठं क्षेपणास्त्र, आणखी मोठं क्षेपणास्त्र बनवायला सांगितलं. लोक उपाशी मेले तरी चालेल. पण असली अस्त्रं बनवायची आणि शत्रूचा संपूर्ण विनाश घडवायचा. त्यांचा धर्म खोटा, त्यांचा देव खोटा; आपला धर्म खरा, आपला देव खरा, हे दाखवून द्यायचं. आपला देव आपल्याला वाचवणार आणि आपल्या शत्रूला मारणार ही दोन्ही पक्षांची ठाम श्रद्धा! पण असल्या युद्धात दोन्हीही पक्ष मरणार, ही आम्हा शास्त्रज्ञांची खरी शंका!’

‘तुम्ही आम्हांला मरायला काढलंत. आम्हांला कसं वाचवणार, या आमच्या शंकेचं आधी उत्तर द्या.’ डॉ. नाथ चिडून म्हणाले.

तेव्हा डॉ. ज्ञानी उत्तरले, ‘तेव्हा मीच आपल्या सरकारला ही योजना सुचवली. हे महाकाय क्षेपणास्त्र तयार केलं. यात शक्य तितके अणुबाँब भरले. आणि सरकारला सांगितलं की, शत्रूच्या केंद्रस्थानी जाऊन सर्व दिशांना अण्वस्त्रधारी क्षेपणास्त्रं सोडून शत्रूचा –त्याच्या धर्माचा –त्याच्या देवाचा – पूर्ण नाश करतो.’

‘सरकारला हे पटलं?’

‘आम्ही धर्मरक्षणासाठी जिवावर उदार झाल्याचं मी शास्त्रज्ञांच्या– तुमच्या–वतीनं सांगितलं. आपला देव आपल्याला वाचवणारच, असा विश्वास व्यक्त केला.’

‘मग आता?’ – एकानं विचारलं.

‘आता इतक्या अणुबाँबचं काय करणार? आपण विनाशावरच स्वार झालो आहोत’. डॉ. नाथ खेदानं बोलले.

‘हे अणुबाँब आपल्याला शक्ती देतील. इंधन पुरवतील. आपला ऊर्जेचा प्रश्न असा सुटेल.’ – डॉ. ज्ञानी.

‘अहो, पण ऊर्जा कशासाठी? जायचं कुठं? करायचं काय?’ – पुन: डॉ. नाथ.

‘तेच सांगतो. धर्मवेडावर उपाय नाही, अशी माझी खात्री झाली. विज्ञानानं शोध लावावा आणि धर्मानं तो राबवावा, असलीच प्रगती चालल्याचं मला स्पष्ट झालं. माणूस हा सत्यप्रेमी नसून सत्ताप्रेमी असल्याचं, आणि सत्तेखातर तो कोणत्याही थराला जाऊ शकेल, हे इतिहासशास्त्राच्या अभ्यासानं माझं मत बनलं. माणसाला निसर्गानं कल्पनाशक्ती दिली ती सत्याच्या साह्यानं प्रगती करण्यासाठी – अधिक चांगली नवी पिढी, अधिक चांगलं नवं जग; अधिक चांगली नवी पिढी, अधिक चांगलं नवं जग–असं करीत राहण्यासाठी. पण माणसानं सत्याला सोडचिठ्ठी दिली आणि कल्पनेच्या साह्यानं धर्म नावाचं थोतांड आणि देव नावाचा राक्षस निर्माण केला आणि विचार–विवेकानं प्रगती करण्याऐवजी धर्मदेवाच्या नावानं इतरांना आणि स्वत:लापण फसवण्याचं आणि प्रगतीऐवजी पुन: मागल्या पशुतुल्य युगात जाण्याचं पसंत केलं. असल्या फसवण्यांच्याही स्पर्धा म्हणजे अखिल मानवजातीचा अस्त. मित्रहो, आपली ओळख खूप जुनी आहे. तुम्ही सर्वजण खरेखुरे कल्पनावंत, प्रतिभावंत आहात आणि सत्यप्रेमी, वास्तव–प्रत्यक्ष सत्यप्रेमी आहात, हे मला माहीत आहे. कृपा करून ध्यानात घ्या, धर्म नावाचा रोग झालेली ही मनुष्यजात स्वत:चा आणि जगाचा अंत करायला निघालेली आहे. चांगल्या मनुष्यजातीचं बीज कुठल्यातरी नव्या कुमारिकासृष्टीवरच रोवलं पाहिजे.’

‘तुम्हीही फक्त कल्पनाच करीत आहात. सत्य कुठे?’

‘मी प्राधान्यानं खगोलशास्त्री. अशा कुमारिका सृष्टीच्या शोधातच मी राहिलो आणि ती सापडताच माझं तिच्यावर प्रेमच जडलं. आपण तिच्याकडेच चाललो आहोत!’

‘वाहवा!’ ‘वाहवा!’ ‘दाखवा!’ ‘दाखवा!’ एकदम सर्वत्र आनंदाची कारंजी उसळली.

‘थोडं थांबा. थोडी विरहाची कळ सोसा. मग त्या सृष्टीचं सुंदर दर्शन होईल. अहो, तीसुद्धा आपली वाटच पाहत असणार! सृष्टीला मानवाशिवाय आणि मानवाला सृष्टीशिवाय काय अर्थ? आपण नवी सृष्टी निर्मू या. फुलवू या. फळवू या. प्रीतीचा, खऱ्याखुऱ्या मीलनाचा आनंद कायम उपभोगू या. म्हणूनच आपण चौदा शाखांचे चौदा शास्त्रज्ञ एकत्र येऊ या. नवी कल्पनाशाली पण सत्यप्रेमी आणि प्रगतिप्रिय मनुष्यजात निर्मू या. सृष्टीलाच नव्हे अवघ्या विश्वाला शोभा आणू या.’

‘माझी पत्नी. माझी मुलं.’ डॉ. नाथ शोक करू लागले.

'माझं घर. माझी माणसं.' बायका रडू लागल्या.

'माझी कला ऽ'- एकजण.

'माझी पुस्तकं ऽ'-दुसरा.

'माझे लाडके प्राणी ऽ'- तिसरा.

'माझी फुलबाग. माझी फळबाग.' -चौथा.

हलकल्लोळ झाला. जरा शांत झाल्यावर डॉ. ज्ञानी बोलले,'हे बघा, यांतलं जे काही संगणकांतून घेणं शक्य होतं ते सगळं घेतलेलं आहे. प्राण्यांची आणि वनस्पतींची बीजंसुद्धा शीतपेट्यांतून घेतलेली आहेत.'

'जिवाला जीव पर्याय असतो का?' डॉ. नाथ ओरडले.

'नसतोच. पण सर्वनाशातून वाचवता येईल तितकं वाचवलेलं आहे. हेही नष्ट होऊन चाललंच नसतं.'

'आमचं दु:ख संपणारं नाही.' डॉ. नाथ पुन्हा म्हणाले.

'खरं आहे. पण सर्वोच्च ध्येयासाठी सर्वोच्च त्याग मानवजातीला कित्येकदा करावाच लागतो.' डॉ. ज्ञानी उत्तरले. काही वेळ गतजीवांच्या स्मृतिप्रीत्यर्थ शांतता पाळतात तशासारखा गेला. मग डॉ. ज्ञानी बोलू लागले,'आपण ग्रहान्तर केलं आहे. एक ग्रह सोडून दुसरा ग्रह घेतला आहे. जीवनातसुद्धा आपण एकाच ग्रहाचा आग्रह सोडून कालानुरूप दुसरा ग्रहण केलाच पाहिजे. नाहीतर जीवनसूर्याला कायमचं खग्रास ग्रहणच लागणार यांत शंका नाही. मला शंका येते की, फार फार वर्षांपूर्वी आपले पूर्वजसुद्धा असेच त्यांचे ग्रह सोडून इथं वस्तीला आलेले असले पाहिजेत. ग्रहान्तर म्हणजे जीवन. ग्रहासक्ती म्हणजे मरण.'

'नुसती वायफळ चर्चा नको.तो दुसरा ग्रह दाखवा.' डॉ. नाथ चिडून म्हणाले.

डॉ. ज्ञानी म्हणाले,'आपण आपल्या जुन्या आणि नव्या अशा दोन्ही ग्रहांच्या मध्यावर आलो आहोत. हा पाहा आपला जुना ग्रह.' म्हणून त्यांनी खिडकी उघडली. संपूर्ण ज्वाळांनी वेढलेल्या ग्रहाचे दर्शन होऊन सर्वजण भयभीत होऊन गेले. मग डॉ. ज्ञानी म्हणाले,'आणि आता हा पाहा अतिसुंदर सुजलाम् सुफलाम् ग्रह.' दुसरी उघडली. नीलरत्नासारखा शांत पण चमकदार गोल दिसू लागला. सर्वजण प्रसन्न झाले.

डॉ. नाथ म्हणाले,'आपल्या जुन्या ग्रहाचं नाव मंगल. याचं?'

डॉ. ज्ञानी उत्तरले, 'पृथ्वी!'

*****



डॉ. मुरलीधर जावडेकर

वैज्ञानिक शोध कितीही महत्त्वाचे आणि मोठे असले तरी शेवटी इतिहासजमाच होतात. मग त्यांवर आधारलेल्या कथेचे काय?

खरी कला नित्यनूतन, अम्लान, अविनाशी आनंद देणारी असते, हे कलात्मक विज्ञानकथेविषयीसुद्धा खरेच आहे. इतकेच नव्हे तर कलात्मक विज्ञानकथा विज्ञानसूचक, भविष्यवेधकही असू शकते आणि ते भविष्य साकार झाले तरीही आनंद देत राहणारीच राहते; आणि विज्ञानाच्या इतिहासावरील विज्ञानकथा कलात्मक भाष्यामुळे कलात्मक आनंद देते. 'रुबी' ही कथा या दृष्टीने रसिक वाचकांनी वाचावी. विज्ञानकथा ही विज्ञानावर आधारित असली तरी आधी ती कलात्म  कथा असलीच पाहिजे. इतरही कथा वाचकांना असाच आनंद कायम देत राहतील! 'रुबी' आणि इतरही अनेक कथा पुन:पुन: वाचण्याने नवानवा अर्थ देत राहतील! जगातल्या कुठल्याही रसिकाला, केव्हाही, कुठेही!

**एक नवा खेळ – खेळा !**

बहुतेक कथा संवादमयच आहेत – एकांकिकाच!

वाचा आणि नाटक करा.

घरातली प्रेमातली किंवा दारातली (म्हणजे, बाहेरची) मैत्रीतली रसिक मंडळी भेटली की हे संवाद वाटून घेऊन मोठ्यानं वाचा ..... पाठ झाले तर म्हणा.... गाण्यासारखाच आनंद होईल!

यासाठीच हा आणि इतर कथासंग्रह!